सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य

# शिक्षणवेध : २०४७

*वेध विकसित शिक्षणाचा...*



# आवाहन

राज्याच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या या नव्या त्रैमासिकासाठी तुमच्या सारख्या प्रेरणादायी शिक्षक, अभ्यासू विद्यार्थ्यांनी आणि नवकल्पनांनी समृद्ध महाविद्यालयांनी आपापल्या कहाण्या आमच्यापर्यंत पोहोचवाव्यात, अशी आमची मनापासून विनंती आहे.

तुमच्या संस्थेत एखादा वेगळा अभ्यासक्रम सुरू करण्यात आला असेल, एखाद्या विद्यार्थ्याने नावीन्यपूर्ण प्रकल्प साकारला असेल, पेटंट मिळवले असेल, संशोधनात काही वेगळे घडवले असेल, एखादा कार्यक्रम खूप लोकाभिमुख आणि परिणामकारक ठरला असेल - तर तो अनुभव आम्हाला आणि सर्वांना वाचायला नक्की आवडेल.

हे त्रैमासिक म्हणजे आपल्या कामाची ओळख करून देण्यासाठी निर्मिलेले एक व्यासपीठ आहे. संस्था, विभाग किंवा वैयक्तिक पातळीवरील आपल्या यशोगाथा, कल्पक उपक्रम, सर्जनशील प्रकल्प, आणि समजूतदार मार्गक्रमण - हे सगळं आम्ही ऐकायला आणि छापायला उत्सुक आहोत. या प्रवासात आमचे सहप्रवासी होण्यासाठी आपल्याला हे आग्रहाचे आमंत्रण!

तुमचे लेख (मराठीत किंवा इंग्रजीत), ६०० ते १००० शब्दांत shikshanwedh@gmail.com या ईमेलवर पाठवा. चांगली रंगीत छायाचित्रे देखील पाठवा; मात्र छायाचित्रांचे resolution चांगले असले पाहिजे. निवडक लेख त्रैमासिकात प्रसिद्ध केले जातील.

चला, एकत्र येऊ या — शिक्षणातले आशावाद, प्रयोगशीलता आणि प्रेरणा सगळ्यांपर्यंत पोहोचवू या!

**लेख या ईमेल वर पाठवा : shikshanwedh@gmail.com**

शिक्षणवेध : 2047 | **संपादक :** डॉ. मृदुला बेळे | **त्रैमासिक संयोजक :** तुषार दामगुडे

| **प्रकाशक:** संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, शासकीय तंत्रनिकेतन मुंबई इमारत, ४९ खेरवाडी, वांद्रे(पूर्व), मुंबई ४०००५१

| शारद मजकूर



सत्यमेव जयते



## श्री. देवेंद्र फडणवीस

मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य

महाराष्ट्र देशाच्या प्रगतीत अग्रणी आहे. राज्याच्या विकासात दर्जेदार शिक्षण प्रणालीचा मोलाचा वाटा आहे. मंत्री चंद्रकांत (दादा) पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली उच्च व तंत्र शिक्षण विभागाने गेल्या काही वर्षांत उल्लेखनीय प्रगती केली आहे. उच्च शिक्षणाच्या पद्धतीत दर्जात्मक सुधारणा, उद्योगोन्मुख अभ्यासक्रमांची रचना, कौशल्यविकास आणि डिजिटल शिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावरील स्पर्धेसाठी तयार करण्याचे कार्य केले जात आहे.

'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०'ची प्रभावी अंमलबजावणी, संशोधन आणि नवकल्पनांना प्रोत्साहन देणाऱ्या उपक्रमांतून विद्यार्थ्यांना बहुआयामी कौशल्ये विकसित होतील. यूजीसी – अप्रेंटीसशिप एम्बेडेड डिग्री प्रोग्रॅम, इंटर्नशिप मार्गदर्शक तत्त्वे, महा-ज्ञानदीप, महा-सार्क यांसारखी डिजिटल पोर्टल्स आणि स्कूल-कनेक्ट २.० यासारखे उपक्रम विभागाच्या दूरदृष्टीचे प्रतीक आहेत. विद्यार्थ्यांमध्ये या उपक्रमांमुळे शैक्षणिक गुणवत्ते बरोबरच आत्मविश्वास, उद्योजकता आणि रोजगारक्षमतेत ही लक्षणीय वाढ झाली आहे.

उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या या त्रैमासिकाच्या माध्यमातून विभागाच्या यशोगाथा नवउपक्रम, आणि भविष्यातील दिशा अधिक व्यापक पद्धतीने समाजापुढे मांडल्या जातील. हे त्रैमासिक विद्यार्थी शिक्षक आणि शिक्षण क्षेत्राशी निगडित सर्व संबंधितांसाठी प्रेरणादायी आणि दिशादर्शक ठरेल असा मला विश्वास आहे.

या अभिनव उपक्रमासाठी विभागातील सर्व अधिकारी, कर्मचारी, शिक्षणतज्ज्ञ यांचे मन:पूर्वक अभिनंदन. या त्रैमासिकाच्या प्रकाशनास मन:पूर्वक शुभेच्छा!

**देवेंद्र फडणवीस**



## श्री. एकनाथ शिंदे

उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य

उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे कार्य विद्यार्थी प्राध्यापक आणि पालकांपर्यंत पोहोचविण्यासाठी त्रैमासिक प्रकाशित केले जात असल्याचे समजून आनंद झाला.

प्रकाशित होणाऱ्या त्रैमासिकास माझ्या मन:पूर्वक शुभेच्छा !

महाराष्ट्राच्या समृद्ध आणि सशक्त भविष्यासाठी दर्जेदार उच्च व तंत्र शिक्षणाची भूमिका अतिशय महत्त्वाची आहे. आपल्या राज्यातील विद्यार्थ्यांना जागतिक पातळीवरील स्पर्धेसाठी सज्ज करण्यासाठी उच्च व तंत्र शिक्षण विभाग सातत्याने नवे प्रयोग, नवकल्पना व धोरणात्मक सुधारणा राबवत आहे. या सर्व यशस्वी उपक्रमामागे मंत्री श्री. चंद्रकांत (दादा) पाटील यांच्या दूरदृष्टीचा आणि ठाम नेतृत्वाचा मोठा वाटा आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली विभागाने राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या अंमलबजावणीसह अनेक प्रभावी उपक्रम हाती घेतले आहेत.

उद्योगोन्मुख अभ्यासक्रम, कौशल्य विकास प्रशिक्षण, संशोधनाला चालना तसेच महा- ज्ञानदीप, महा- सार्क, एचटीइडी डॅशबोर्ड यासारख्या डिजिटल प्लॅटफॉर्मसच्या माध्यमातून विभागाने शिक्षणव्यवस्थेत एक सकारात्मक बादल घडवून आणला आहे. 'स्कूल कनेक्ट २.०', यूजीसी -अप्रेंटीसशिप, एंबेडेड डिग्री प्रोग्रॅम्ससारख्या योजनांमुळे विद्यार्थ्यांना रोजगारसंधींचा अधिक चांगला आधार मिळत आहे.

हे त्रैमासिक विभागाच्या यशाचे प्रतिबिंब असून विविध उपक्रम कार्यपद्धती आणि भविष्यकालीन दृष्टीकोन लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी एक प्रभावी माध्यम ठरेल. मी या त्रैमासिकाच्या निर्मितीमागील सर्व टीमचे अभिनंदन करतो आणि हे त्रैमासिक राज्यातील शिक्षणप्रेमींसाठी प्रेरणादायी ठरेल अशी अपेक्षा व्यक्त करतो.

**श्री. एकनाथ शिंदे**



## श्री. अजितदादा पवार

उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य

महाराष्ट्राच्या शाश्वत विकासात आणि सामाजिक- आर्थिक उन्नतीत गुणवत्तापूर्ण शिक्षणाची भूमिका अत्यंत मोलाची आहे. उच्च व तंत्र शिक्षण विभागाने मा. चंद्रकांत (दादा) पाटील यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली गेल्या काही वर्षांमध्ये उल्लेखनीय प्रगती केली आहे. बदलत्या जागतिक तंत्रज्ञान युगात आपल्या विद्यार्थ्यांना सक्षम बनविण्यासाठी विभागाने आधुनिक आणि उद्योगसुसंगत अभ्यासक्रम राबवले असून शिक्षण क्षेत्रात दर्जात्मक व धोरणात्मक सुधारणा घडवून आणल्या आहेत.

'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०'च्या प्रभावी अंमलबाजवणीसोबतच, यूजीसी- अप्रेंटीसशिप एम्बेडेड डिग्री प्रोग्रॅम्स, इंटर्नशिप मार्गदर्शक तत्त्वे, 'स्कूल कनेक्ट २.०' तसेच 'महा-ज्ञानदीप', 'महा-सार्क' आणि एचटीईडी डॅशबोर्डसारखी डिजिटल साधने प्रभावीपणे राबवण्यात आली आहेत. यामुळे विद्यार्थ्यांचे कौशल्यविकास, उद्योगांशी जोडणी आणि रोजगारक्षमतेत लक्षणीय वाढ झाली आहे. याशिवाय संशोधन व नवोपक्रमांनाही मोठ्या प्रमाणात प्रोत्साहन देण्यात आले आहे.

हे विशेष त्रैमासिक उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या प्रगतीचा आरसाच ठरेल. विभागाने राबविलेल्या योजनांचे दस्तऐवजीकरण आणि भविष्यातील दिशा ठरविण्यासाठी हे त्रैमासिक प्रेरणादायी साधन ठरेल असा विश्वास आहे.

या त्रैमासिकाच्या उपक्रमास मन:पूर्वक शुभेच्छा...!

**श्री. अजितदादा पवार**



## श्री. चंद्रकांतदादा पाटील

मा. मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य

महाराष्ट्र राज्याच्या उच्च शिक्षणसंदर्भात प्रकाशित होत असलेल्या या विशेष त्रैमासिकाच्या माध्यमातून आपल्याशी संवाद साधताना मला अत्यंत आनंद होत आहे. हे त्रैमासिक विचारांची समृद्ध देवाणघेवाण घडवून आणण्याचे, आपल्या महाराष्ट्राची उच्च शिक्षणातील गुणात्मक परिवर्तनाची उल्लेखनीय यशोगाथा दर्शविण्याचे आणि आपल्या उज्ज्वल शैक्षणिक भविष्याची दिशा स्पष्ट करण्याचे एक महत्त्वाचे व्यासपीठ असेल.

एकवीसाव्या शतकातील जागतिकीकरणाच्या प्रवाहात दर्जेदार उच्च शिक्षणाचे महत्त्व अनमोल आहे. याच आधारावर प्रगतीशील आणि समृद्ध महाराष्ट्राची उभारणी होत आहे. माननीय पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदीजी यांच्या विकसीत भारत संकल्पनेवर आधारित राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० राबवण्यासाठी आमचे सरकार सतत प्रयत्नशील आहे. महाराष्ट्राचे माननीय मुख्यमंत्री श्री. देवेंद्रजी फडणवीस यांच्या द्रष्ट्या नेतृत्वाखालील आमचे सरकार आपल्या युवा पिढीला जागतिक स्तरावर स्पर्धा करण्यासाठी आवश्यक असलेले ज्ञान, कौशल्ये आणि क्षमता प्रदान करण्यासाठी कटीबद्ध आहे.

शिक्षण म्हणजे केवळ पदवी संपादन करणे नव्हे. हा व्यक्तींना घडवणारा, समुदायांना बळकट करणारा आणि नवकल्पनांना चालना देणारा एक परिवर्तनकारी प्रवास आहे, असा आमचा दृढ विश्वास आहे. आम्ही अभ्यासक्रमाची गुणवत्ता वाढवण्यासाठी, आंतरविद्याशाखीय शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा समावेश करत शिक्षण भविष्यवेधी बनवण्यासाठी सक्रियपणे काम करत आहोत.

महाराष्ट्र नेहमीच शिक्षणाच्या क्षेत्रात अग्रेसर राहिला आहे आणि ही परंपरा जपण्याचा आमचा दृढ संकल्प आहे. याव्यतिरिक्त, सामाजिक-आर्थिक प्रगतीमध्ये संशोधनाची महत्त्वपूर्ण भूमिका ओळखून आम्ही संशोधन आणि विकासाला सक्रियपणे प्रोत्साहन देत आहोत. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ची अंमलबजावणी, NAAC मुल्यांकन व मानांकन वाढविणे, वाचन संकल्प, इंटर्नशिप मार्गदर्शक तत्त्वे, स्कूल कनेक्ट २.०, यूजीसी-अप्रेंटिसशिप एम्बेडेड डिग्री प्रोग्राम्सचे एकत्रीकरण, एचटीईडी डॅशबोर्ड पोर्टल, महा-ज्ञानदीप आणि महा-सार्क यांसारख्या डिजिटल प्लॅटफॉर्म्सचा शुभारंभ ही या दिशेने उचललेली आमची ठाशीव पाऊले आहेत.

उच्च शिक्षणामध्ये आपल्या उद्योगांच्या बदलत्या गरजा पूर्ण करण्याची आणि सहज रोजगार मिळवू शकणारे कुशल मनुष्यबळ निर्माण करण्याची प्रचंड क्षमता आहे. आमचे अभ्यासक्रम उद्योगांच्या मागणीनुसार तयार करण्यावर, व्यावसायिक प्रशिक्षणाला प्रोत्साहन देण्यावर आणि कौशल्ये जुळवण्यासाठी शिक्षण आणि उद्योग यांच्यात सहकार्य वाढवण्यावर आम्ही लक्ष केंद्रित करत आहोत.

हे त्रैमासिक आपल्या विभागाचे विविध उपक्रम, यश आणि दृष्टिकोन दर्शवणारे एक माध्यम असेल. तुम्ही सर्वांनी यातील विषयांशी सक्रियपणे जोडले जावे , आपले विचार व्यक्त करावेत आणि चालू असलेल्या संवादात योगदान द्यावे असे आवाहन मी करतो. आपण सगळे मिळून महाराष्ट्रातील शिक्षणाची मानके उंचावू शकतो आणि भावी पिढ्यांना सक्षम करू शकतो यावर माझा विश्वास आहे. या त्रैमासिकाच्या निर्मितीमागील संपूर्ण टीमला मी शुभेच्छा देतो आणि एक संघटीत आणि सुसंस्कृत शैक्षणिक समुदाय निर्माण करण्यात हे त्रैमासिक नक्कीच योगदान देईल अशी अपेक्षा बाळगतो.

धन्यवाद !



## श्री. बी. वेणूगोपाल रेड्डी, IAS

मा. अपर मुख्य सचिव,
उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन

महाराष्ट्र राज्याच्या उच्च आणि तंत्र शिक्षण विभागाच्या कामासंदर्भात एक त्रैमासिक प्रकाशित होत आहे, ही अतिशय अभिनंदनीय घटना आहे. या त्रैमासिकाच्या प्रकाशन प्रसंगी आपणा सर्वांना हार्दिक शुभेच्छा देताना मला अत्यंत आनंद होत आहे. शिक्षण ही केवळ ज्ञान प्राप्त करण्याची प्रक्रिया नसून भविष्य घडवण्याचा हा एक महत्त्वाचा टप्पा आहे. जागतिक स्तरावर झपाट्याने घडणाऱ्या शैक्षणिक, तांत्रिक आणि औद्योगिक बदलांचा प्रभाव लक्षात घेता आपल्या विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाने आणि नाविन्यपूर्ण विचारसरणीने सुसज्ज करणे ही काळाची गरज आहे. शासनाच्या विविध उपक्रमांद्वारे आम्ही गुणवत्तापूर्ण शिक्षण, उद्योगस्नेही कौशल्य विकास आणि संशोधनाला चालना देण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील आहोत.

उच्च शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांच्या यशस्वी व उज्वल भविष्यासाठी विद्यार्थ्यांमध्ये तंत्रज्ञानासोबतच मूल्याधिष्ठित विचार, सामाजिक भान आणि आंतरराष्ट्रीय स्पर्धेला सामोरे जाण्याची तयारी असणे आवश्यक आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ची अंमलबजावणी करताना उच्च आणि तंत्र शिक्षण विभागाने अनेक उपक्रम राबविले. त्यातील NAAC मूल्यांकन व मानांकन वाढविणे, वाचन संकल्प, इंटर्नशिप मार्गदर्शक तत्त्वे, स्कूल कनेक्ट २.०, यूजीसी-अप्रेंटिसशिप एम्बेडेड डिग्री प्रोग्राम, एचटीईडी डॅशबोर्ड पोर्टल, महा-ज्ञानदीप आणि महा-सार्क, कौशल्य विकास कार्यक्रम, आंतरराष्ट्रीय सहकार्य प्रकल्प आणि डिजिटल शिक्षणास प्रोत्साहन यासारख्या उपक्रमांमुळे आपल्या तरुण पिढीला नव्या संधींचे द्वार खुले होत आहे.

उच्च शिक्षणाचा गुणवत्तापूर्ण विकास ही केवळ शासनाचीच नव्हे तर सर्व शैक्षणिक संस्था, प्राचार्य, शिक्षक, विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांचीही सामूहिक जबाबदारी आहे. गुणवत्ता, नवोपक्रम आणि सहभाग या त्रिसूत्रीवर आधारित शिक्षण व्यवस्थेमुळेच आपण महाराष्ट्राला ज्ञान व तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात अग्रस्थानी नेऊ शकतो.

या त्रैमासिकाद्वारे विभागातील विविध उपक्रम, यशोगाथा आणि प्रेरणादायी कार्य वाचकांपर्यंत पोहोचणार आहे, याचा मला अभिमान वाटतो. या उपक्रमासाठी मी संपादकीय मंडळ आणि त्यांच्या सहकाऱ्यांचे अभिनंदन करतो. आपण सर्वांनी उच्च व तंत्रशिक्षणाच्या विकासातील आपल्या भूमिका अधिक प्रभावीपणे पार पाडाव्यात, हीच अपेक्षा व शुभेच्छा!

धन्यवाद!



## प्रा. डॉ. शैलेंद्र देवळाणकर

संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे

महाराष्ट्र शासनाच्या उच्च शिक्षणसंदर्भात  प्रकाशित प्रकाशित होत असलेल्या या ज्ञानवर्धक त्रैमासिकाच्या माध्यमातून आपल्याशी संवाद साधताना मला मनःपूर्वक आनंद होत आहे. हे त्रैमासिक केवळ शासकीय विभागाचे मुखपत्र नसून, ते आपल्या राज्यातील उच्च शिक्षण क्षेत्रातील घडामोडी, नवनवीन उपक्रम, संशोधन आणि शैक्षणिक विचारधारांचा एक महत्त्वाचा दस्तऐवज  व संवादाचे व्यासपीठ आहे.

आजचे युग ज्ञानाचे आणि तंत्रज्ञानाचे आहे. या गतिमान युगात टिकून राहण्यासाठी आणि प्रगती करण्यासाठी आपल्या युवा पिढीला गुणवत्तापूर्ण उच्च शिक्षण मिळणे अत्यंत आवश्यक आहे. महाराष्ट्र राज्याचे उच्च शिक्षण संचालनालय याच ध्येयाने प्रेरित होऊन एका थिंक टँक प्रमाणे कार्यरत आहे. आम्ही शिक्षण संस्थांमध्ये उत्कृष्ट शैक्षणिक वातावरण निर्माण करण्यासाठी, अभ्यासक्रमांना अद्ययावत व गुणात्मक करण्यासाठी आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सतत प्रयत्नशील आहोत.

आपल्या राज्यातील उच्च शिक्षण संस्थांनी शैक्षणिक गुणवत्ता, संशोधन आणि नावीन्यता या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली आहे. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर आपल्या शैक्षणिक संस्था, विद्यार्थी आणि अध्यापकांच्या कर्तृत्वाचा ठसा उमटला आहे, याचा मला अभिमान आहे. या त्रैमासिकाच्या माध्यमातून या यशोगाथा सर्वांपर्यंत पोहोचवण्याचा आमचा प्रयत्न आहे.

आम्ही शिक्षण संस्था आणि उद्योग यांच्यातील समन्वय वाढवण्यावर विशेष लक्ष केंद्रित केले आहे.  यामुळे विद्यार्थ्यांना केवळ सैद्धांतिक ज्ञान मिळणार नाही, तर त्यांना प्रत्यक्ष उद्योगांच्या गरजांची जाणीव होईल आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. कौशल्य विकास आणि व्यावसायिक शिक्षण यावरही आमचा भर आहे, ज्यामुळे आपले विद्यार्थी केवळ पदवीधर नव्हे, तर कुशल आणि आत्मनिर्भर नागरिक बनू शकतील.

या त्रैमासिकात उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या विविध योजना, उपक्रम आणि धोरणे याबद्दल माहिती देण्यात आली आहे.  तसेच, त्रैमासिकाच्या पुढील अंकांमध्ये शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञांचे विचार, यशस्वी विद्यार्थ्यांच्या प्रेरणादायी कथा आणि शैक्षणिक जगतातील नवीन प्रवाह यावरही प्रकाश टाकला जाईल. मला विश्वास आहे की हे त्रैमासिक आपल्या सर्वांसाठी माहितीचा आणि प्रेरणांचा स्रोत ठरेल.

मी राज्यातील सर्व शिक्षकांना आवाहन करतो की त्यांनी विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी आणि त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी आपले योगदान देत राहावे. विद्यार्थ्यांनो, तुम्हीच आपल्या देशाचे भविष्य आहात. कठोर परिश्रमांच्या  माध्यमातून ज्ञान अर्जित करा आणि एक सशक्त व समृद्ध महाराष्ट्र घडवण्यासाठी सज्ज व्हा. या त्रैमासिकाच्या यशस्वी प्रकाशनासाठी मी उच्च व तंत्रशिक्षण विभागातील माझ्या सर्व सहकाऱ्यांचे अभिनंदन करतो आणि या त्रैमासिकाच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा देतो.



## प्रा. डॉ. विनोद मोहितकर

संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

मा. मंत्रीमहोदय, उच्च व तंत्र शिक्षण, श्री. चंद्रकांतदादा पाटील यांच्या संकल्पनेतून प्रकाशित करण्यांत येणाऱ्या या त्रैमासिकाच्या शुभारंभाच्या आवृत्तीद्वारे मी सर्व वाचक, संपादक मंडळ आणि तंत्र शिक्षणाशी निगडीत सर्वांना खूप अभिमानाने आणि आनंदाने शुभेच्छा देतो.

आपल्या देशाचे भविष्य घडविण्यात तंत्र शिक्षण महत्त्वाची भूमिका बजावते. त्यामुळे हे प्रकाशन राज्यातील उच्च व तंत्र शिक्षणातील परिवर्तनाच्या दिशेने आपला प्रवास दर्शविणारी दूरदर्शी धोरणे आणि उपक्रम सर्वांसमोर आणण्याचे एक माध्यम आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP) २०२० मध्ये तांत्रिक शिक्षण अधिक लवचिक, बहुशाखीय आणि उद्योगस्नेही बनवण्यासाठी महत्त्वपूर्ण सुधारणा केल्या आहेत. त्यास अनुसरुन राज्यातील तंत्र शिक्षण सर्वसमावेशक, बहुशाखीय आणि कौशल्य केंद्रित व्हावे यासाठी महाराष्ट्र शासनाने अनेक महत्त्वपूर्ण उपाययोजना केल्या आहेत. शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची सर्व अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या स्वायत्त संस्थांमध्ये तर २०२४-२५ पासून सर्व संलग्नित संस्थांमध्ये अंमलबजावणी करण्यांत आलेली आहे. या बाबी शैक्षणिक उत्कृष्टतेच्या दृष्टीकोनातून शासनाची वचनबद्धता प्रतिबिंबित करतात.

राज्याचे तंत्रशिक्षण संचालनालय (DTE) हे वेळोवेळी अभ्यासक्रम सुधारणा, अध्यापकांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम/कार्यशाळा, डिजिटलायझेशनला प्रोत्साहन, उद्योग समुहांशी संबंध मजबूत करणे, इनक्युबेशन केंद्रे, स्टार्ट-अप सेल इत्यादींसारखे  महत्त्वपूर्ण उपक्रम राबवित असून, ते सक्षम करण्यासाठी सक्रियपणे कार्यरत आहे. असे असले तरीही, येणाऱ्या काळात तंत्रज्ञानामध्ये होणारे नावीन्यपूर्ण बदल लक्षात घेऊन काही क्षेत्रांमध्ये अधिक लक्ष देण्याची गरज आहे. जसे, बहुशाखीय शिक्षणासाठी स्पष्टता आणणे, विविध स्तरावरील प्रवेश-निर्गमन पर्याय, ॲकॅडमिक बँक क्रेडिट इ. बाबींवर भर देण्याची गरज आहे. तसेच ग्रामीण, आदिवासी आणि आर्थिकदृष्ट्या वंचित पार्श्वभूमीचे विद्यार्थी या परिवर्तनाच्या लाटेत मागे राहणार नाहीत याची काळजी घेण्याची गरज आहे. त्याचप्रमाणे संस्थांमधील अंतर्गत गुणवत्ता हमी यंत्रणा बळकट करून राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय मानांकन प्राप्त करणे यावर भर देणे आवश्यक आहे, कौशल्यावर आधारित कार्यक्रमांची व्याप्ती आणि सखोलता वाढविणे तसेच स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करणे गरजेचे  आहे. पायाभूत सुविधा, शिक्षक आणि अभ्यासक्रमाची गुणवत्ता यांसारख्या समस्यांवर सुध्दा लक्ष केंद्रित करण्याची गरज आहे.

हे त्रैमासिक महाराष्ट्रातील विद्यापीठे आणि संस्थांमध्ये राबविण्यांत येणाऱ्या उपक्रमांबाबतची माहिती उपलब्ध करून देण्यासाठी एक व्यासपीठ उपलब्ध करून देणार आहे. तसेच विद्यार्थी आणि शिक्षक यांना प्रोत्साहन देत  राज्यातील शैक्षणिक सुधारणांना चालना देणाऱ्या महत्त्वपूर्ण योजनांची ओळख करून देणार आहे.  या त्रैमासिकातील माहिती ही निश्चितच शिक्षण क्षेत्रातील सर्व घटकांसाठी महत्त्वपूर्ण असून, शिक्षण क्षेत्रात आंतरराष्ट्रीय पातळीवर तसेच देश पातळीवर होणाऱ्या घडामोडींबद्दल या त्रैमासिकात उहापोह करण्यांत येणार आहे.

आपण कालानुरुप जसजसे पुढे जाऊ  तसतसे आपण एक शैक्षणिक व्यासपीठ तयार करण्यासाठी एकत्र काम करत राहू या. असे केल्यास केवळ जागतिक मानकांची पूर्तता हेच उद्दिष्ट न ठेवता, आपल्या समाजाच्या गरजांचाही विचार केला जाईल. या त्रैमासिकाच्या निमित्ताने आपण जे साध्य केले आहे त्याचा अभिमान आणि यापुढे जी कामे करायची आहेत त्यासाठी एक स्पष्ट आराखडा अशा दोन्ही बाबीची पूर्तता होईल अशी मी आशा करतो.

सत्यमेव जयते



## श्री. अशोक गाडेकर

प्र. संचालक, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई

उच्च व तंत्रशिक्षण विभागाची धोरणे, कार्य, योजना व त्यांनी राबविलेले अभिनव उपक्रम वाचकांपर्यंत पोहचविण्यासाठी मा. मंत्री महोदयांच्या संकल्पनेतून या त्रैमासिकाची निर्मिती झाली आहे, ही बाब विभागाच्या दृष्टीने भूषणावह आहे. आपल्या राज्याला ग्रंथालय चळवळीला प्रदीर्घ अशी परंपरा लाभलेली आहे. महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालय अधिनियम १९६७ साली अस्तीत्वात आला. या अधिनियमाच्या तरतूदीनुसार ग्रंथालय संचालनालय या स्वतंत्र विभागाची स्थापना २ मे, १९६८ रोजी करण्यात आली आहे. या अधिनियमातील तरतुदीनुसार राज्यातील सार्वजनिक ग्रंथालयांची स्थापना, परिरक्षण, संघटन, नियोजन व विकास याची जबाबदारी ग्रंथालय संचालनालयाकडे सोपविण्यात आली आहे. मा. ना. श्री. चंद्रकांतदादा पाटील, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या पुढाकाराने नुकताच महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालय सुधारणा अधिनियम प्रसिद्ध झाला आहे. डिसेंबर, २०२४ च्या हिवाळी अधिवेशनामध्ये या अधींनियमला विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहात मान्यता मिळाली, आणि माहे जानेवारी, २०२५ च्या राजपत्रात तो प्रसिध्द झाला. ही बाब सार्वजनिक ग्रंथालयांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची आहे.

आजमितीस शासनाचे मुंबई येथे स्थित एक राज्य मध्यवर्ती ग्रंथालय, सहा शासकीय विभागीय ग्रंथालये, छत्तीस जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालये, दापोली येथे स्थित डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मृती ग्रंथालय, सहा सहायक ग्रंथालय संचालक कार्यालये अशी एकूण ५१ ग्रंथालये आणि ११,१५० शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालये कार्यरत आहेत. ग्रंथालय संचालनालयामार्फत ग्रंथपालन प्रमाणपत्र परीक्षा, उत्कृष्ट ग्रंथालयांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार, उत्कृष्ट ग्रंथालय सेवक व कार्यकर्ता यांना ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ एस. आर. रंगनाथन "ग्रंथमित्र" यांच्या नावाने पुरस्कार देवून सन्मानित केले जाते. वाचन संस्कृती वाढावी, वाचकांची संख्या वाढावी, ग्रंथांना वाचक मिळावा, ग्रंथालये लोकाभिमुख व्हावी यासाठी संचालनालय व त्यांच्या अधिपत्याखालील ग्रंथालये हे दरवर्षी ग्रंथोत्सव, ग्रंथदिंडी, ग्रंथ प्रदर्शने, काव्य संमेलन, परिसंवाद, मुलाखत या सारखे विविध सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन करत असतात. ही सर्व माहिती वाचकांना उपलब्ध व्हावी व इतर ग्रंथालयांनी नाविन्यपूर्ण उपक्रम हाती घ्यावे यासाठी या त्रैमासिकाचा निश्चितच फायदा होणार आहे.

या त्रैमासिकामध्ये राज्यामधील अनेक शतायू ग्रंथालये तसेच डिजिटल ग्रंथालये यांची माहिती तसेच ग्रंथालय चळचळीत योगदान देणारे शासकीय अधिकारी, ग्रंथालय कार्यकर्ते यांनी राबविलेले अभिनव उपक्रम यांची देखिल माहिती देण्यात येणार आहे. तसेच संचालनालयाच्या योजनांचाही समावेश असणार आहे. या त्रैमासिकामध्ये वाचकांच्या समस्या, सूचना यांचेही निश्चितच स्वागत केले जाईल. ग्रंथालय संचालनालयासोबतच इतर संचालनालयांशी संबंधित सकस मजकूर या त्रैमासिकात असेल. अशी सर्व माहिती वाचकांना, विद्यार्थांना एकाच व्यासपीठावर उपलब्ध झाल्याने याचाही खूप मोठया प्रमाणामध्ये लाभ होणार आहे. या त्रैमासिकाच्या निर्मितीसाठी आदरणीय मंत्री महोदय यांनी पुढाकार घेतल्याबद्दल मनापासून अभिनंदन. या त्रैमासिकाचे सर्व लेखक, मा. संचालक, मा. संपादक आणि संपादन मंडळातील सदस्य यांचेही मनापासून अभिनंदन! या त्रैमासिकाद्वारे दर महिन्याला नवनविन माहिती मिळावी, याद्वारे जनतेला शासनाच्या सेवांची माहिती मिळत राहावी व हे त्रैमासिक अखंडीतपणे कार्यरत राहावे यासाठी माझ्या अनंत शुभेच्छा !



सत्यमेव जयते



## श्री. राजीव मिश्रा

प्र. संचालक, कला संचालनालय , महाराष्ट्र राज्य, मुंबई

आजच्या घडीला शैक्षणिक क्षेत्राला अत्याधुनिकतेची गरज आहे. हे लक्षात घेत राज्याचा उच्च व तंत्र शिक्षण विभाग महाराष्ट्र राज्याच्या उच्च आणि तंत्र शिक्षणाच्या नवीन ध्येयधोरणांची आखणी करत आहे. या धोरणाची यशस्वीरित्या अंमलबजावणी मा. मंत्री महोदय, श्री.चंद्रकांत दादा पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पार पाडत आहे. उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या योजना, ध्येयधोरणे, कार्य आणि नवनवीन उपक्रम जनतेपर्यंत पाहोचविण्यासाठी मा.मंत्री महोदयांच्या संकल्पनेतून 'शिक्षणभान : २०४७' या त्रैमासिकाची निर्मिती झाली आहे. ही बाब विभागाच्या दृष्टीने गौरवास्पद आहे.

महाराष्ट्र राज्याला शतकाहून अधिक काळाची कलेची प्रदीर्घ परंपरा लाभली आहे. सर जमशेटजी जीजीभाई यांनी दिलेल्या देणगीतून सन १८५७ मध्ये सर जे.जे. स्कूल ऑफ आर्ट, मुंबई या कला संस्थेची स्थापना झाली. या संस्थेच्या माध्यमातून दृश्यकलेचे शिक्षण दिले जाऊ लागले. त्यानंतर बऱ्याच काळाने कला शिक्षणाच्या बाबींवर धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी आणि दृश्यकलेचा विकास व विस्तार करण्यासाठी एक स्वतंत्र विभाग असावा म्हणून दि.१२ जून, १९६५ रोजी कला संचालनालयाची स्थापना करण्यात आली. सद्य स्थितीतील राज्यात कला संचालनालयाच्या अखत्यारित ४ शासकीय, ३१ अनुदानित व १७८ विनाअनुदानित कला संस्था व एक संगीत महाविद्यालय आहे. या संस्थांत दृश्य कलेतील शासन मान्यताप्राप्त पदव्युत्तर, पदवी व पदविका अभ्यासक्रमांचे शिक्षण दिले जात आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण लक्षात घेऊन पदविका अभ्यासक्रमांचे आधुनिकीकरण आणि प्रमाणिकरण करण्याच्या उद्देशाने दि.१९ जानेवारी, २०२४ रोजी "महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ अधिनियम २०२३" प्रसिद्ध करण्यात आला. या अधिनियमाद्वारे 'महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ' स्थापन झाले. या मंडळाची निर्मिती ही मा.मंत्री महोदय, श्री.चंद्रकांत दादा पाटील यांच्या प्रयत्नाने व पुढाकारानेच झालेली आहे. मा.मंत्री महोदयांनी विशेष लक्ष घालून राज्याच्या डिसेंबर, २०२४ मधील हिवाळी अधिवेशनाच्या दोन्ही सभागृहामंध्ये या अधिनियिमास मान्यता मिळवून दिली. ही बाब कला संचालनालयाच्या विकासात व कला संस्थांच्या आधुनिकीकरणात मोलाची ठरणार आहे.

शासनाच्यावतीने कला संचालनालयामार्फत दृश्य कलेच्या विकासाच्या दृष्टीने तसेच समाजात कलेची अभिरुची निर्माण करण्याकरिता, महाराष्ट्र राज्य कला प्रदर्शन, बाल चित्रकला स्पर्धा, शासकीय रेखाकला परीक्षा (एलिमेंटरी व इंटरमिजिएट) यांसारखे उपक्रम दरवर्षी राबविले जातात. त्याचप्रमाणे दृश्यकला क्षेत्राच्या विकासासाठी सातत्याने कार्यरत असलेल्या ज्येष्ठ व नामवंत कलाकारांस 'वासुदेव गायतोंडे कलाजीवन गौरव पुरस्कारा'ने दरवर्षी सन्मानित करण्यात येते.

दृश्यकला व वास्तुकलेच्या शैक्षणिक क्षेत्रात आमुलाग्र बदल घडवून आणण्यासाठी आणखी एक भूषणावह पाऊल उचलले गेले आहे. सर ज.जी.कला महाविद्यालय, सर ज.जी.उपयोजित कला महाविद्यालय, व सर ज.जी.वास्तुशास्त्र महाविद्यालय या क्षेत्रातील अग्रगण्य असलेल्या तीन शासकीय संस्था मिळून देशातील तिसरे व राज्यातील पहिलेच शासनाचे अभिमत विद्यापीठ दि.१९.१०.२०२३ रोजी स्थापन झाले आहे. अश्या सर्व घडामोडींची माहिती जनतेपर्यंत पोहोचावी व कला संचालांनालयाचे इतर नाविन्यपूर्ण उपक्रम लोकांपुढे मांडता येण्यासाठी निश्चितपणे या त्रैमासिकाचा लाभ होईल यात शंका नाही.

राज्यातील तंत्रशिक्षण, उच्च शिक्षण, कला शिक्षण, ग्रंथालय संचालनालय या सर्व विभागांची माहिती एकत्रितरित्या 'शिक्षणभान : २०४७' या त्रैमासिकामध्ये वाचकांना मिळणार आहे. तसेच उच्च तंत्र शिक्षण विभागाच्या नाविन्यपूर्ण व महत्त्वाकांक्षी योजनांची माहिती देखील या त्रैमासिकाच्या माध्यमातून वाचकांपर्यंत पोहोवता येईल. तसेच वाचकांच्या सूचना देखील या त्रैमासिकामार्फत स्वीकारता येतील व त्यांची विभागाच्या कामकाजात सुधारणा करण्यास मदत होईल.

'शिक्षणवेध : २०४७' या त्रैमासिकाच्या निर्मितीसाठी आदरणीय श्री.चंद्रकांत दादा पाटील यांनी पुढाकार घेतल्याबद्दल त्यांचे मन:पूर्वक अभिनंदन. त्याचप्रमाणे त्रैमासिकासाठी सातत्याने नाविन्यपूर्ण माहिती उपलब्ध करून देणाऱ्या सर्व मा.संचालक, मा.संपादक यांचेही अभिनंदन. हे त्रैमासिक निरंतर सुरू राहो, सर्वसामान्य जनतेस विभागाची अद्ययावत माहिती मिळत राहो आणि नियतकालीकेचे उद्दिष्ट साध्य होवो अश्या माझ्या अगणित शुभेच्छा!!!

# संपादकीय



‘गुरू द्रोणांनी मला शिक्षण नाकारले, पण मी गुरू शोधला- स्वतःच्या श्रद्धेत, स्वतःच्या ध्येयात’ असं एकलव्य एके काळी म्हणाला होता. राजाश्रयित गुरूकुलात प्रवेश नाकारल्यावरही एकलव्याने मातीपासून आपला गुरू निर्माण केला आणि स्वतः शिकण्याचा ध्यास घेतला. त्याची ही कहाणी आजच्या शिक्षणव्यवस्थेला एक महत्त्वाचा संदेश देते- की शिक्षण ही काही ठरावीक वर्गापुरती मर्यादित गोष्ट नाही, तर ती प्रत्येक जिज्ञासू व्यक्तीचा मूलभूत अधिकार आहे. आजही अनेक ‘एकलव्य’ आपल्या आजूबाजूला आहेत — दूरच्या खेड्यांमधून, संसाधनांपासून वंचित असलेल्या भागांतून राहणारे- पण शिकण्याची तीव्र इच्छा आणि कर्तृत्व गाठीशी घेऊन पुढे येणारे विद्यार्थी! अश्या प्रत्येक एकलव्याला योग्य मार्गदर्शन, साधनं, आणि संधी उपलब्ध करून द्याव्यात ही समाज म्हणून आपली जबाबदारी आहे. आणि अशाच जबाबदारीच्या जाणीवेतून महाराष्ट्र शासनाचा उच्च आणि तंत्र शिक्षण विभाग आदरणीय मंत्री मा. चंद्रकांतदादा पाटील यांच्या नेतृत्वाखाली आणि मुख्यमंत्री मा. देवेंद्रजी फडणवीस आणि पंतप्रधान मा. नरेन्द्रजी मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली अखंड कार्यरत आहे.

उच्च शिक्षण, तंत्र शिक्षण, कला आणि ग्रंथालय अशी चार संचालनलये उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे हे उद्दीष्ट पूर्ण करण्यासाठी अखंड झटत असतात. त्यांनी चालविलेल्या विविध योजना — जसे की कौशल्यविकास कार्यक्रम, डिजिटल शिक्षण, उद्योग-संलग्न अभ्यासक्रम, उद्योजकतेला चालना देणारे उपक्रम — हे सर्व नव्या एकलव्यांना सक्षम करण्याची पाऊल आहेत. त्यातलेच पुढचे पाऊल आहे आदरणीय मंत्री महोदय मा. चंद्रकांतदादा पाटील यांच्या संकल्पनेतून साकारलेले हे त्रैमासिक- शिक्षणवेध : २०४७! या पहिल्या अंकामध्ये आपण खात्याच्या विविध उपक्रमांचा आढावा घेतला आहे. नवोन्मेष, संशोधन, उद्योजकता, आणि सामाजिक बांधिलकी या चौकटीतून शिक्षणात होणाऱ्या बदलांना आपण स्थान दिले आहे. पण हे त्रैमासिक हे काही माहितीची जंत्री समोर ठेवणारे माध्यम नाही. विद्यार्थ्यांशी, शिक्षकांशी, पालकांशी आणि नवविचारधारांशी संवाद साधणारे हे एक विचारपीठ आहे. असे प्राभावी माध्यम असलेल्या त्रैमासिकाची संपादक म्हणून काम करण्याची संधी मला मिळत आहे, त्याबद्दल मी कृतज्ञ आहे. ज्ञानाचे दरवाजे सर्वांसाठी खुले ठेवणारी, समावेशक आणि उदात्त शिक्षणसंस्था उभी करण्याच्या दिशेने आपण सर्वजण एकत्रित पावले टाकत आहोत. हे त्रैमासिक त्या प्रवासातील एक छोटे पण महत्त्वाचे पाऊल आहे.

या पहिल्या अंकात विभागातील विविध उपक्रम, यशोगाथा, धोरणात्मक पावले आणि नवोन्मेषी वाटचालीची झलक आपल्याला पाहायला मिळेल. पुढील अंकांमध्ये आम्ही उद्योजकतेच्या क्षेत्रातील प्रेरणादायी कहाण्या, विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त ठरणाऱ्या पुस्तकांचे परीक्षण, अभ्यासपूर्ण लेख, तसेच शिक्षणक्षेत्रातील दिग्गजांच्या मुलाखती समाविष्ट करणार आहोत.

या त्रैमासिकाचे खरे वैभव हे तुमच्या सहभागातून फुलणार आहे. महाराष्ट्रभरातील महाविद्यालयांचे प्राचार्य, प्राध्यापक, संशोधक आणि विद्यार्थी यांनी आपले विचार, अनुभव, कल्पना आणि लेख आम्हाला जरूर पाठवावेत. हे त्रैमासिक तुमच्याच कथा, तुमच्याच कर्तृत्वाने सजणार आहे.

एकलव्याप्रमाणेच प्रत्येक जिज्ञासूला संधी मिळावी — हीच आमची प्रेरणा आहे. शिक्षणाच्या या सामूहिक प्रवासात आपण सारे सहभागी होऊया.

**डॉ. मृदुला बेळे**
संपादक, शिक्षणवेध : २०४७



# अनुक्रमणिका


- गुणवत्ता आणि उपलब्धता: महाराष्ट्रातील उच्च शिक्षणाचे नवे युग
  **मा. चंद्रकांत (दादा) पाटील** ....... १४

**संचालकांच्या लेखणीतून**

- गरज कौशल्यकेंद्री शिक्षणाची / **प्रा.(डॉ.) शैलेन्द्र देवळाणकर** ....... १७
- महाराष्ट्रातील तंत्र शिक्षण : प्रगतीची नवी दिशा / **प्रा. (डॉ.) विनोद मोहितकर** ....... १९
- वाचाल तर वाचाल
  ग्रंथालय संचालनालय: वाचनसंस्कृतीचे संरक्षक / **श्री. अशोक गाडेकर** ....... २८
- कला संचालनालयाचा शतकी प्रवास / **श्री. राजीव मिश्रा** ....... ३६

**सामर्थ्याची शंभर पावले**

- डॅशबोर्ड पोर्टल: सुसंगत माहितीचे आगर / **श्री. स्वप्नील कोरडे** ....... ४२
- सुशासनाची प्रकाशवाट / **डॉ. प्रशांत मगर** ....... ४४
- लहान हस्तक्षेप, प्रभावी परिणाम / **प्रा. (डॉ.) विनोद मोहितकर** ....... ४६
- स्कूल कनेक्ट 2.0: शाळेपासून स्वप्नांपर्यंत / **प्रा.(डॉ.) राजनीश काम**त ....... ५०
- एप्रेंटिसशीप एम्बेडेड डिग्री प्रोग्राम:
  शिक्षणातून रोजगाराकडे / **श्री पी. एन. जुमले** ....... ५६
- वाचन संकल्प महाराष्ट्राचा: ग्रंथ हे समाजसुख / **प्रा. रमेश नारायण वरखेडे** ....... ५९

**वारी विद्यापीठांची**

- ज्ञान गंगा घरोघरी / **प्रा.(डॉ.) संजीव सोनवणे** ....... ६३

**लेख**

- नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० आणि
  विकसित भारताचा पाया / **डॉ. नितीन करमळकर** ....... ७०
- भारतीय ज्ञान परंपरेचे सामर्थ्य / **डॉ. भूषण पटवर्धन** ....... ७३
- शैक्षणिक संशोधनावरील बौद्धिक संपदा:
  संख्या नको गुणवत्ता हवी / **डॉ. मृदुला बेळे** ....... ७७



# गुणवत्ता आणि उपलब्धता: महाराष्ट्रातील उच्च शिक्षणाचे नवे युग

**चंद्रकांतदादा पाटील**
उच्च व तंत्र शिक्षण मंत्री, महाराष्ट्र राज्य

शिक्षण हे केवळ ज्ञानार्जनाचे साधन नसून, सामाजिक सक्षमीकरणाचे आणि राष्ट्रनिर्मितीचे बळकट माध्यम आहे, याची जाणीव ठेवून महाराष्ट्र राज्याने उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात अभूतपूर्व सुधारणा राबविल्या आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रेरणेने आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली, महाराष्ट्र हे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (२०२०) ची प्रभावी अंमलबजावणी करणारे अग्रेसर राज्य ठरत आहे. गुणवत्तापूर्ण, सर्वसमावेशक, कौशल्याधिष्ठित आणि आंतरराष्ट्रीय स्तराशी स्पर्धा करू शकणारे उच्च शिक्षण हा राज्याच्या धोरणात्मक वाटचालीचा केंद्रबिंदू बनले आहे. शासनाच्या ठोस आर्थिक तरतुदी, सामाजिक समावेशकता आणि नवसर्जनाचे उपक्रम यांमुळे महाराष्ट्र आज इतर राज्यांसाठी प्रेरणास्त्रोत ठरत आहे.

माननीय पंतप्रधान श्री. नरेंद्रजी मोदी आणि महाराष्ट्राचे माननीय मुख्यमंत्री श्री. देवेंद्रजी फडणवीस यांची निर्णायक दूरदृष्टी, पाठिंबा आणि मार्गदर्शनामुळे महाराष्ट्र राज्य भारतातील शैक्षणिक परिवर्तनामध्ये आघाडीवर आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP) २०२० ची अंमलबजावणी करताना महाराष्ट्र राज्याच्या उच्च शिक्षण क्षेत्रामध्ये व्यापक सुधारणा करण्यात येत आहेत. यामुळे उच्च आणि तंत्र शिक्षण अधिक सर्वसमावेशक, नाविन्यपूर्ण होत असून त्याचा दर्जा जागतिक स्तराशी स्पर्धा करण्याएवढा उंचावत आहे.

येत्या आर्थिक वर्षासाठी(२०२५-२६) महाराष्ट्र सरकारने उच्च व तंत्र शिक्षण विभागासाठी १६,२६१.५६ कोटी रुपयांची भरीव तरतूद केली आहे. ही मोठी तरतूद केवळ कर्मचाऱ्यांचे वेतन आणि पायाभूत सुविधा यांसारख्या कार्यात्मक गरजांसाठीच नाही. तर ती राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार परिवर्तनकारी उपक्रम राबविण्यासाठी आहे. ही आर्थिक तरतूद हे सरकारच्या नव्या शैक्षणिक धोरणाशी असलेल्या मजबूत बांधिलकीचे प्रतीक आहे.

राज्याचे शैक्षणिक धोरण सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांच्या सबलीकरणावर विशेष भर देते. "डॉ. पंजाबराव देशमुख निर्वाह भत्ता योजना" अंतर्गत वर्ष २०२४-२५ मध्ये २.६ लाखांहून अधिक पात्र विद्यार्थ्यांना ४६४ कोटी रुपयांपेक्षा जास्त निधीचा लाभ देण्यात आला आहे. सध्या, राज्यातील ७२ शासकीय वसतिगृहांमध्ये ८,४०० हून अधिक विद्यार्थ्यांसाठी सुरक्षित निवासाची सोय आहे. यापैकी बहुतेक जागा मुलींसाठी राखीव आहेत. मुलींच्या शिक्षणाविषयी आणि सुरक्षेविषयी शासन अतिशय संवेदनशील आहे. दोन वर्षांपूर्वी राज्यातील मुलींचा उच्च शिक्षणातील सकल प्रवेशदर सुमारे ३६ टक्के होता. तो वाढविण्यासाठी शासन सर्वतोपरी प्रयत्न केले जात आहेत. आजही उच्च शिक्षणामध्ये मुलींचे प्रतिनिधित्व कमी आहे हे ओळखून शैक्षणिक शुल्कासंदर्भात एक महत्त्वपूर्ण धोरण सरकारने शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून लागू केले आहे. आठ लाख रुपये किंवा त्यापेक्षा कमी वार्षिक उत्पन्न असलेल्या कुटुंबातील मुलींसाठी शिक्षण आणि परीक्षा शुल्क पूर्णपणे माफ करण्यात येत आहे. या धोरणाचा लाभ शासकीय, अनुदानित आणि विनाअनुदानित संस्थांमधील व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेत असलेल्या आर्थिकदृष्ट्या दुर्बळ, ओबीसी आणि सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या वर्गातील आणि मुलींना होत आहे. या निर्णयाकडे केवळ आर्थिक मदत म्हणून पाहता कामा नये. मी याकडे शिक्षणाच्या माध्यमातून लिंग-समानता आणि सामाजिक सक्षमीकरणाच्या दिशेने टाकलेले मूलभूत पाऊल म्हणून पाहतो आहे. या निर्णयामुळे उच्च शिक्षणामध्ये महिलांच्या सहभागात लक्षणीय वाढ होणे अपेक्षित आहे. त्यामुळे अर्थातच त्यांच्या व्यावसायिक आणि तांत्रिक गुणवत्तेत वाढ होऊन त्यांचे आर्थिक सबलीकरण होणार आहे.

महाराष्ट्र राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ची अंमलबजावणी करण्यात अग्रेसर असलेल्या राज्यांपैकी एक राज्य आहे. हे धोरण राबविण्यासाठी डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्या नेतृत्वाखालील उच्च-स्तरीय कृती दल आणि राज्य सुकाणू समिती स्थापन करत राज्याने तातडीने पाऊले उचलली. सुकाणू समितीच्या शिफारशींनुसार राज्याने शैक्षणिक वर्ष २०२३-२४ आणि २०२४-२५ पासून पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी राष्ट्रीय क्रेडिट फ्रेमवर्क (NCrF) स्वीकारले आहे. या सुधारणेमुळे उच्च शिक्षणाच्या अभ्यासक्रम आराखड्यात बदल करून कौशल्यआधारित, ज्ञानआधारित आणि प्रत्यक्ष प्रात्यक्षिक/अनुभव आधारित शिक्षणाचा समावेश करण्यात आला आहे. विद्यार्थ्यांना आता त्यांच्या आवडीचा विषय निवडण्याची लवचिकता मिळाली आहे. त्यांच्या आवडीनुसार आणि उदयोग क्षेत्रातील मागणीनुसार आंतरविद्याशाखीय पदवी प्राप्त करण्याची मोकळीक आता त्यांना आहे.

सरकारच्या सततच्या प्रयत्नांमुळे, देशभरातील विद्यापीठे व महाविद्यालयांच्या NAAC मूल्यांकन आणि मानांकनात आता महाराष्ट्र आघाडीवर आहे. देशभरातील



NAAC मान्यताप्राप्त ४४१ विद्यापीठे आणि ९,४०० हून अधिक महाविद्यालयांपैकी, ३५ विद्यापीठे आणि १,९४९ महाविद्यालये एकट्या महाराष्ट्रात आहेत. त्यामुळे NAAC मूल्यांकित उच्च शैक्षणिक संस्थांच्या एकूण संख्येत महाराष्ट्र राज्य आज देशात अव्वल स्थानावर आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षणावर भर देण्याचा हा एक उल्लेखनीय पुरावा आहे.

अकृषी विद्यापीठे आणि संलग्न/स्वायत्त महाविद्यालयांना रुसा/पीएम-उषा योजनेच्या माध्यमातून वाढीव अनुदान मिळाल्याने पायाभूत सुविधा, संशोधन प्रयोगशाळा, अध्यापक प्रशिक्षण व अध्यापकांचा शैक्षणिक विकास आणि शैक्षणिक परिणामांना अधिक बळ प्राप्त झाले आहे.

शिक्षण आणि आर्थिक स्वावलंबन हे एकाच वेळी घडले तर अधिक उपयुक्त ठरेल हे लक्षात घेत महाराष्ट्राने उच्च आणि तंत्र शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी एक समर्पित स्टार्टअप धोरण सुरू केले आहे. यामुळे इच्छुक विद्यार्थी उद्योजकांना आर्थिक सहाय्य, सल्ला, प्रशिक्षण आणि व्यावसायिक ओळखी घडवून आणण्याची संधी मिळत आहे. माननीय पंतप्रधान श्री. नरेंद्रजी मोदी यांच्या पुढाकाराने सुरू झालेले 'मेक इन इंडिया' आणि 'स्टार्टअप इंडिया' हे केंद्र सरकारचे प्रमुख कार्यक्रम राबविल्यामुळे उच्च शैक्षणिक संस्थांचे (HEIs) परिसर आता 'नवोपक्रम केंद्रे' म्हणून ओळखली जात आहेत. यामुळे सर्जनशीलता आणि समाजाला भेडसावणाऱ्या जटील प्रश्नांची उत्तरे शोधण्याची वृत्ती वाढीस लागत आहे. अभियांत्रिकी महाविद्यालयांच्या अभ्यासक्रमांनी

आता काट टाकली आहे. इंटरनेट ऑफ थिंग्स, आर्टिफिशियल इंटेलिजन्स, मशीन लर्निंग, डेटा सायन्स आणि रोबोटिक्ससारख्या अत्याधुनिक आणू कालसुसंगत अभ्यासक्रमांचा आता यात समावेश होत आहे. हे अभ्यासक्रम आता वेगाने बदलणाऱ्या जागतिक बाजारातील गरजांना अनुसरून विकसित होत आहेत. यामुळे रोजगाराच्या अनेक संधीची कवाडे खुली होणार आहेत. बाजारपेठेची बदलती गरज ओळखून त्यांना उच्च व तंत्र शिक्षणाने दिलेला हा जणू एक प्रकारचा थेट प्रतिसाद आहे. बाजारपेठेत ज्या अभ्यासक्रमांना अधिक मागणी आहे ते अधिकाधिक विद्यार्थ्यांना उपलब्ध व्हावेत म्हणून सरकारने हेतुपुरस्सर पाऊले उचलली आहेत. याचे एक उदाहरण म्हणजे वर्ष २०२३-२४ मध्ये कोल्हापूर येथे झालेली शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाची स्थापना. किंवा अनेक संस्थांना उदयोन्मुख क्षेत्रांमध्ये अभ्यासक्रम सुरू करण्यास देण्यात आलेले प्रोत्साहन. यामध्ये आयओटी, ऑटोमेशन, रोबोटिक्स आणि एआय यांचा समावेश आह. हे सर्व राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाने शिफारस केलेले आणि अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने (AICTE) मंजूर केलेले अभ्यासक्रम आहेत. फार्मसीसारख्या काही क्षेत्रांमध्ये नावनोंदणीत घट झाली आहे. त्यामुळे नवीन औषधनिर्माण संस्था सुरू करायच्या की विद्यमान संस्थांमध्ये नवीन अभ्यासक्रम समाविष्ट करायचे हा मुद्दा सरकारच्या विचाराधीन आहे. असे केल्याने संसाधनांचा यथायोग्य वापर करत विद्यार्थ्यांच्या मागणीशी जुळवून घेणे शक्य होणार आहे.

सार्वजनिक विद्यापीठे आणि संलग्न महाविद्यालयांमध्ये अर्थपूर्ण संवाद वाढवण्यासाठी महाराष्ट्राने नाविन्यपूर्ण कार्यक्रम सुरू केले आहेत. दर शुक्रवारी होणारी 'सह्याद्री शिक्षण संवाद' ही व्याख्यानमाला हे प्राचार्य, शिक्षक, विद्यार्थी आणि पालक यांच्यातील संवादासाठीचे नाविन्यपूर्ण ऑनलाईन व्यासपीठ आहे. या माध्यमातून राष्ट्रीय/ आंतरराष्ट्रीय स्तरावर नावाजलेल्या तज्ञ व्यक्ती शिक्षण क्षेत्रातील निरनिराळ्या विषयांवर मार्गदर्शन करतात. यामुळे राज्यातील उच्च शिक्षण क्षेत्रामध्ये शिक्षणाविषयी जागरूकता निर्माण होते आणि असलेल्या क्षमतांची वृद्धी होण्यास मदत होते.



'प्रश्न तुमचे, उत्तर आमचे' हा ही आमचा एक अतिशय उत्तम असा उपक्रम आहे. या उपक्रमाद्वारे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (२०२०) च्या राज्य सुकाणू समितीमधील तज्ञ सदस्य राज्यातील महाविद्यालयांचे प्राचार्य, अध्यापक, विद्यार्थी, पालक यांच्याशी ऑनलाईन माध्यमातून संवाद साधतात. या संवादातून राष्ट्रीय शैक्षणिक धोरणासंबंधी असलेले प्रश्न आणि शंका यांचे निरसन होते.

मी स्वतः महाविद्यालयांना भेट देऊन प्राचार्य, शिक्षक, विद्यार्थी व पालक यांच्यासमवेत प्रत्यक्ष संवाद साधतो आणि त्यांच्या शिक्षणा विषयीच्या स्थानिक समस्यांचे थेट निराकरण करतो. यामुळे खुल्या संवादाची आणि सहकार्याची संस्कृती निर्माण होते.

महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षणाच्या माध्यमातून जागतिक स्तरावरील विद्यापीठे, उच्च शिक्षण संस्था यांच्या बरोबर जोडले जावे याकरिता राष्ट्रीय /आंतरराष्ट्रीय साहचर्य वाढविणे, सामंजस्य करार करणे यावर भर दिला जात आहे. उच्च शिक्षणासंदर्भात धोरणात्मक बाबी, आणि सकारात्मक बदलांविषयी राज्याचा उच्च शिक्षण विभाग शिक्षा मंत्रालय- भारत सरकार, विद्यापीठ अनुदान आयोग, आखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद यांच्याशी नेहमीच संवाद साधत असतो. विद्यापीठ अनुदान आयोग, आखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद व इतर केंद्रीय शिखर संस्थांनी जारी केलेली मार्गदर्शक तत्वे, अधिसूचना व उच्च शिक्षणातील धोरणात्मक सुधारणा इ. महाराष्ट्र राज्यामध्ये लागू करण्याबाबतही राज्य सरकार नेहमीच सकारात्मक असते. विद्यापीठ अनुदान आयोगाने २०२२- २०२३ मध्ये प्रसिध्द केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार, राज्यातील उच्च शैक्षणिक संस्थांना प्रतिष्ठित परदेशी विद्यापीठांसोबत दुहेरी पदवी, संयुक्त पदवी आणि ट्विनिंग पदवी कार्यक्रम सुरू करण्यास राज्य सरकार प्रोत्साहन देत आहे. यामुळे परदेशात शिक्षण घेण्याच्या खर्चाच्या कित्येक पट कमी खर्चात आंतरराष्ट्रीय अभ्यासक्रम उपलब्ध होतील. अशा सहकार्यामुळे आंतर्राष्ट्रीय दर्जाच्या शिक्षणाची उपलब्धता वाढेल, शैक्षणिक गतिशीलता वाढीस लागेल आणि विद्यार्थ्यांना भारतीय शिक्षण प्रणालीतच ठेवून आंतरराष्ट्रीय करिअरसाठी तयार करता येईल.

गेल्या तीन वर्षांत महाराष्ट्राच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाने केवळ सुधारणांची अंमलबजावणीच केली नाही, तर शिक्षणाचा चेहरामोहराच बदलून टाकून एकवीसाव्या शतकातील समाजाला साजेसा ठरेल असा केला आहे. लिंग समानता, कौशल्य विकास, नवोपक्रम आणि आंतरराष्ट्रीयकरण हे उपक्रम विद्यार्थ्यांना केवळ नोकरीसाठी तयार करत नाहीत, तर त्यांना सामाजिकदृष्ट्या जबाबदार आणि जागतिक स्तरावर जागरूक असे नागरिक म्हणून घडवतो.

महाराष्ट्राचा असा हा उच्च शिक्षणातील महत्वाकांक्षी विकास आराखडा इतर राज्यांसाठी एक आदर्श उदाहरण ठरू पाहत आहे. दृढ राजकीय इच्छाशक्ती, सबंधित घटकांचा सक्रीय सहभाग आणि द्रष्टे नेतृत्व यामुळे भविष्यासाठी सज्ज अशी शिक्षण प्रणाली घडविण्याचे स्वप्न हळूहळू दृष्टिपथात येत आहे.





# गरज कौशल्यकेंद्री शिक्षणाची

**प्रा. डॉ. शैलेन्द्र देवळाणकर**
संचालक, उच्च शिक्षण

भारत हा जगातील सर्वाधिक लोकसंख्येचा देश आहे. यातील जमेची बाजू म्हणजे या लोकसंख्येत तरुणांची म्हणजेच २५ ते ३३ वयोगटातील लोकांची संख्या ९० कोटी इतकी असून ती उत्पादनशील लोकसंख्या म्हटली जाते. तथापि, या लोकसंख्येचे रुपांतर भारताला 'परफॉर्मिंग असेट्स'मध्ये म्हणजेच कुशल मनुष्यबळात करावे लागेल. यासाठी शिक्षणाची भूमिका महत्त्वाची आहे. मुंबईएवढे क्षेत्रफळ असणाऱ्या जपानवर दुसऱ्या महायुद्धात दोन अणुबॉम्ब टाकण्यात आले होते. असा देश १९७० पर्यंत जगातील दुसऱ्या क्रमांकाची मोठी अर्थव्यवस्था बनला, याचे मूळ कारण म्हणजे जपानने मानव संसाधन विकासावर प्रचंड गुंतवणूक केली. शिक्षणाच्या क्षेत्रात, विशेषतः संशोधन विकासासाठी मोठी गुंतवणूक केली आणि त्यातून अत्यंत कुशल मनुष्यबळ विकसित केले. तशाच प्रकारे भारतानेही कौशल्य विकासकेंद्री शिक्षणावर भर देण्याची गरज आहे. तरच आपला ब्रेन ड्रेनही रोखता येईल.

सध्याचे एकवीसावे शतक हे प्रामुख्याने ज्ञानाचे शतक म्हणून ओळखले जाते. तर २० वे शतक हे प्रामुख्याने युद्धाचे शतक म्हणूनच पाहिले जात होते. ज्ञान हा समाजाच्या प्रत्येक घटकाचा आधार बनला आहे. आता आपली अर्थव्यवस्थाही ज्ञानाधिष्ठीत झाली आहे. थोडयात आपल्या अर्थव्यवस्थेचा आधारही ज्ञान बनलेला आहे. भारताने २०२७-२८ पर्यंत आपल्या अर्थव्यवस्थेचा आकार ५ ट्रिलियन डॉलर्सपर्यंत नेण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. तसेच त्यापुढील काळात १० ट्रिलियन डॉलर्सपर्यंत झेप घेण्याच्या दृष्टीने तयारी सुरू केली आहे. त्या दृष्टीकोनातून देशाच्या आर्थिक विकासाचा दर ७ ते ८ टके कायम कसा ठेवता येईल, भारताची निर्यात कशी वाढवता येईल, आंतरराष्ट्रीय व्यापार तसेच विदेशी गुंतवणूक कशी वाढवता

येईल या दृष्टीने प्रयत्न होत आहेत. यामध्ये भारताच्या ह्युमन रिसोर्स अर्थात मानवी साधनसंपत्ती किंवा मनुष्यबळाचा उपयोग कसा कुशलतेने करता येईल याचा विचार प्राधान्याने होणे गरजेचे आहे. यासंदर्भात एक महत्त्वाचा प्रश्न सातत्याने समोर येत आहे, तो म्हणजे भारतातून होणारे ब्रेन ड्रेन. गेल्या काही वर्षांमध्ये भारतातून उच्चविद्याविभूषित, कौशल्यप्राप्त मनुष्यबळ अमेरिका-युरोपकडे स्थलांतरीत होण्याचे प्रमाण लक्षणीयरित्या वाढले आहे. यामुळे भारत आज टॅलेंट एस्पोर्ट कंट्री म्हणजेच कौशल्य निर्यातदार देश म्हणून पुढे येताना दिसत आहे. परिणामी, आज 'पढेगा इंडिया तो बढेगा अमेरिका' असे म्हणण्याची वेळ आली आहे. दरवर्षी साधारणतः जून ते ऑगस्ट महिन्यांमध्ये इंजिनियरींग, मॅनेजमेंट या शाखांमधील तरुण प्रचंड मोठ्या संख्येने परदेशात जाण्यासाठी सरकारी कार्यालयांमध्ये रांगा लावताना दिसतात. यासाठी बँकांकडून ५०-५० लाखांपर्यंतची कर्जे घेतली जात आहेत. परदेशात जाणाऱ्या या नवतरुण भारतीयांकडून सुमारे १५ अब्ज डॉलर्स इतका प्रचंड खर्च दरवर्षी केला जात आहे. दुसरीकडे, हे टॅलेंट तयार करण्यासाठी म्हणजेच बुद्धीवान, प्रज्ञावान, कौशल्याधारीत पिढी घडवण्यासाठी भारत प्रचंड प्रमाणात पैसा खर्च करत आहे. विशेषतः भारतातील आयआयटींमधून विदेशात जाणाऱ्यांची संख्या खूप अधिक आहे. गेल्या ५० वर्षांमध्ये २५ हजारांहून अधिक आयआयटीयन्स अमेरिका आणि युरोपमध्ये स्थायिक झालेले आहेत आणि तिथे कमाई करून तेथील शासनाला कररुपाने भरभकम पैसा देताहेत. भारताला १० ट्रिलियन डॉलरचे उद्दिष्ट गाठायचे असेल तर हा ब्रेन ड्रेन रोखणे अत्यंत गरजेचे आहे.

अलीकडच्या काळात या ब्रेन ड्रेनसंदर्भात जाहीर झालेले आकडे अत्यंत धक्कादायक आहेत. अमेरिकेमध्ये दर १३०० लोकांमागे १ भारतीय डॉक्टर आहे. इंग्लंडमध्येही दर १००० लोकांमागे १ भारतीय डॉक्टर किंवा हेल्थवर्कर दिसून येतो. वस्तुतः, या कौशल्यवान, प्रज्ञावंतांची भारतालाही गरज आहे. परंतु भारताला बगल देत परदेशांकडे धाव घेण्याचा प्रवाह हा कमालीचा वाढत चालला आहे.

अडीचशे वर्ष अन्यायी राजवट करणाऱ्या ब्रिटिशांनी भारताची प्रचंड लूट केली होती. त्यामुळे स्वातंत्र्यानंतर स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी, उद्योगधंद्यांच्या विकासासाठी स्किल्ड मॅनपॉवरची म्हणजेच कौशल्यपूर्ण मनुष्यबळाची प्रचंड गरज होती. यासाठी आयआयटी आणि आयआयएमची निर्मिती करण्यात आली. त्यांना मोठमोठे कॅम्पस देण्यात आले. त्यांना मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध करून देण्यात आले. त्यातून मोठ्या प्रमाणावर उच्चशिक्षित कौशल्यपूर्ण मनुष्यबळ तयार झाले; परंतु या विद्यावानांना त्यांच्या प्राविण्याला पूरक ठरतील अशा रोजगारसंधी देशात उपलब्ध होत नव्हत्या. सरकारी क्षेत्रातील काही कंपन्यांची उद्योगधंद्यांमध्ये मतेदारी होती. त्यामुळे या बुद्धीवंतांचे अमेरिका आणि अन्य प्रगत देशांमध्ये स्थलांतर होऊ लागले. तेथे त्यांना रोजगाराच्या चांगल्या संधी मिळू लागल्या; तथापि, आज ७५ वर्षांनंतरही हा प्रवाह तसाच कायम आहे.

आज भारत शिक्षणक्षेत्रावर सुमारे ८५ हजार कोटी रुपये खर्च करतो. यापैकी जवळपास २५ टक्के निधी आयआयटी आणि आयआयएमसारख्या उच्च शिक्षण संस्थांवर खर्च केला जातो. अर्थात, या संस्थांची प्रवेश क्षमता खूप कमी आहे. त्यामुळे अगदी मूठभर लोकांना आयआयटी-आयआयएममध्ये प्रवेश मिळतो. प्रत्यक्षात आपल्याकडे गुणवत्तेची कमतरता नाही. त्यामुळे या संस्थांमध्ये प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांना ग्रेड -२, ग्रेड ३ शिक्षणसंस्थांमध्ये प्रवेश घ्यावा लागतो. साहजिकच अशा वेळी हे विद्यार्थी या संस्थांपेक्षा परदेशातील शिक्षण संस्थांमध्ये प्रवेश का घेऊ नये असा विचार करतात. कारण अव्वल संस्थांव्यतिरिक्त अन्य शिक्षणसंस्थांमधील अभ्यासक्रम विद्यार्थ्यांमध्ये किती प्रमाणात कौशल्य निर्माण करतात, त्यांना किती प्रमाणात इंटर्नशिप मिळते, कॅम्पस इंटरव्ह्यूमधून किती जणांना रोजगार मिळतो याबाबत प्रश्नचिन्ह आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचे पालक ४०-५० लाखांचे कर्ज घेऊन मुलाला परदेशातील नामवंत शिक्षणसंस्थेत प्रवेश घेऊन दिला तर त्याच्यातील कौशल्यविकसन होईल, इंटर्नशिप चांगली मिळेल आणि पुढे जाऊन चांगला रोजगार मिळून त्याची कारकिर्दीची गाडी सुरळित होईल, असा विचार करतात. यातून परदेशी शिक्षणाकडे असणारा ओढा दिवसेंदिवस वाढत चालला आहे. याचे मूळ भारतातील अत्यंत प्राविण्यदायी शिक्षण 'एसलुझिव्ह' बनले आहे, या वास्तवात आहे. प्रत्यक्षात ते 'इनक्लूझिव्ह' बनण्याची गरज आहे. त्यामध्ये अधिकाधिक मुलांचा समावेश होणे गरजेचे आहे. यासाठी आयआयटी, आयआयएमची संख्या वाढवण्याची गरज आहे. लोकसंख्येच्या तुलनेत विद्यापीठांची संख्या पाहिल्यास, जपान आणि अमेरिकेमध्ये भारताच्या तुलनेत कितीतरी अधिक प्रमाणात विद्यापीठे आहेत. तसेच तेथे उच्च शिक्षणातील ग्रॉस एन्रोलमेंट रेशोही खूप अधिक आहे. भारतामध्ये प्रचंड प्रमाणात पैसा खर्च करूनही नामांकित उच्च शिक्षणसंस्थांमधील एन्रोलमेंटचे प्रमाण अत्यल्प असल्यामुळे मोठी समस्या निर्माण झाली आहे. दुसरीकडे ग्रेड-२ आणि ग्रेड ३ दर्जाच्या शैक्षणिक संस्थांकडून तयार करण्यात येणारे बहुतांश अभ्यासक्रम हे 'मार्केट ओरिएंटेड' नाहीयेत. बाजारपेठेची मागणी काय आहे, बाजारपेठेला कोणत्या कौशल्याची गरज आहे यामध्ये सातत्याने बदल होताहेत; पण त्याला पूरक असणारे अभ्यासक्रम बनवले जात नाहीयेत. त्यामुळे देशात पदवीधरांची संख्या वाढलेली असली तरी रोजगारक्षम मनुष्यबळाची कमतरता आहे. ही कोंडी फोडणे अत्यंत गरजेचे आहे.

भारताची शैक्षणिक क्षेत्रातील अन्य एक समस्या म्हणजे, आपल्याकडे अन्य देशांच्या तुलनेत संशोधन आणि विकासावर अत्यंत कमी प्रमाणात पैसा खर्च केला जातो. हा आकडा एकूण जीडीपीच्या केवळ ०.७ टक्के इतका आहे. यामध्ये भरीव वाढ होण्याची गरज आहे. आज अनेक छोट्या-छोट्या देशांनी रिसर्च अँड डेव्हलपमेंटवर मोठ्या प्रमाणावर खर्च करून आपला विकास साधला आहे. जपानसारखा देश याचे उत्तम उदाहरण म्हणावे लागेल. मुंबईएवढे




क्षेत्रफळ असणाऱ्या जपानवर दुसऱ्या महायुद्धात दोन अणुबॉम्ब टाकण्यात आले होते. जपानची राज्यघटनाही अमेरिकेच्या पुढाकाराने लिहिली गेलेली आहे. असा देश १९७० पर्यंत जगातील दुसऱ्या क्रमांकाची मोठी अर्थव्यवस्था कशी बनला, याचे अप्रूप जगाला आहे. कारण अत्यंत कमी क्षेत्रफळ, कमी लोकसंख्या असताना, विकासासाठी सकारात्मक परिस्थिती फारशी नसताना जपानने केलेला हा आर्थिक विकास एक यशस्वी मॉडेल मानला जातो. याचे गमक कशात असेल तर ते म्हणजे जपानने ह्युमन कॅपिटल किंवा मानव संसाधन विकासावर प्रचंड गुंतवणूक केली. शिक्षणाच्या क्षेत्रात मोठी गुंतवणूक केली आणि त्यातून अत्यंत कुशल मनुष्यबळ विकसित केले. यासाठी जपानने जीडीपीच्या ४ ते ५ टक्के पैसा खर्च केला. इस्राईलसारख्या छोट्या देशाचे उदाहरण घेतल्यास या देशाला सातत्याने शेजारच्या देशांशी संघर्ष करावा लागत आहे. सध्याही हमाससोबतची त्यांची लढाई सुरू आहे. असे असतानाही इस्राईलने जगाला अचंबित करणारी क्रांती घडवून आणली याचे मूळ त्यांनी संशोधन आणि विकासावर केलेल्या खर्चामध्ये आहे. जपानप्रमाणेच इस्राईलही जीडीपीच्या ४ ते ५ टक्के निधी यासाठी खर्च करतो. या माध्यमातून इस्राईलने एक उत्तम स्टार्टअप इकोसिस्टीम तयार केली आहे. विशेष म्हणजे यासाठी ते अमेरिकेच्या लोकांना त्यांच्या देशात बोलावतात आणि त्या स्टार्टअपमध्ये गुंतवणूक करण्यास सांगतात. इस्राईलचे मॉडेल स्टार्टअप्ससाठी अत्यंत आदर्श मानले जाते. भारतानेही स्टार्टअप इंडियासारखा कार्यक्रम हाती घेतल्यानंतर अलीकडील काळात देशात स्टार्टअप्सची संख्या प्रचंड वाढली आहे; परंतु अद्यापही त्यांना दिला जाणारा निधी कमी आहे.

या सर्व पार्श्वभूमीवर विचार करता भारतामध्ये आपल्याला मेक इन इंडिया, आत्मनिर्भर भारतच्या माध्यमातून उत्पादनक्रांती घडवून आणायची असेल आणि चीनप्रमाणे एस्पोर्ट हब बनायचे असेल तर उद्योग आणि शिक्षण यांच्यातील दरी सांधली गेली पाहिजे. त्यांच्यात सुसंगतपणा आला पाहिजे. येणाऱ्या दहा वर्षांमध्ये कोणत्या क्षेत्रांना अधिक मागणी असणार आहे, त्या क्षेत्रामध्ये कोणत्या कौशल्यांची गरज भासणार आहे अशा स्वरुपाची सर्वेक्षणे करण्याची गरज आहे आणि त्यानुसार महाविद्यालयांमध्ये अभ्यासक्रम विकसित केले गेले पाहिजेत. आज भारत डिजिटल इंडियाच्या माध्यमातून डिजिटल इन्फ्रास्ट्रक्चर मोठ्या प्रमाणावर विकसित करत आहे. त्यादृष्टिकोनातून कोणत्या प्रकारचे प्रावीण्य असणारे उमेदवार आपल्याला भविष्यात लागणार आहेत, याचा विचार करून त्यानुसार अभ्यासक्रम सुरू झाले पाहिजेत. आज सबंध जगभरात आर्टिफिशियल इंटेलिजन्सची चर्चा होत आहे. पुढील काळात एआयचा शिरकाव जवळपास सर्वच क्षेत्रात होणार आहे. साहजिकच त्यासंबंधी कौशल्य, प्राविण्य असणाऱ्या उमेदवारांना येणाऱ्या काळात मोठी मागणी असणार आहे. हे लक्षात घेऊन तशा प्रकारचे अभ्यासक्रम महाविद्यालयांमधून आतापासूनच शिकवले जाणे गरजेचे आहे. पश्चिम युरोप आणि अमेरिकेमध्ये असा प्रकार मोठ्या प्रमाणावर पहायला मिळतो. तेथे यासाठी स्वतंत्र एजन्सीज आहेत. त्यांच्याकडून यासंदर्भात सर्वेक्षणे केली जातात आणि त्यातून पुढील वीस वर्षांचा आराखडा तयार केला जातो. अमेरिकेची नॅशनल सियुरिटी पॉलीसी दर तीस वर्षांनी तयार केली जाते, तशाच प्रकारे पुढील वीस वर्षांमध्ये कोणत्या क्षेत्राला सर्वाधिक मागणी राहणार आहे, त्यासाठी कोणती कौशल्ये गरजेची आहेत याचा विचार करून त्यानुसार मानवसंसाधन विकास केला जातो. आज अनेक पश्चिम युरोपियन देशांमध्ये अपारंपरिक ऊर्जेशी संबंधित विविध अभ्यासक्रम तयार केले जात आहेत. अशा स्वरुपाचे अभ्यासक्रम भारतात तयार होणे आवश्यक आहे.

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये ४० टक्के भर हा कौशल्यनिर्मिती आणि वृद्धीवर देण्यात आला आहे. त्याची अंमलबजावणी काटेकोरपणाने होणे गरजेचे आहे. त्यातून हा 'ब्रेन ड्रेन' थांबवता येणे शक्य होईल. मध्यंतरी, विद्यापीठ अनुदान आयोगाने (युजीसी) एक महत्त्वपूर्ण निर्णय घेत परदेशी विद्यापीठांना भारतामध्ये कॅम्पसेस काढण्याची संमती दिली आहे. परंतु जोवर आयआयटी-आयआयएममधून प्राविण्य प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांना अनुरुप असा रोजगार तयार होत नाही, जोवर बाजारपेठेच्या मागणीनुसार कौशल्य विकसित करणारे अभ्यासक्रम महाविद्यालयांमधून शिकवले जात नाहीत आणि जोवर संशोधन व विकासावरील खर्चात वाढ होत नाही तोवर भारतातून होणारा ब्रेन ड्रेन थांबणार नाही. त्यासाठी आपल्या संपूर्ण शिक्षण प्रक्रियेमध्ये 'कौशल्य विकास' या घटकावर सर्वाधिक भर देण्याला प्राधान्य दिले गेले पाहिजे.



# महाराष्ट्रातील तंत्र शिक्षण : प्रगतीची नवी दिशा

**प्रा. डॉ. विनोद मोहितकर**
संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

तंत्र शिक्षण हे कोणत्याही राष्ट्राच्या औद्योगिक, आर्थिक आणि सामाजिक विकासाचा मजबूत पाया आहे. महाराष्ट्र राज्याने या क्षेत्रात दर्जात्मक सुधारणा घडवण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले आहेत. तंत्र शिक्षण संचालनालयाच्या प्रभावी अंमलबजावणीमुळे महाराष्ट्रातील तंत्र शिक्षण अधिक सक्षम, अद्ययावत आणि उद्योगक्षम होत आहे. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या प्रभावी अंमलबजावणीसह, बहुविद्याशाखीय शिक्षण, मातृभाषेतून शिक्षण, अकॅडेमिक बँक ऑफ क्रेडिट्स यांसारख्या नावीन्यपूर्ण उपक्रमांमुळे तंत्र शिक्षणाला नवसंजीवनी मिळाली आहे. या बदलांमुळे केवळ विद्यार्थ्यांचे भविष्य उज्वल होत नाही, तर महाराष्ट्राचा औद्योगिक आणि आर्थिक विकासही अधिक वेगाने घडतो आहे.

महाराष्ट्र राज्यातील अभियांत्रिकी, वास्तुकला, औषधनिर्माणशास्त्र, प्लॅनिंग, डिझाईन आणि हॉटेल व्यवस्थापन आणि कॅटरिंग तंत्रज्ञान व एम.बी.ए या अभ्यासक्रमांसाठी केंद्र आणि राज्य शासनाने तयार केलेली धोरणे, नियम, मार्गदर्शक तत्त्वे यांची अंमलबजावणी करण्यासाठी महाराष्ट्रात तंत्रशिक्षण संचालनालयाची स्थापना करण्यात आलेली आहे.

शासनाच्या धोरणांनुसार शासकीय संस्थांमध्ये पायाभूत सुविधा विकसित करणे, खासगी संस्थांना मार्गदर्शन करणे, व्यावसायिक संस्था आणि नामांकित राष्ट्रीय स्तरावरील संस्थांशी सुसंवाद वाढविणे हे तंत्रशिक्षण संचालनालयाचे मुख्य उद्दिष्ट आहे. विविध अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश घेतलेल्या आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय, अल्पसंख्यांक आणि महिला विद्यार्थ्यांना केंद्र आणि राज्य शासनाच्या विविध शिष्यवृत्ती योजना उपलब्ध आहेत. या विविध योजनांची यशस्वी अंमलबजावणी करण्यात संचालनालयाचे मोलाचे योगदान आहे. उद्योगांनी केवळ नोकऱ्या देणे आणि नफा मिळवणे इतकेच काम करू नये. त्यांनी त्यांच्या समाजाप्रती असलेल्या कर्तव्याला जागत सामाजिक उत्तरदायित्व निधी (Corporate Social Responsibility - CSR) कार्यक्रम आयोजित करावेत म्हणून संचालनालयाने मोलाचे योगदान दिले आहे. शासनाच्या विविध योजना/प्रकल्पांची योग्यरित्या अंमलबजावणी करण्यात आली असून, यातून प्राप्त झालेल्या अर्थसहाय्याचा उपयोग महाराष्ट्र राज्यातील तांत्रिक शिक्षणाच्या उन्नतीसाठी करण्यात आलेला आहे. संचालनालयाच्या राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्षामार्फत (CET Cell) सर्व तांत्रिक व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश परिक्षा घेतल्या जातात. या परीक्षा स्वतंत्र, निष्पक्ष व पारदर्शक पद्धतीने, पार पाडण्यासाठी व कालबद्ध केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया राबविण्यासाठी सहाकार्य करणे हे संचालनालयाचे एक वैशिष्ट्यपूर्ण कार्य आहे. उत्कृष्ट कामगिरी केलेल्या संस्थांना स्वायत्त दर्जाची मान्यता दिल्यास तंत्र शिक्षणाच्या गुणवत्तेत वाढ होते. त्यामुळे तसे करण्यात संचालनालयाने पुढाकार घेतला आहे. राज्यात झालेली तांत्रिक शिक्षणाच्या दर्जातील सुधारणा ही यातून झालेली फलनिष्पत्ती आहे. इतर राज्ये आणि राष्ट्रीय विभाग व संघटनांशी समन्वय साधून त्यातून मोठ्या प्रमाणात उद्योग व समाजाच्या विकासास हातभार लावण्याचे काम देखील संचालनालय पार पाडत असते.

याव्यतिरिक्त राज्यातील शासकीय/ अनुदानित अभियांत्रिकी आणि पदविका संस्था मधील अध्यापकांना औद्योगिक क्षेत्रामध्ये प्रशिक्षणाच्या संधी संचालनालय उपलब्ध करून देते. औद्योगिक संस्था आणि तंत्र शिक्षण संचलनालय यांच्या आधीन असणाऱ्या संस्था यांचेमध्ये सामंजस्य आणि सहकार्य वृध्दींगत करणे यासाठी संचालनालय प्रयत्नशील असते. पदवी व पदविकाधारकांना उद्योगधंद्यामधून प्रशिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देणे, त्यांची रोजगारक्षमता वाढविणे यासाठी योग्य असे प्रशिक्षण दिले पाहिजे. याकरता राज्यातील सर्व औद्योगिक क्षेत्रातील ऑनलाइन प्रशिक्षण आणि अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्यासाठी संचालनालय सतत प्रयत्नशील आहे.

### तंत्र शिक्षण संचालनालयाद्वारे राबविण्यात येत असलेले विविध उपक्रम

**1) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण - 2020 मध्ये तंत्र शिक्षण संचालनालयाचा पुढाकार :**

**अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रम :**

राज्यामध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या अंमलबजावणीसाठी सुकाणू समिती गठीत करण्यात आली आहे. समितीच्या शिफारशीनुसार अभ्यासक्रम व श्रेयांक आराखड्याची राज्यामध्ये एकसमान प्रमाणात अंमलबजावणी केली गेली पाहिजे. यासाठी पहिल्या टप्प्यात कला, वाणिज्य व विज्ञान शाखेतील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी सुधारित मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या गेल्या.

यानंतरच्या शासन निर्णयाद्वारे अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रम व श्रेयांक आराखडा याबाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित केलेल्या आहेत. त्यांना अनुसरुन शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या ५८ स्वायत्त संस्थांमधील (Autonomous Institutes) पदवी अभ्यासक्रमांसाठी अभ्यासक्रम व श्रेयांक आराखड्याची अंमलबजावणी करण्यांत आलेली आहे. शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून सर्वच अभियांत्रिकी संस्थांमध्ये या धोरणाची अंमलबजावणी सुरू करण्यांत आलेली आहे.

### राष्ट्रीय शैक्षणिक धोरण - 2020 ची अभियांत्रिकी शिक्षणाच्या दृष्टीने वैशिष्ट्ये :

**• बहुविद्याशाखीय शिक्षण :**

बहुविद्याशाखीय शिक्षण म्हणजेच विविध क्षेत्रातील ज्ञान आणि कौशल्ये एकत्रित करणे, ज्यामुळे विद्यार्थ्यांना केवळ एका विद्याशाखेवर लक्ष केंद्रित करण्याऐवजी आवडीनुसार इतर विद्याशाखांतील विषयांचा अभ्यास करता येतो. विज्ञान, कला, तंत्रज्ञान, वाणिज्य, इ. विषयांना एकत्रित करून, विविध दृष्टीकोनातून व्यापक विचार आणि समस्या सोडवण्यास प्रोत्साहित करणे हा बहुविद्याशाखीय शिक्षणाचा उद्देश आहे. यामुळे विद्यार्थ्यांना अनेक क्षेत्रांतील ज्ञान संपादन करणे, व्यावहारिक समस्या सोडविणे आणि विविध करिअर मार्गांची निवड करणे शक्य होईल.

**• Multiple Entry Multiple Exit :**

विद्यार्थ्यांना त्यांच्या भविष्यातील करिअरच्या गरजेनुसार प्रत्येक वर्षी बाहेर पडण्याची मुभा आहे. जे विद्यार्थी एका वर्षानंतर बाहेर पडतील अशा विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र, दोन वर्ष पूर्ण करून बाहेर पडणाऱ्यांना पदविका, तीन वर्ष पूर्ण करून बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांना व्यायसायिक पदवी तर संपूर्ण कोर्स पूर्ण करून बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात येणार आहे.

विद्यार्थ्यांनी, कोणत्याही स्तरावर बाहेर पडण्याचा पर्याय निवडल्यास, त्यांनी सोडलेल्या अभ्यासक्रमात, त्याच

किंवा वेगळ्या उच्च शिक्षण संस्थेत पुन्हा प्रवेश घेण्याचा आणि पदवी कार्यक्रम पूर्ण करण्याचा पर्याय असेल. सदरचा पुनर्प्रवेश शैक्षणिक बँक ऑफ क्रेडिट्स (ABC) मध्ये जमा केलेल्या आणि विद्यार्थ्यांनी कमावलेल्या वैध श्रेयांकावर आधारित असेल.

- **अकॅडेमिक बँक ऑफ क्रेडिट्स (ABC)**

सर्व अकृषी विद्यापीठे/ स्वायत्त संस्थांनी अकॅडेमिक बँक ऑफ क्रेडिट्स (ABC) वर नोंदणी करण्यास प्रोत्साहन देणे. एखाद्या संस्थेतील एका विषयासाठी विद्यार्थ्याला दिलेली क्रेडिट्स एबीसी प्रणालीद्वारे विद्यार्थ्याच्या संमतीनुसार दुसऱ्या संस्थेद्वारे हस्तांतरित/रिडीम केली जाऊ शकतात, सर्व विद्यार्थ्यांनी ABC वर नावनोंदणी केल्यानंतर त्या विद्यार्थ्याने मिळवलेली सर्व क्रेडिट्स विद्यार्थ्याच्या ABC खात्यात दिसून येतात.

- **मातृभाषेतून किंवा प्रादेशिक भाषेत शिक्षण :**

मातृभाषेतून किंवा प्रादेशिक भाषेत शिक्षण घेण्याचे अनेक फायदे आहेत. आधीच परिचित असलेल्या मातृभाषेतून शिक्षणाच्या सुविधेमुळे विद्यार्थ्यांना संकल्पना अधिक सहजपणे आकलन होण्यास मदत होते. हा दृष्टीकोन मूलभूत ज्ञान आणि संख्यात्मक कौशल्ये देखील मजबूत करतो, सखोल शिक्षणास प्रोत्साहन देतो आणि भाषेमुळे येणारी अडचण कमी करतो. याव्यतिरिक्त, मातृभाषेतील शिक्षणामुळे सांस्कृतिक संबंध आणि आत्मविश्वास वाढतो तसेच अधिक समावेशक आणि आपलेपणाचे भावना निर्माण करतो.

- **इंटर्नशिप/अप्रेंटिसशिप कार्यक्रम :**

इंटर्नशिप/अप्रेंटिशिप कार्यक्रम विद्यार्थ्यांना व्यावहारिक, उद्योग-संबंधित कौशल्ये प्रदान करतात, त्यांची रोजगारक्षमता आणि नोकरीची संधी वाढवतात. विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभव मिळविण्यास आणि व्यावहारिक जीवनातील ज्ञान प्राप्त करण्यास याची निश्चितच मदत होते.

- **संस्थात्मक स्वायत्तता वाढवणे :**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP) 2020 मध्ये नमूद केल्यानुसार पारंपारिक विद्यापीठांकडून हळूहळू विभक्त होऊन संस्थात्मक स्वायत्तता वाढविणे शक्य होणार आहे. यामुळे उच्च शिक्षणामध्ये नवकल्पना विकसित करणे अधिक सुलभ होईल. तसेच पारंपारिक विद्यापीठ संरचनांवरील अवलंबित्व कमी होऊन, संस्थांना प्रादेशिक आणि जागतिक मागण्या पूर्ण करण्यासाठी, आंतरविद्याशाखीय शिक्षणास प्रोत्साहन देण्यासाठी आणि स्थानिक आव्हानांना सामोरे जाणाऱ्या संशोधनाला प्रोत्साहन देण्यासाठी त्यांचा अभ्यासक्रम तयार करता येईल. या बदलामुळे संस्था गुणवत्तापूर्ण शैक्षणिक दृष्टीकोन विकसित करण्यासाठी, उद्योग समुहांसोबत सहकार्य वाढवण्यासाठी सक्षम होतील. यामुळे तंत्र शिक्षणाचा दर्जा सुधारणे तसेच समाजाच्या गरजांशी निगडीत उपाय योजना संबंधित प्रकल्प विकसित करणे सुकर होणार आहे. अशा प्रकारे विद्यार्थ्यांना सामाजिक सहभागासाठी अधिक चांगल्या प्रकारे तयार करणे शक्य आहे.

**अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रम :**

महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाने (MSBTE) शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून सर्व अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमांसाठी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० ची अंमलबजावणी सुरू केली आहे. त्याअनुषंगाने राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० शी सुसंगत असलेल्या तसेच AICTE, NHEQF, NCrF च्या मार्गदर्शक तत्त्वांशी संरेखित केलेल्या ५० डिप्लोमा प्रोग्राम्सचा डिप्लोमा-स्तरीय आय-स्कीम (I-Scheme) अभ्यासक्रम सुधारित केला आहे. सुधारित अभ्यासक्रमाला "के-स्कीम" असे संबोधले जाते आणि त्याची अंमलबजावणी सन २०२३-२०२४ पासून करण्यात आलेली आहे.

या स्कीम अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून पदविका स्तरावरील द्विभाषिक शिक्षणाला सुरुवात झालेली असून, मराठीतून शिक्षण देण्यासाठी विविध ३८ अभ्यासक्रमांमध्ये शैक्षणिक साहित्य तयार करण्यात आलेले आहे. व ते विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्यात आलेले आहे. तसेच, शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून इच्छुक विद्यार्थ्यांसाठी हिंदीमध्ये शिक्षणाची सोय देखील सुरू करण्यात आली आहे. शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये मराठी/इंग्रजी द्विभाषिक अभ्यासक्रम शिकविणाऱ्या संस्थांची संख्या १८५ असून, त्यामध्ये एकूण ३९३४२ विद्यार्थी प्रवेशित होते. तसेच हिंदी-इंग्रजी द्विभाषिक अभ्याक्रम शिकविणाऱ्या संस्थांची संख्या ३ असून त्यामध्ये प्रवेशित विद्यार्थी संख्या ६८४ होती.

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-2020 अंतर्गत पदविका अभ्यासक्रमांची ठळक वैशिष्ट्ये :**

- नवीन अभ्यासक्रमात प्रात्यक्षिके आणि निरंतर मूल्यांकन यावर अधिक भर देण्यात आला आहे.
- राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार विद्यार्थ्यांना त्यांच्या भविष्यातील करिअरच्या गरजेनुसार प्रत्येक वर्षी बाहेर पडण्याची मुभा आहे. त्या नुसार विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र(एक वर्षाचा अभ्यासक्रम केल्यास), व्यावसायिक अभ्यासक्रम पदविका (दोन वर्षाचा अभ्यासक्रम केल्यास) आणि पदविका (तीन वर्षांचा संपूर्ण अभ्यासक्रम पूर्ण केल्यास) प्रदान करण्यात येणार आहे.
- सर्व अकृषी विद्यापीठे/ स्वायत्त संस्थांनी अकॅडेमिक बँक ऑफ क्रेडिट्स (ABC) वर नोंदणी करण्यास प्रोत्साहन : एखाद्या संस्थेतील एका विषयासाठी विद्यार्थ्याला दिलेली क्रेडिट्स एबीसीद्वारे विद्यार्थ्याच्या संमतीनुसार दुसऱ्या संस्थेद्वारे हस्तांतरित/रिडीम केली जाऊ शकतात, सर्व विद्यार्थ्यांनी ABC वर नावनोंदणी केल्यानंतर त्या विद्यार्थ्याने मिळवलेली सर्व क्रेडिट्स विद्यार्थ्याच्या ABC खात्यात दिसून येतात.
- विद्यार्थ्यांनी, कोणत्याही स्तरावर बाहेर पडण्याचा पर्याय निवडल्यास, त्यांनी सोडलेल्या कार्यक्रमात, त्याच किंवा वेगळ्या उच्च शिक्षण संस्थेत पुन्हा प्रवेश करण्याचा आणि पदवी कार्यक्रम पूर्ण करण्याचा पर्याय असेल. सादर पुनर्प्रवेश शैक्षणिक बँक ऑफ क्रेडिट्स (ABC) मध्ये जमा केलेल्या, कमावलेल्या आणि वैध क्रेडिट्सवर आधारित असतील.
- उद्योग प्रशिक्षणाचा कालावधी ६ आठवड्यावरुन १२ आठवड्यापर्यंत वाढविण्यांत आलेला आहे.
- विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण वाढीला चालना देण्यासाठी योग, आरोग्य इत्यादी विषयांचा अभ्यासक्रमात समावेश करण्यात आला आहे.
- 'इमर्जिंग ट्रेंड' नावाच्या कोर्सचा अभ्यासक्रामात समाविष्ट केला आहे. नवीन उदयोन्मुख तंत्रज्ञानाची ओळख होण्यासाठी हा कोर्स उपयुक्त असून दर दोन वर्षांनी तो अद्ययावत करण्यात येणार आहे.
- पारंपरिक अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांना कौशल्यावर आधारित तांत्रिक विषयांचे पर्याय उपलब्ध करून दिले पाहिजेत. यासाठी तंत्र शिक्षण मंडळाने पदविका अभ्यासक्रमातील संबंधित विषयांची तसेच काही नवीन विषयांची निश्चिती करून एकूण तेरा विषयांचे पाठ्यक्रम विकसित केले आहेत.

**2) महाराष्ट्र ड्रोन मिशन :**

ड्रोन (Drone or Unmanned Aerial Vehicle (UAV) हे संगणक प्रणालीच्या आधारे नियंत्रित केले जाणारे चालक विरहीत वायुयान असून यामध्ये Rotocraft, Fixed Wings, Hybrid/Vertical take-off and Landing (VTOL), Baloon system इत्यादी प्रकार समाविष्ट आहेत. ड्रोन तंत्रज्ञानाच्या वाढत्या वापरामुळे औद्योगिक क्षेत्रामध्ये अनेक क्रांतीकारक बदल घडून आले असून जटील व आव्हानात्मक समस्या सोडविण्यास तसेच वेळेची बचत होण्यास या तंत्रज्ञानामुळे मदत होत आहे.

राज्यामध्ये अत्याधुनिक ज्ञानावर आधारीत ड्रोन मिशनची आखणी व प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी एक सर्वसमावेशक यंत्रणा तयार करण्याची गरज आहे. याकरता भारतीय तंत्रज्ञान संस्था मुंबई (IIT Bombay) यांच्या सहयोगाने दिनांक 28 डिसेंबर, 2023 रोजी एक प्रकल्प कार्यान्वीत करण्यांत आलेला आहे. तसेच ड्रोन मिशन प्रकल्पांतर्गत अंमलबजावणी संबंधित उद्भवणाऱ्या राज्य स्तरावरील समस्यांबाबत विचारविनिमय करून निर्णय घेणे, विविध प्रशासकीय विभागांसोबत समन्वय राखणे, निधीची उपलब्धता, प्रकल्प अंमलबजावणीचा वेळोवेळी आढावा घेणे, विस्तृत प्रकल्प अहवालाच्या आधारे आवश्यकतेनुसार अंतर्गत घटकांसाठी उपलब्ध निधीचे फेरबदल करणे, विभागीय स्तरावरील संस्था अंतिम करणे, जिल्हा केंद्रे निश्चित करणे व संबंधित घटकांना मार्गदर्शन करणे याकरिता शासन निर्णयाद्वारे दि. २८ डिसेंबर, २०२३ रोजी "महाराष्ट्र ड्रोन मिशन" या उपक्रमास मान्यता दिलेली आहे. या अंतर्गत राज्यातील अभियांत्रिकी शैक्षणिक व संशोधन संस्था, शासकीय यंत्रणा, औद्योगिक आस्थापना यांच्या सहभागाने ड्रोन तंत्रज्ञान विकसित करण्याचा प्रस्ताव आहे. यामध्ये विविध विभागस्तरीय व जिल्हास्तरीय ड्रोन केंद्राचे जाळे (Network of Drone Centers) स्थापन करण्याचे प्रस्तावित आहेत. ड्रोन केंद्राचे मुख्यालय आयआयटी, मुंबई या संस्थेमध्ये स्थापन करण्याचे प्रस्तावित आहे. या प्रस्तावामध्ये ड्रोन मिशनची उद्दिष्टे, विविध क्षेत्रांमधील ड्रोन तंत्रज्ञानाच्या संभाव्य उपयोगाची क्षमता, संधी तसेच या क्षेत्रातील आव्हाने, ड्रोन तंत्रज्ञानाशी संबंधित प्रचलित नियम व कायदे, केंद्र शासनाचे धोरण, अपेक्षित साध्ये (Expected Deliverables) यांचा समावेश आहे. तसेच राज्याच्या अर्थव्यवस्थेशी निगडीत विविध क्षेत्रांमध्ये या तंत्रज्ञानाचा वापर करता येणे शक्य आहे. त्यामध्ये प्रामुख्याने कृषी, पुरवठा व वितरण, आपत्ती व्यवस्थापन, वाहतूक नियंत्रण, सर्वेक्षण, सुरक्षा व्यवस्थेचे संनियंत्रण, नैसर्गिक साधन संपत्तीचे व्यवस्थापन इत्यादी क्षेत्रांचा समावेश होतो.

याकरीता राज्यस्तरीय ड्रोन प्रकल्प सनियंत्रण समिती गठित करण्यांत आलेली आहे. या योजनेकरीता पुढील ५ वर्षांसाठी रु. २३८.६३ कोटी इतका निधी उपलब्ध करून देण्यांत येईल. सद्यस्थितीत भारतीय तंत्रज्ञान संस्था मुंबई (IIT Bombay) या संस्थेमार्फत तयार करण्यांत आलेल्या विस्तृत प्रकल्प अहवालास (DPR) राज्यस्तरीय ड्रोन प्रकल्प सनियंत्रण समितीची मान्यता मिळाली आहे. त्यानुसार आयआयटी, मुंबई या संस्थेस रु. १५.०० कोटी वितरीत करण्यांत आलेले आहेत. तसेच आयआयटी, मुंबई या संस्थेमार्फत काही प्रमाणात ड्रोन चे Prototype तयार करण्यांत आलेले असून, त्याच्या अंतिम चाचण्या सुरु आहेत.

**3) परिस स्पर्श योजना :**

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये शिक्षणाची गुणवत्ता वाढविणे हा महत्त्वाचा मुद्दा असून, शैक्षणिक गुणवत्ता वाढीच्या अनुषंगाने महाविद्यालयांचे नॅक प्रमाणन करणे तसेच नॅशनल बोर्ड ऑफ अॅक्रेडिटेशनचे NBA प्रमाणन करणे आवश्यक आहे. त्यानुसार राज्यातील नॅक मुल्यांकन व NBA मुल्यांकन न झालेल्या महाविद्यालयांचे मुल्यांकन होण्याच्या दृष्टीकोनातून महाराष्ट्र शासनाने शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र. संकीर्ण-2022/प्रक्र.279/विशि-3, दि. 19-4-2023 च्या शासन निर्णयान्वये परिस-स्पर्श योजना सुरु केली आहे.

या योजनेंतर्गत नॅक/एनबीए मुल्यांकन आणि प्रमाणिकरण असलेले व अनुकरणीय रेकॉर्ड असलेले महाविद्यालय हे मार्गदर्शक (मेंटॉर) म्हणून कार्यरत असून त्यांच्या मार्गदर्शनाव्दारे नॅक/एनबीए मुल्यांकन न झालेल्या (मेंटी) संस्था मुल्यांकनासाठी प्रयत्न करतात.

पहिल्या टप्प्यात १३० मेंटी (Mentee) आणि २४ मार्गदर्शक (Mentor) महाविद्यालयांची निवड करण्यांत आलेली होती. या योजनेंतर्गत आतापर्यंत ३६ मेंटी संस्थांमधील ९२ कोर्सेसना मानांकन प्राप्त झालेले आहे. तसेच ६० अभ्यासक्रमांच्या मानांकनाबाबतची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

**4) आयआयटी, मुंबई यांचेसोबत सहकार्य करार :**

तंत्र शिक्षण संचालनालय व आयआयटी, मुंबई यांच्यात दिनांक ३१ जुलै, २०२३ रोजी सामंजस्य करार करण्यांत आलेला आहे. या करारानुसार तंत्र शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील पदवी संस्थांमधील विद्यार्थ्यांच्या इंटर्नशिप तसेच संस्थांतील संशोधन व विकास यांसाठी आयआयटी,



**आयआयटी -बी बरोबर सामंजस्य करार**

मुंबई यांचा सहयोग प्राप्त होईल. या संस्थांतील विद्यार्थी व शिक्षकांना प्रशिक्षण देण्यासाठी आयआयटी मुंबई यांचे सहकार्य मिळेल तसेच आयआयटी, मुंबई येथील संशोधन व विकास (Research & Development) सुविधांचा लाभ देखील या संस्थांतील विद्यार्थी व प्राध्यापकांना मिळेल.

या सामंजस्य करारामुळे तंत्र शिक्षण संस्थांमधील अध्यापकांना अध्ययन, संशोधन विकास व विस्तार या बाबींसाठी आयआयटी, मुंबई सारख्या जागतिक दर्जाच्या संस्थेचे मार्गदर्शन लाभणार असून संस्थांमधील एकूणच शैक्षणिक गुणवत्ता उंचावण्यास मदत होणार आहे.

या उपक्रमांतर्गत आजवर एकूण १७ विद्यार्थ्यांनी सहा महिन्यांची आंतरवासियता (इंटर्नशिप) पूर्ण केलेली असून, ०६ विद्यार्थ्यांनी ४५ दिवस कालावधीची इंटर्नशिप पूर्ण केलेली आहे. एकूण ४९ अध्यापकांनी अध्यापक प्रशिक्षण कार्यक्रमांचा लाभ घेतलेला असून, १० संस्थांनी कार्यशाळा/तज्ञांचे मार्गदर्शन आयोजित केलेले आहे. त्याचप्रमाणे २५ अध्यापक/विद्यार्थ्यांनी आयआयटी, मुंबई येथील प्रयोगशाळेस भेटी दिल्या आहेत. शेती, उत्पादन, संरक्षण, गृह, स्मार्ट-सिटी देखभाल आणि सेवा उद्योग अशा विविध क्षेत्रांमध्ये तंत्रज्ञानाचा वापर करून समस्या सोडवण्यासाठी आयआयटी मुंबई यांनी आयोजित केलेल्या e-YANTRA या कार्यक्रमात १२४ पदवी तसेच ६ पदविका संस्थांनी सहभाग नोंदविला आहे.

### 5) संस्थामध्ये अद्ययावत सुविधायुक्त सेंटर ऑफ एक्सलन्स ची स्थापना करणे :

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण- २०२० नुसार संशोधनाला चालना मिळण्यासाठी तंत्र शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील दहा शासकीय / अशासकीय अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये व तंत्र निकेतनांमध्ये अद्ययावत सुविधायुक्त सेंटर ऑफ एक्सलन्सची स्थापना करण्यास मान्यता देण्यांत आलेली आहे.

या योजने अंतर्गत सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठ, पुणे व व्हीजेटीआय, मुंबई या दोन संस्थांमध्ये वर्ष २०२४-२५ मध्ये सेंटर ऑफ एक्सलन्स कार्यान्वित करण्यांत आलेले आहे. आगामी वर्षात उर्वरीत ८ संस्थांमध्ये सदरचे केंद्र कार्यान्वित करण्याचे उद्दिष्ट आहे.

### 6) प्रोफेसर ऑफ प्रॅक्टिस योजना :

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण – २०२० अंतर्गत उद्योगक्षेत्र व अर्थव्यवस्थेची मागणी पूर्ण करण्याकरिता उच्च शिक्षणाचे कौशल्य आधारित शिक्षणामध्ये रूपांतरण करणे आवश्यक आहे. उद्योग- शिक्षण संबंध दृढ करण्यासाठी औद्योगिक क्षेत्रातील अनुभवी व्यवसायिकांचा शिक्षण क्षेत्रात समावेश करता यावा म्हणून शासनाने “प्रोफेसर ऑफ प्रॅक्टीस” हा नवीन उपक्रम सुरू केला आहे. या उपक्रमांतर्गत अनुभवी उद्योग व्यावसायिक आणि सेवानिवृत्त शिक्षणतज्ञांची नियुक्ती संस्थांमध्ये करण्यांत येते.

### 7) स्कूल कनेक्ट उपक्रम

वर्ष २०१८-१९पासून पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमास प्रवेश घेण्याकडे विद्यार्थ्यांचा कल वाढविण्यासाठी आणि विद्यार्थी/पालकांमध्ये तंत्र शिक्षणाबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी “स्कूल कनेक्ट” ही अभिनव संकल्पना राबविण्यात आली आहे.

या योजनेत इयत्ता नववी व दहावीच्या विद्यार्थ्यांचे समुपदेशन मेळावे आयोजित करण्यांत येतात. परिसरातील शाळांच्या विद्यार्थ्यांसाठी शासकीय तंत्रनिकेतनांमध्ये विज्ञान प्रदर्शन व रोजगार मार्गदर्शन मेळावे आयोजित करण्यांत येतात. त्याचप्रमाणे परिसरातील शाळांच्या विद्यार्थ्यांच्या तंत्र निकेतनातील विविध विभागांना भेटी आयोजित करण्यांत येतात. यावेळी विद्यार्थ्यांना विविध शिष्यवृत्ती योजना, त्यांचे फायदे, निकष व कार्यपद्धती बाबत विस्तृत माहिती देण्यांत येते.

### 8) प्रधान मंत्री उच्चत्तर शिक्षा अभियान (PM-USHA)

राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान (RUSA) चा टप्पा-3 म्हणून प्रधान मंत्री उच्चतर शिक्षा अभियान (PM-USHA) ही योजना सुरू करण्यांत आलेली आहे. या योजनेच्या विविध पाच प्रमुख घटकांतर्गत (Components) राज्यातील उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत लक्ष केंद्रित जिल्ह्यातील (Focused District) शासकीय व अनुदानित संस्थांचा सर्वंकष विकास करण्याचे योजिले आहे.



व्हीजेटीआय सोबत सामंजस्य करार

या योजनेत घटक-1 मध्ये 4 विद्यापीठे, घटक-2 मध्ये 7 विद्यापीठे, घटक-3 मध्ये 43 महाविद्यालये असून घटक-5 (Gender Inclusion and Equity Initiatives) मध्ये 4 शासकीय तंत्र निकेतने सहभागी आहेत.

तंत्र शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय तंत्र निकेतन, धाराशिव, वाशिम, गडचिरोली व नंदुरबार या चार संस्थांना एकूण रु. ३७,०९,६५,६०२/- इतका निधी मंजूर करण्यांत आलेला आहे.

राज्यात या योजनेची प्रभावी अमंलबजावणी करण्यासाठी राज्य प्रकल्प संचालनालयाची स्थापना करण्यात आलेली असून त्यास सहकार्य करण्यासाठी तांत्रिक सहाय्यक गट (TSG) स्थापन करण्यात आलेला आहे.

PM-USHA योजनेंतर्गत बहुतेक कामे बांधकाम/नुतनीकरण/खरेदी संबंधित आहेत. ही कामे शासनाच्या नियम/अधिनियमानुसार होण्यासाठी तसेच रुसा कार्यालयाकडून वितरीत करण्यांत आलेल्या निधीच्या उपयोगावर देखरेख ठेवण्यासाठी संबंधित सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालये यांना Single Nodal Agency (SNA) म्हणून तसेच संबंधित सहसंचालकांना जिल्हा नोडल अधिकारी म्हणून नियुक्त करण्यांत आलेले आहे. त्यांच्या नांवे भारतीय स्टेट बँकेत Zero Balance Subsidiary Account (Current Account) आणि Holding Account उघडणेबाबतचे निर्देश दिलेले आहेत. त्यानुसार संबंधित सहसंचालकांनी याबाबतची सर्व कार्यवाही पूर्ण केलेली आहे.

संबंधित संस्थांचे विस्तृत प्रकल्प अहवाल तसेच संबंधित सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत सादर केलेल्या अंदाजपत्रकाची तांत्रिक छाननी करून घेण्यासाठी शासन निर्णयाद्वारे त्रयस्थ नोडल तांत्रिक संस्था म्हणून वीरमाता जिजाबाई तंत्रज्ञान संस्था (व्हीजेटीआय), मुंबई या संस्थेची नियुक्ती करण्यांत आलेली आहे.

या चारही संस्थांच्या बांधकाम/यंत्रसामुग्रीच्या प्रस्तावांना प्रशासकीय मान्यता मिळण्यासाठी रुसा कार्यालयाकडून शासनास प्रस्ताव सादर करण्यांत आलेले आहेत. शासनस्तरावर प्रशासकीय मान्यतेबाबतची कार्यवाही सुरू आहे. लवकरच प्रशासकीय मान्यतेबाबतचे शासन निर्णय अपेक्षित आहेत.

### 9) उन्नत महाराष्ट्र अभियान :

राज्यातील विविध सामाजिक विकासाशी संबंधित प्रश्नांची संशोधनाव्दारे उकल करून त्यावर अचूक उपाययोजना करण्यासाठी “उन्नत महाराष्ट्र अभियान” हे संपूर्ण राज्यात राबविण्यांत येत आहे. या अभियानाने विविध शासकीय यंत्रणा व शैक्षणिक संस्था यांच्यात सामाजिक व आर्थिक स्वरुपाच्या महत्त्वाच्या समस्यांसदर्भात संशोधन वृध्दिंगत करण्यात येईल. यातील निरनिराळ्या योजनांमध्ये अभियांत्रिकी तसेच अन्य व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचा सहभाग वाढविण्यात येणार आहे.






राज्यातील ग्रामीण क्षेत्राच्या विकासांत आयआयटी व तत्सम प्रगत शैक्षणिक संस्थांचा सहभाग वाढवून परिवर्तन घडविण्याच्या दृष्टीने सदर योजना राबविण्यात येत आहे. या योजनेव्दारे राज्यातील अभियांत्रिकी महाविद्यालये, तंत्र निकेतने आणि अन्य शिक्षण संस्थांमध्ये सुरू असलेले संशोधन हे राज्यातील विविध सामाजिक व विकासाशी निगडीत दैनंदिन जीवनातील समस्यांची उकल करण्यासाठी कसे केन्द्रित करता येईल हे पाहिले जाईल. उदा.ग्रामीण योजनांद्वारे ग्राम स्वच्छता, शौचालय सांडपाणी व्यवस्थापन, पेयजल, रक्तविकार, रस्त्यांचे मूल्यांकन करून मजबूतीकरण, जलसंधारण, इंधन व ऊर्जा इत्यादी क्षेत्रातील समस्यांची उकल करण्यात येत आहे. या सस्थांमधील संशोधन व कुशल मनुष्यबळ वापरुन सामाजिक क्षेत्रातील विकासाच्या समस्यांवर उचित तंत्रज्ञानाच्या वापराने उपाय सुचविण्यात येत आहेत. या योजनेत सद्यस्थितीत एकूण ४७ शासकीय, निमशासकीय व खाजगी अभियांत्रिकी व तंत्र निकेतन संस्था ग्रामीण व शहरी भागातील समस्यांवर काम करीत आहेत.

उपरोक्त अभियानाची अंमलबजावणी, नियंत्रण व समन्वय करण्याच्या दृष्टीने तंत्र शिक्षण संचालनालय स्तरावर प्रकल्प समन्वयक कक्ष स्थापन करण्यात आला आहे. सदर अभियानात सहभाग असलेल्या संस्थांमध्ये तंत्रज्ञान व विकास कक्ष स्थापन करण्यात आलेले आहेत. संचालक, तंत्रशिक्षण हे योजनेच्या सल्लागार समितीचे सदस्य सचिव आहेत. प्रकल्प व्यवस्थापन कक्षाचे प्रमुख या नात्याने आवश्यकतेनुसार सल्लागार समितीची बैठक आयोजीत करणे, शासन आणि उन्नत महाराष्ट्र अभियानात सहभागी संस्था यांच्यात समन्वय साधणे इत्यादी महत्त्वपूर्ण जबाबदारी ते हाताळतात.

तसेच या अभियानास मार्गदर्शन करण्यासाठी सर्वोच्च पातळीवर डॉ. मिलींद सोहनी, चेअर प्राध्यापक, CTARA IIT, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली राज्यसल्लागार समन्वय समिती गठीत करण्यात आलेली आहे. सदर समिती याबाबत मार्गदर्शन करते.

**फलनिष्पती :-**

1. प्रकल्पामध्ये जलशुद्धीकरण प्रकल्प, ग्रामीण पाणीपुरवठा योजनेचे मूल्यमापन, सुरक्षित पेय जल पुरवठा मुल्यमापन, जलयुक्त शिवार योजनेचे मूल्यमापन, नद्या व जलस्त्रोतांचे पुनर्भरण, पाणीपुरवठा योजनांचे त्रयस्थ लेखा परिक्षण, ग्रामीण भागात टँकर व्दारे पाणीपुरवठा योजनांचे मूल्यमापन, मल:निस्सारण योजनांमध्ये सुधारणा इत्यादी प्रस्तावांचा समावेश आहे.
2. दळणवळण / रस्ते विषयक प्रस्तावांमध्ये रस्ते, सडक यांचे मूल्यमापन त्यांची देखभाल, त्रयस्थ परिक्षण इत्यादी बाबत प्रकल्प आहेत.
3. तसेच माहिती तंत्रज्ञानाचा वापर करून ग्रीन हाउस प्रकल्पांचे व्यवस्थापन स्वयंचलीकरण इत्यादी प्रकल्प आहेत.
4. उर्जा संवर्धन विषयक प्रकल्पांमध्ये धूर विरहीत चूल, सौर आधारित मोबाईल फोन चार्जर, पंप दिवे, सोलर पंप, घनकचरा व्यवस्थापन इ प्रकारचे प्रकल्प आहेत .
5. उपरोक्त प्रकल्पांमुळे शैक्षणिक संशोधनात वाढ झाली असून नामवंत संशोधन पत्रिकांमध्ये या अनुषंगाने प्रकाशित होणाऱ्या शोध निबंधांची संख्या देखील वाढली आहे.
6. सरदार पटेल अभियांत्रिकी महाविद्यालय मुंबई, व्हीजेटीआय मुंबई, अभियांत्रिकी महाविद्यालय पुणे या सारख्या संस्थांनी आपल्या अभ्यासक्रमांत Development Engineering हा विषय समाविष्ट केला आहे. यामुळे विद्यार्थ्यांना ग्रामीण व नागरी भागातील समस्या व त्यांची उकल या बाबतचे ज्ञान मिळते.

### 10) शासकीय तंत्रनिकेतनांचे फेसलिफ्टिंग करणे :

- शासकीय तंत्रनिकेतनातील प्रवेशित विद्यार्थ्यांना उच्च दर्जाच्या पायाभूत सोयीसुविधा उपलब्ध करून देण्याकरिता संस्थेचे फेसलिफ्टींग करण्याच्या कामास माहे फेब्रूवारी-मार्च-२०२४ मध्ये सुरुवात झालेली आहे. यामध्ये खालील कामांचा समावेश:
- मुख्य इमारत व कार्यशाळेच्या अंतर्गत भागाचे रेट्रोफिटिंग, संरचनात्मक मजबुतीकरण व इमारत दुरुस्ती कामे
- आतील व बाहेरील भिंतींचे प्लास्टरिंग व रंगकाम.
- स्वच्छतागृहांची डागडुजी
- फ्लोअर टाईल्सची दुरूस्ती
- परिसर सौंदर्यीकरण, बागकाम, बाह्य सौंदर्यीकरण, सीमाभिंत, रस्ता आणि जलनिस्सारण कामे
- विद्युत यंत्रणेची देखभाल व दुरुस्ती.

एकूण चाळीस संस्थांचा मिळून रु. २७२ कोटी इतका एकत्रित खर्च असून खर्चाची विभागणी - संबंधित संस्थांच्या पी.एल.ए.मधून रु. ४३ कोटी, तंत्रशिक्षण संचालनालयाच्या पी.एल.ए. मधून रु. १०५ कोटी, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांच्या निधीमधून रु. ३० कोटी व शासनाचे उत्तरदायित्व रु. ९४ कोटी अशाप्रकारे करण्यात आलेली आहे. या कामांसाठी सा. बां. विभागाकडून विविध ठिकाणी १० निविदा प्रसिद्ध करण्यात आलेल्या असुन सर्व ठिकाणी कार्यारंभ आदेश देवून कामे सुरू करण्यांत आलेली आहेत.

अश्या प्रकारे महाराष्ट्रातील तंत्र शिक्षण संचालनालयाने आपल्या दूरदृष्टीपूर्ण कार्यपद्धतीतून राज्यातील तांत्रिक शिक्षण क्षेत्राला एक नवी दिशा व गती दिली आहे. धोरणात्मक निर्णय, गुणवत्ता सुधारणा, उद्योगाशी वाढवलेला सुसंवाद आणि विद्यार्थ्यांपर्यंत पोचवलेले आधुनिक शिक्षणाचे तत्वज्ञान यामुळे आज महाराष्ट्र तांत्रिक शिक्षणाच्या क्षेत्रात देशात आघाडीवर आहे. भविष्यातही जागतिक स्तरावर स्पर्धा करण्यासाठी आणि विद्यार्थ्यांना ज्ञान, कौशल्ये व नवोन्मेष क्षमतेने समृद्ध करण्यासाठी तंत्र शिक्षण संचालनालय आपली भूमिका अधिक व्यापक आणि प्रभावीपणे पार पाडत राहील, हा आमचा दृढ संकल्प आहे.

# वाचाल तर वाचाल

## ग्रंथालय संचालनालय : वाचनसंस्कृतीचे संरक्षक

**अशोक मा. गाडेकर**
प्र. ग्रंथालय संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई

व्यक्ती, समाज वा राष्ट्राच्या जडणघडणीत ग्रंथ व ग्रंथालयांचे महत्त्व अनन्यसाधारण असे आहे. माहिती, ज्ञान, मनोरंजन आणि जिज्ञासापूर्तीचे उत्कृष्ट साधन म्हणून ग्रंथांची उपयुक्तता सर्वमान्य आहे. म्हणूनच बौध्दिक विकासाचे शक्तीकेंद्र आणि सामाजिक विकासाचे ऊर्जाकेंद्र म्हणून सार्वजनिक ग्रंथालयांची आवश्यकता आहे. शिक्षणाच्या प्रसारासाठी, ज्ञान, माहिती आणि मनोरंजन यांचे प्रमुख केंद्र म्हणून "सार्वजनिक ग्रंथालय प्रणाली" विकसित करणे अपरिहार्य आहे. राज्यातील ग्रामीण आणि शहरी विभागातील जनतेला सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक, माहिती-तंत्रज्ञान, कृषी, क्रिडा, कला व मनोरंजन इ. क्षेत्रातील विविध बाबींची आणि विषयांची परिपूर्ण माहिती मिळावी यासाठी सार्वजनिक ग्रंथालयांचे महत्त्व ओळखून महाराष्ट्र शासनाने "महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालय अधिनियम, १९६७" मंजूर केला आहे. या अधिनियमान्वये राज्यातील जनतेमध्ये वाचन सवयीची जोपासना करणे आणि सार्वजनिक ग्रंथालय प्रणालीचा विकास करून "गाव तेथे ग्रंथालय" ही संकल्पना मूर्त स्वरुपात टप्प्याटप्प्याने अंमलात आणण्याचे शासनाचे उद्दीष्ट आहे.




राज्य मध्यवर्ती ग्रंथालय

महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालये अधिनियमातील तरतुदीनुसार "ग्रंथालय संचालनालय" या स्वतंत्र विभागाची स्थापना २ मे, १९६८ रोजी करण्यात आली. उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अखत्यारीत ग्रंथालय संचालनालय कार्यरत आहे. ग्रंथालय अधिनियमातील तरतूदीनुसार सार्वजनिक ग्रंथालय पद्धती प्रस्थापित करण्याकरिता सार्वजनिक ग्रंथालयांची स्थापना, परिरक्षण, संघटन, नियोजन आणि विकास साधणे हे ग्रंथालय संचालनालयाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. राज्यातील सार्वजनिक ग्रंथालयांचे व्यवस्थापन आणि विकास घडवून आणण्यासाठी ग्रंथालय संचालनालयांतर्गत सहा महसूली विभागामध्ये 'सहाय्यक ग्रंथालय संचालक' कार्यालये आहेत आणि ३५ महसुली जिल्ह्याच्या ठिकाणी "जिल्हा ग्रंथालय अधिकारी' कार्यालये आहेत. सदर जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयांच्या माध्यमातून सार्वजनिक ग्रंथालय प्रणालीवर नियंत्रण ठेवण्याचे काम पाहिले जाते.

राज्य शासनाने जनतेच्या उपयोगासाठी स्थापन केलेले व स्वतः चालविलेले एक शासकीय राज्य मध्यवर्ती ग्रंथालय, सहा शासकीय विभागीय ग्रंथालये व ३६ महसूली जिल्हयाच्या ठिकाणी जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालये यांच्या माध्यमातून राज्यातील ग्रंथ संग्रहाचे जतन करणे आणि ते आवश्यकतेनुसार वेळोवेळी जनतेला उपलब्ध करून देण्याचे कार्य केले जाते. उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या शासन निर्णयान्वये 'ग्रंथपाल' या पदनामा ऐवजी "जिल्हा ग्रंथालय अधिकारी" आणि 'शासकीय जिल्हा ग्रंथालये' ऐवजी "जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय" असा बदल करण्यात आलेला आहे. या शिवाय जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयांच्या माध्यमातून ग्रंथालय व माहिती सेवा देण्याशिवाय संबंधित जिल्हयातील शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांची तपासणी करणे, शासन मान्यतेबाबत शिफारस करणे, राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठानच्या योजनांची अंमलबजावणी करणे, पुरस्कारासाठी प्रस्ताव मागविणे, मार्गदर्शन करणे, इ. कामे केली जातात.

ग्रंथालय संचालनालयाकडून ग्रंथालयात काम करणाऱ्या किंवा काम करू इच्छिणाऱ्यांसाठी ग्रंथालय शास्त्राचे प्रशिक्षण (ग्रंथपालन प्रमाणपत्र परीक्षा) या परीक्षेचे आयोजन प्रतिवर्षी करण्यात येते. तसेच ग्रंथालय संघामार्फत ग्रंथपालन प्रमाणपत्र परीक्षा अभ्यासक्रमाचे वर्ग चालविण्यात येतात. ग्रंथालय सेवांसाठी प्रशिक्षित मनुष्यबळ तयार करण्याची जबाबदारी ग्रंथालय संचालनालयातर्फे पार पाडण्यात येते. राज्यात प्रसिद्ध झालेल्या सर्व ग्रंथांची सूची प्रतिवर्षी प्रसिद्ध करणे, सार्वजनिक ग्रंथालयांना ग्रंथखरेदीस उपयुक्त व्हावी यासाठी ग्रंथनिवड समितीने शिफारस केलेल्या ग्रंथांची यादी प्रसिद्ध करण्यात येते. ग्रंथालय संचालनालयांतर्गत शासकीय ग्रंथालये व कार्यालये आणि शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांची सांख्यिकीय माहिती दर्शविणारा तक्ता:

**ग्रंथालय संचालनालयांतर्गत ग्रंथालये व कार्यालये**

| अ.क्र. | कार्यालये | संख्या |
|---|---|---|
| **अ** | ग्रंथालय संचालनालय (मुख्यालय) | 1 |
| 1 | सहाय्यक ग्रंथालय संचालक कार्यालय | 6 |
| 2 | राज्य मध्यवर्ती ग्रंथालय | 1 |
| 3 | शासकीय विभागीय ग्रंथालय | 6 |
| 4 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मृती ग्रंथालय (दापोली) | 1 |
| 5 | जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय | 36 |
| | **एकूण** | 51 |
| **ब** | **अनुदानप्राप्त शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालये (दि.31.03.2024 पर्यंत)** | |
| | जिल्हा ग्रंथालये 'अ' वर्ग | 34 |
| | तालुका ग्रंथालये- 'अ' वर्ग (133), 'ब' वर्ग (104), आणि 'क' वर्ग (27) | 264 |
| | इतर ग्रंथालये- 'अ' वर्ग (162), 'ब' वर्ग (1968), आणि 'क' वर्ग (3945) | 6075 |
| | 'ड' वर्ग ग्रंथालये | 4777 |
| | **एकूण** | **11150** |
| | **ग्रामपंचायत ग्रंथालये** | 127 |
| | **एकूण** | **11150** |
| **क** | संशोधन संस्थांची ग्रंथालये | 37 |
| **ड** | शतायु ग्रंथालये (83 ग्रंथालयांना प्रोत्साहनपर अनुदान रु.5 लाख याप्रमाणे लाभ दिलेला आहे. उर्वरीत 48 ग्रंथालयांना प्रोत्साहनपर लाभ देणे प्रस्तावित आहे.) | 131 |
| **इ** | राज्य ग्रंथालय संघ (1), विभाग ग्रंथालय संघ (5), जिल्हा ग्रंथालय संघ (34) | 40 |
| **फ** | संचालनालयांतर्गत कार्यरत समित्या | 4 |

सार्वजनिक ग्रंथालये ही लोकांची, लोकांनी व लोकांसाठी चालविण्यात येणारी व्यवस्था आहे. कार्यकर्त्यांचे कर्तृत्व, दात्यांचे दातृत्व व शासनाचे पितृत्व या सर्वांच्या एकत्रित प्रयत्नांवर राज्यातील ग्रंथालय चळवळ आहे. ग्रंथालय अधिनियमात ग्रंथालयांसाठी ग्रंथालय उपकराची (Library Cess) तरतूद नाही.

**ग्रंथालय संचालनालयाकडून राबविण्यात येणाऱ्या योजना:**

राज्यातील सार्वजनिक ग्रंथालयांना शासन मान्यता व प्रथमवर्षी तदर्थ अनुदान

नोंदणीकृत ग्रंथालयात किंवा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या ग्रंथालयात सार्वजनिक ग्रंथालय सुरू करता येते. अश्या ग्रंथालयात किमान ३०१ ग्रंथ असले पाहिजेत व त्यातील वीस टक्के ग्रंथ हे बालवाङ:मय असणे आवश्यक आहे. ग्रंथालयाची जागा पुरेशी मोठी, आरोग्यप्रद, पुरेसा प्रकाश असणारी असावी. तिथे पुरेसे फर्निचर व साधनसामग्री असावी. किमान २६ वर्गणीदार सभासद असतील तर चार दैनिके व सहा नियतकालिके खरेदी करून किमान तीन तास सेवा देणारे असे सार्वजनिक ग्रंथालय सुरू करता येते.

ग्रंथालयाचे व्यस्थापन ग्रंथालयाच्या कामाच्या वेळांमध्ये त्याठिकाणच्या जनतेसाठी, त्या जागेवर विनामुल्य वापरासाठी ग्रंथालय उघडे ठेवेल. असे करताना धर्म, वंश, जात, पंथ, स्त्री-पुरुष भेद, जन्मस्थान किंवा वंशपरंपरा या कारणांवरुन कोणताही भेदभाव करणार नाही.

सार्वजनिक ग्रंथालय हे स्वतंत्र नोदंणीकृत असणे अपेक्षित आहे. स्थानिक स्वराज्य संस्था (ग्रामपंचायती, नगरपरिषदा, महानगरपालिका) यांनाही सार्वजनिक ग्रंथालय स्थापन करता येऊ शकते. त्यासाठी स्वतंत्र संस्था नोंदणीची आवश्यकता नाही. सार्वजनिक ग्रंथालयाची स्थापना व नोंदणी झाल्यानंतर ग्रंथालयाच्या व्यवस्थापनाला शासनमान्यता व अनुदान मिळण्यासाठी ग्रंथालय संचालनालयाने निर्देशित केलेल्या जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयाकडे ५०/- रु. भरुन प्राप्त होणाऱ्या विहित नमुन्यातील अर्जातील प्रपत्रात पूर्ण कागदपत्रासह दोन प्रतींमध्ये विहित मुदतीच्या आत प्रस्ताव पाठविता येतो. ग्रंथालयाला संपूर्ण एक आर्थिक वर्षाचा (एप्रिल ते मार्च बारा महिने) आर्थिक व्यवहार असलेला सनदी लेखापाल यांचा अंकेक्षण अहवाल प्रस्तावासोबत सादर करावा लागतो. तसेच ५००/- रु. प्रक्रिया शुल्क (प्रतिवर्षी) भरावे लागते. प्रस्तावित ग्रंथालय पात्र असल्यास ग्रंथालय निरीक्षक समक्ष जाऊन त्याची तपासणी करतो. शासनाने ठरवून दिलेल्या विहित नमुन्यात गुणांकन करून शासनमान्यता व अनुदान याकरिता मंजुरी देण्यासाठी सर्व प्रस्ताव मा. ग्रंथालय संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडे अंतिम निर्णयार्थ सादर करण्यात येतात.

नवीन सार्वजनिक ग्रंथालयांना शासनमान्यता व अनुदान देण्यासाठी प्रत्येक जिल्हयाच्या जिल्हा नियोजन समितीतर्फे तरतूद केली जाते. सदर तरतूद लक्षात घेऊन शासन मान्यता व अनुदान देण्याबाबत निर्णय घेतला जातो. प्रथमवर्षी 'ड' वर्गातच मान्यता मिळू शकते. एखादया ग्रंथालयास प्रस्ताव सादर केल्यानंतर नियमानुसार मान्यता प्राप्त झाली नसल्यास अशा ग्रंथालयाचा प्रस्ताव आपोआप रद्द करण्यात येतो. तेव्हा अशा ग्रंथालयाला शासन मान्यता हवी असल्यास त्यानी पुढील वर्षी नवीन प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे.

एखादया ठिकाणची ग्रंथालय सेवेची गरज लक्षात घेण्यासाठी लोकसंख्येचे प्रमाण वरीलप्रमाणे आहे.

| लोकसंख्येचे प्रमाण | ग्रंथालय संख्या |
|---|---|
| 500 ते 10,000 लोकसंख्येसाठी | 1 ग्रंथालय |
| 10,001 ते 25,000 लोकसंख्येसाठी | 2 ग्रंथालये |
| 25,001 ते 50,000 लोकसंख्येसाठी | 3 ग्रंथालये |
| 50,001 ते 1,00,000 लोकसंख्येसाठी | 4 ग्रंथालये |

या प्रमाणात पुढे 1 लाखास 4 प्रमाणे शासन मान्यतेसाठी लागणाऱ्या आवश्यक अटींची पूर्तता केल्यानंतर शासन मान्यतेच्या प्रथमवर्षी किमान 500 रु. पर्यंत तदर्थ अनुदान निधी उपलब्धतेनुसार देण्यात येतो. अशा प्रकारे सदर योजनेअंतर्गत नोंदणीकृत सार्वजनिक ग्रंथालयांना ग्रंथालय संचालनालयाकडून शासन मान्यता व प्रथमवर्षी तदर्थ अनुदान देण्यात येते.

**शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांना LGMS च्या माध्यमातून परिरक्षण अनुदान**

परिरक्षण अनुदान: ग्रंथालयाच्या प्रत्यक्ष खर्चाच्या ९०% इतके वा त्या ग्रंथालयाच्या वर्गासाठी असलेले किमान अनुदान या दोन्हीतील जे कमी असेल ते

**प्रोत्साहक अनुदान:**

अ) अतिरिक्त वर्गणीदार सभासदांच्या नाव नोंदणीसाठी प्रोत्साहक अनुदान:- किमान सभासदांशिवाय असलेल्या अतिरिक्त सभासदांसाठी प्रत्येक सभासदमागे रु ६ इतके अनुदान दिले जाते.

ब) ग्रंथ खरेदीवर प्रोत्साहक अनुदान:- शासनमान्य ग्रंथांच्या यादीमधून खरेदी केल्या जाणाऱ्या अतिरिक्त ग्रंथांच्या किंमतीवर दिले जाते

क) साधनसामग्री अनुदान योजना- ग्रंथालयांना उपयुक्त असणारे फर्निचर घेण्यासाठी

ड) इमारत बांधकाम व विस्तारासाठी अनुदान

राज्यातील शतायु ग्रंथालयांना विशेष साहाय्य: ग्रंथालय सेवेची शताब्दी पूर्ण करणाऱ्या राज्यातील 83 ग्रंथालयांना प्रत्येकी रू.5.00 लक्ष विशेष विकास अनुदान शासनाने दिलेले आहे.

ग्रंथालय संघ व अनुदान: राज्यातील ग्रंथालय चळवळीस प्रोत्साहन देणे, सुरू असलेल्या ग्रंथालयांना मार्गदर्शन करणे, कार्यशाळा, परिसंवाद इ. आयोजन करणे इ. साठी राज्यात जिल्हा, विभाग व राज्य ग्रंथालय संघांना शासन मान्यता व अनुदान देण्यात येते.



संशोधन संस्थाना मान्यता व अनुदान:राज्यातील संशोधन संस्थामधील ग्रंथालयांना अधिक चांगल्या प्रकारे ग्रंथालयीन सेवा पुरविणे शक्य व्हावे व ग्रंथांचे व्यवस्थापन व संवर्धन चांगल्या प्रकारे करण्यासाठी साहित्य व संशोधन संस्थांच्या ग्रंथालयांना- प्रत्येकी रु.15,000/- वार्षिक अनुदान दिले जाते.

**राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठानच्या योजना**

केंद्र शासनाच्या सांस्कृतिक खात्यांतर्गत हे प्रतिष्ठान राज्य शासनाच्या हिश्शाइतके अंशदान देते. राज्य शासनाचे रू.3.00 कोटी व प्रतिष्ठानचे रू.3.00 कोटी असे रू.6 कोटीच्या अर्थसाहाय्याच्या योजना प्रत्येक वर्षी राज्यात राबविण्यात येत आहेत. त्यामध्ये ग्रंथ, फर्निचर, संगणक, झेरॉक्स मशीन, इमारत बांधकाम, विस्तार ग्रंथालयांना कार्यशाळा, चर्चासत्रे, परिसंवाद आयोजित करण्यासाठी अनुदान, विशेष बाल वाचन कक्ष, महिला, ज्येष्ठ नागरिक, अंपग यांच्यासाठी विविध योजनाच्या माध्यमातून साहाय्य केले जाते. दरवर्षी सुमारे 2,500 ग्रंथालयांना या योजनांचा लाभ दिला जातो.

**ग्रंथालय चळवळीस प्रोत्साहनात्मक पुरस्कार योजना**

शासनमान्यता प्राप्त सार्वजनिक ग्रंथालयांनी आणि ग्रंथालय चळवळीतील कार्यकर्त्यांनी आणि ग्रंथालय कर्मचाऱ्यांनी केलेल्या कार्याचा गौरव करण्यासाठी आणि गुणात्मक विकास व अधिक चांगल्या सेवा देण्यासाठी प्रोत्साहन मिळावे या उद्देशाने शासनाने सन 1984 पासून अनुक्रमे 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ट ग्रंथालय पुरस्कार' योजना सुरू केली. सन 1992-93 पासून शहरी व ग्रामिण भागातून हे पुरस्कार राज्यातील 8 आदर्श ग्रंथालयांना देण्यात येतो. उत्कृष्ट ग्रंथालय कार्यकर्ता व उत्कृष्ट ग्रंथालय सेवकासाठी 'डॉ. एस. आर. रंगनाथन ग्रंथमित्र पुरस्कार' देण्याची अभिनव योजना सन 1992-93 पासून सुरू केलेली आहे. त्यामध्ये आदर्श कार्यकर्ता व सेवक राज्यस्तर प्रत्येकी- 1 प्रमाणे व प्रत्येक महसूल विभागातून 1 कार्यकर्ता व 1 सेवक असे एकूण 14 पुरस्कार दिले जातात.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ट ग्रंथालय पुरस्कार रक्कम अनुक्रमे 1,00,000/-, 75,000/-, 50,000/- व 25,000/- व डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या नावाने राज्यातील उत्कृष्ट ग्रंथालय कार्यकर्ता व सेवक यासाठी राज्यस्तरावरून रू.50,000/- व विभागस्तरावरून रू.25,000/- अशी रक्कम, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार वितरण समारंभा बरोबरच पुरस्कार प्रदान करण्यात येतात. यासाठी विहित अटी पूर्ण करणारी ग्रंथालये प्रस्ताव सादर करू शकतात.

**ग्रंथपालन प्रमाणपत्र परीक्षा**

राज्यातील सार्वजनिक ग्रंथालयांना प्रशिक्षित मनुष्यबळ उपलब्ध व्हावे. ग्रंथपालाने समाजाला ग्रंथालयाचा उपयोग अधिकाधिक होईल या दृष्टीने ग्रंथालयाचे व्यवस्थापन आणि ग्रंथालयीन सेवांचा दर्जा उंचाविण्यासाठी ग्रंथालयांमध्ये प्रशिक्षित कर्मचारी असणे अत्यावश्यक आहे. यासाठी ग्रंथालय संचालनालयामार्फत ग्रंथालयांमध्ये काम करणाऱ्या किंवा काम करण्याची इच्छा असणाऱ्या उमेदवारांसाठी ग्रंथालय प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचे आयोजन केले जाते. दरवर्षी ग्रंथपालन प्रमाणपत्र वर्ग एप्रिल/मे महिन्यात चालविले जातात व त्याची परीक्षा जून मध्ये घेतली जाते. सदर अभ्यासक्रम दोन महिन्यांचा असून राज्य व विभाग ग्रंथालय संघामार्फत प्राप्त प्रस्तावांना

**राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान, कोलकाता यांच्यातर्फे समान (ग्रंथालय संचलंनालयाने खर्च केलेल्या रकमेएवढेच सहाय्य प्रतिष्ठानातर्फे केले जाते) व असमान(प्रतिष्ठानाचे सहाय्य असून यात संचालांनालायचा वाटा नसतो) अर्थसहाय्याच्या योजना:**

| समान निधी योजना | असमान निधी योजना |
|---|---|
| ग्रंथ, इतर वाचनीय साहित्य व दृश्यमान साधने वाढविण्यासाठी | सार्वजनिक ग्रंथालयांना 150/125/100/75/60/50 यासारखे वर्ष साजरे करण्यासाठी अर्थसहाय्य (100 टक्के राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान) |
| चर्चासत्र, परिसंवाद, प्रशिक्षण वर्ग (उद्बोधन व उजळणी), कार्यशाळा आणि ग्रंथप्रदर्शनांचे आयोजन, ग्रंथालय जनजागृती कार्यक्रम यासाठी | ग्रंथालय सेवा पुरविणाऱ्या स्वयंसेवी संघटनांना संस्थांना<br>(75 टक्के राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान व 25 टक्के ग्रंथालय) |
| सार्वजनिक ग्रंथालयांना शैक्षणिक प्रयोजनासाठी लागणारी खरेदी | बाल विभाग स्थापन करण्यासाठी सार्वजनिक ग्रंथालयांना अर्थसहाय्य (100 टक्के राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान) |
| सार्वजनिक ग्रंथालयांना इमारत बांधणी, विस्तारासाठी | सार्वजनिक ग्रंथालयांतील बाल ग्रंथालय किंवा बालविभाग, महिला विभाग, जेष्ठ नागरिक विभाग, नवसाक्षर विभागासाठी अर्थसहाय्य. (100 टक्के राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान) |
| ग्रामीण ग्रंथसंचय केंद्र आणि फिरत्या ग्रंथालय सेवांच्या विकासासाठी | |
| ग्रंथालयासाठी व वाचनीय साहित्याच्या ग्रंथसंग्रहासाठी फर्निचर | |

वर्ग चालविण्याची परवानगी दिली जाते. ग्रंथपालन प्रमाणपत्र वर्ग राज्यातील सुमारे २६ केंद्रांतून चालविले जात असून आजी व माजी असे एकूण १५०० ते २००० परीक्षार्थी या प्रमाणपत्र वर्गाचा लाभ घेत असतात. ग्रंथपालन प्रमाणपत्र प्रशिक्षणाचा शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांतील १२ वी पास असलेल्या कर्मचाऱ्यांना लाभ मिळावा, म्हणून नुकतेच ग्रंथालय संचालनालयातर्फे परिपत्रकाद्वारे आवाहन करण्यात आले आहे. सदर अभ्यासक्रम ग्रंथालयांसाठी उपयुक्त तर आहेच त्याचबरोबर गृहिणींसाठी घरातील वस्तूंची नियोजनपूर्वक मांडणी करणे, संस्था व सार्वजनिक कार्यालये, दुकानांचे व्यवस्थापन या आणि मानवी जीवनातील अशा अनेक बाबींसाठी वर्गीकरणाची पदोपदी आवश्यकता भासत असते. या ग्रंथालय शास्त्राचे प्रशिक्षणातून ही गरज पूर्ण होऊ शकते. त्यामुळे अशा सर्व इच्छुकांना हे प्रशिक्षण घेता येते.

ग्रंथालय संचालनालय व अधिनस्त कार्यालयांचे आधुनिकीकरण व ई-ग्रंथालयामध्ये रुपांतरीत करणे संचालनालयाच्या अधिनस्त सर्व 43 शासकीय ग्रंथालयांमध्ये ई-ग्रंथालय क्लाऊड बेस आज्ञावली व्यवस्थापित करण्यात आली आहे. सदर 43 ग्रंथालये ई-ग्रंथालयात रुपांतरीत करण्याची कार्यवाही सुरू आहे. जवळपास ४० लक्ष ग्रंथांच्या नोंदी ई-ग्रंथालय आज्ञावलीमध्ये पूर्ण करण्यात आले आहे.तद्नंतर शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालये ई-ग्रंथालयात रुपांतरीत करण्याची कार्यवाही शासनाच्या मान्यतेने ग्रंथालय संचालनालयाकडून करण्यात येईल व टप्प्या-टप्प्याने राज्यातील सर्व शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालये संगणकाद्वारे (Online) जोडण्यात येतील. ग्रंथालय संचालनालयांतर्गत महत्त्वाच्या सुमारे 126 हस्तलिखितांमधील सुमारे 49,176 पृष्ठांचे तसेच 242 दुर्मिळ ग्रंथांचे डिजिटायजेशन करण्यात आले आहे. एशियाटिक सोसायटीतील दुर्मिळ ग्रंथ संजीवनी पोर्टल वर उपलब्ध असून हे पोर्टल वाचकांसाठी राज्य मध्यवर्ती ग्रंथालय, सर्व विभागीय ग्रंथालये, सर्व जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालये, सर्व अ वर्ग ग्रंथालयांमध्ये उपलब्ध आहे. भविष्यात राज्यातील सर्व ग्रंथालयांना हे पोर्टल उपलब्ध करून देणार आहे.

### सार्वजनिक ग्रंथालयांना उपयुक्त ग्रंथ निवड यादी

राज्यातील शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांना नवीन ग्रंथांची वेळीच माहिती व्हावी म्हणून राज्यस्तरीय ग्रंथाची निवड करण्यासाठी शासनाने ग्रंथ निवड समिती घोषित केलेली आहे. दर तीन वर्षांनी ही समिती नव्याने स्थापन केली जाते. राज्यात दरवर्षी सुमारे 3 हजाराच्या वर मराठी ग्रंथ प्रकाशित होतात. त्यापैकी उपयुक्त ग्रंथांची यादी दरवर्षी प्रसिध्द केली जाते. त्यामधील 25 टक्के रक्कमेची ग्रंथ खरेदी करण्यात यावी, असे पाहिले जाते.

सन 2021 व 2022 मध्ये प्रकाशित व संचालनालयास प्राप्त झालेल्या ग्रंथांमधून ग्रंथनिवड समितीच्या सदस्यांनी शिफारस केलेल्या मराठी ग्रंथांची यादी ग्रंथालय संचालनायाच्या www.dol.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे. ग्रंथालय चळवळ आणि वाचन संस्कृती वृध्दींगत करण्यासाठी उचललेली पाऊले

### जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयांची स्थापना

विदर्भात सन 1955 पासून जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालये कार्यरत होती. ती सर्व महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतर महाराष्ट्रात आली. याच धर्तीवर प्रत्येक जिल्ह्यांमध्ये "जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय" स्थापन करण्याची योजना राबविण्यात येत आहे. राज्यात आजमितीस

### ग्रंथालय संचालनालयांतर्गत समित्य

| समितीचे नाव | अध्यक्ष | सदस्य | कार्य |
|---|---|---|---|
| **राज्य ग्रंथालय परिषद** | राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री | राज्य व विभाग ग्रंथालय संघ, तज्ञ ग्रंथपाल, मराठी साहित्य संस्थांचे महामंडळ व शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील व्यक्ती | राज्यातील सार्वजनिक ग्रंथालय प्रणालीच्या विकासाला चालना देण्यासाठी परिषदेने मार्गदर्शन करावे व शासनाला योग्य तो सल्ला द्यावा अशी अपेक्षा आहे |
| **ग्रंथनिवड समिती** | शासननियुक्त | मराठी साहित्य संस्था व विभाग ग्रंथालय संघांचा प्रत्येकी एक प्रतिनिधी | उपयुक्त ग्रंथांची शिफारस करणे |
| **राज्य ग्रंथालय नियोजन समिती** | उच्च व तंत्र शिक्षण विभागचे प्रधान सचिव | प्रतिष्ठानच्या अध्यक्षांचे प्रतिनिधी, प्रतिष्ठानचे संचालक, राज्य ग्रंथालय संघाचे अध्यक्ष व अन्य तज्ञ शासन नियुक्त सदस्य | राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठानच्या योजनांची योग्यरित्या अंमलबजावणी |
| **हस्तलिखित सल्लागार समिती** | उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे प्रधान सचिव अध्यक्ष | हस्तलिखिते व दुर्मिळ ग्रंथ यासंबंधित जाणकार व तज्ञ व्यक्तींची | राज्यामधील व भारतातील ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाच्या विविध विषयांशी संबंधित हस्तलिखितांचे जतन करून त्यांचा संग्रह करण्यासाठी |




एकूण 35 जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालये कार्यरत आहेत.

### शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांच्या अनुदानात वाढ

ग्रंथ व नियतकालिकांच्या किंमतीमध्ये सातत्याने होणारी वाढ आणि दिवसेंदिवस वाढणारी महागाई, वाचन साहित्य व स्टेशनरी वाढत्या किंमती या बाबी विचारात घेऊन शासनाकडून सार्वजनिक ग्रंथालयांच्या परिरक्षण अनुदानात आतापर्यंत 6 वेळा वाढ करण्यात आली आहे. त्यामुळे सार्वजनिक ग्रंथालयाच्या कर्मचाऱ्यांच्या मानधनात ही वाढ झालेली आहे.

### जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयांची डिजिटल उपकेंद्रे स्थापना

राज्यातील सार्वजनिक ग्रंथालयांचा सर्वांगिण विकास होण्याच्या दृष्टीने, काळाची गरज म्हणून संगणकावर आधारित ग्रंथालयीन सेवा देणे क्रमप्राप्त आहे. याचाच एक भाग म्हणून राज्य मध्यवर्ती ग्रंथालयाचे उपकेंद्र, अंधेरी-चकाला, जिल्हा ग्रंथालय अधिकारी, नांदेड या कार्यालयाचे डिजिटल उपकेंद्र नांदेड आणि जिल्हा ग्रंथालय अधिकारी, जालना यांचे घनसावंगी येथे कार्यान्वित करण्यात आलेली आहे. या डिजिटल उपकेंद्राच्या माध्यमातून येथील वाचक सभासद, अभ्यासक व संशोधकांसाठी इंटरनेटवर आधारित सेवा उपलब्ध करून दिल्या जात आहेत. याच धर्तीवर राज्यातील सर्व शासकीय जिल्हा ग्रंथालयांची उपकेंद्रे/डिजिटल उपकेंद्रे स्थापन करण्यास दिनांक 29.10.2012 रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला आहे.

### ग्रंथालय संचालनालयाचे नवीन वेब पोर्टल:

ग्रंथालय संचालनालयच्या संकेतस्थळाचे उद्घाटन मा. ना. श्री. चंद्रकांत (दादा) पाटील, मंत्री , उच्च व तंत्र शिक्षण, वस्त्रोउदयोग आणि संसदीय कार्य, मा. श्री. विकास चंद्र रस्तोगी (भा.प्र.से.) प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मा. डॉ. गजानन कोटेवार, अध्यक्ष, राज्य ग्रंथालय संघ, महाराष्ट्र राज्य, मा. श्री. प्रताप पां. लुबांळ, उपसचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग या मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये दि. 20.08.2024 रोजी आयोजित करण्यात आलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ट सार्वजनिक ग्रंथालय पुरस्कार आणि डॉ. एस.आर. रंगनाथन उत्कृष्ट ग्रंथालय कार्यकर्ता व सेवक (ग्रंथमित्र) पुरस्कार वितरण समारंभात करण्यात आले आहे. सदर पुरस्कार वितरण समारंभामध्ये मा. ना. श्री. चंद्रकांत (दादा) पाटील, मंत्री , उच्च व तंत्र शिक्षण यांच्या शुभहस्ते नव्याने विकसीत केलेल्या संचालनालयाच्या संकेतस्थळाच्या यूआरएल वर क्लिक करून उद्घाटन करण्यात आले. सदर संकेतस्थळ हे उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांच्याकडून विकसीत करण्यात आले आहे. ग्रंथालय संचालनालयांतर्गत संपूर्ण कामकाजाचे व कार्यालयांचे संगणकीकरण याअंतर्गत ग्रंथालय संचालनालयाने www.dol.maharashtra.gov.in हे नवीन वेब पोर्टल ऑगस्टमध्ये कार्यान्वित आले आहे. सदर वेब पोर्टल हे बहुउद्देशीय आणि सर्वसमावेशक करण्यासाठी यामध्ये विविध मोडयूल्स अंतर्भूत करण्यात आलेली आहेत. त्यामध्ये वेब पोर्टल व्यवस्थापन, Messaging, लायब्ररी प्रोफाईल, वार्षिक अहवाल, वेब ओपॅक, नवीन ग्रंथालये मान्यता, दर्जोन्नती, Man Power Approval, ग्रंथालय पुरस्कार, सहाय्यक अनुदाने, शासकीय ग्रंथालये, वार्षिक अहवाल इ.



मोडयूल्स विकसित झालेली आहेत.

याशिवाय ग्रंथालय संचालनालयाने ई-प्रशासनाकडे (E-Governance) वाटचाल करण्याच्या दृष्टीने सदरहु संकेतस्थळावर जनतेच्या उपयोगासाठी ग्रंथालयांशी संबंधित महत्त्वपूर्ण शासननिणर्य, परिपत्रके, ग्रंथालयांच्या यादया, राष्ट्रीय ग्रंथसूची, ग्रंथखरेदी सूटदरपत्रक, सर्व संवर्गातील भरण्यात आलेली पदे व रिक्त पदे यांची एकत्रित माहिती, ग्रंथपालन प्रमाणपत्र परीक्षा निकाल इ. माहिती ठेवण्यात आलेली आहे. त्यामुळे लोकांच्या वेळेची बचत होऊन त्यांना संचालनालयाशी संबंधित माहिती संकेतस्थळावरुन घेणे शक्य होत आहे. त्याचबरोबर ग्रंथालय संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व कार्यालयांचे शासकीय डोमेन असलेले ई-मेल आयडीज (E-mail Id) संरचित केले आहेत. संकेतस्थळ अदययावत करण्याची प्रक्रीया सुरू आहे.

## वाचनसंस्कृती वाढीसाठीचे उपक्रम

### ग्रंथालय संघ आणि ग्रंथालये

महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालये संघ (सहाय्यक अनुदान यासाठी मान्यता) नियम, 1971 नुसार राज्यातील ग्रंथालय चळवळीच्या विकासाला चालना देणे. त्यासाठी बैठका, चर्चासत्रे, परिसंवाद, व्याख्याने, ग्रंथ प्रदर्शन यांचे आयोजन करणे, सार्वजनिक ग्रंथालयांना तांत्रिक मार्गदर्शन करणे, ग्रंथालय शास्त्राच्या शिक्षणसाठी प्रशिक्षण वर्ग भरविणे इ. प्रमुख कार्ये ग्रंथालय संघांकडून पार पाडली जातात. त्यामुळे सार्वजनिक ग्रंथालयांचा प्रचार व प्रसार होऊन समाजामध्ये वाचन संस्कृतीचा विकास होत आहे.

ग्रंथोत्सव राज्यातील 36 जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयांमार्फत वाचन संस्कृती वृध्दींगत व ग्रंथांचा सर्वदूर प्रसार करण्यासाठी 'ग्रंथोत्सव' हा उपक्रम मोठ्या दिमाखात साजरा करण्यात येतो. गतवर्षी या उत्सवाच्या आयोजनासाठी रु. 60,00,000/- इतका निधी वितरीत करण्यात आला आहे. या ग्रंथोत्सवात मोठ्या प्रमाणावर ग्रंथविक्री झाली आहे.

### ग्रंथ प्रदर्शने

ग्रंथालय संचालनालयाच्या माध्यमातून शासकीय आणि सार्वजनिक ग्रंथालयांकडून महाविभूतींच्या जयंत्या, उत्सव इ. कार्यक्रमांचे औचित्य साधून वाचन संस्कृतीचे संवर्धन करण्यासाठी ग्रंथ प्रदर्शने, कार्यशाळा, परिसंवाद इ. कार्यक्रमांचे नियमित आयोजन केले जाते. त्यामुळे समाजामध्ये वाचनाची आवड निर्माण होऊन दुर्मीळ ग्रंथाविषयी वाचकांना माहिती होऊन त्यांचा लाभ ते घेतात.

### सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन

शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांनी समाजामध्ये वाचन संस्कृती रूजविण्यसाठी सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करणे बंधनकारक आहे. त्यानुसार सार्वजनिक ग्रंथालयांकडून सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून ग्रंथालयाचा प्रचार व प्रसार केला जातो. या वर्षी 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' हा अभिनव उपक्रम राबविण्यात आला असून यामधून वाचन संस्कृती विषयी विविध उपक्रम हाती घेण्यात आले. या माध्यमातून अनेक नवीन सभासद झाले असून वाचक  संख्येत वाढ होण्यास मदत झाली आहे

### '4-क' साखळी योजना

महाराष्ट्र राज्याच्या पुनर्रचनेच्या पूर्वी भूतपूर्व मध्य प्रांतात असलेल्या विदर्भ विभागातील आठ जिल्हा  ग्रंथालय अधिकारी कार्यालयांमार्फत 1956 नंतर त्या त्या जिल्ह्यातील शाळा ग्रंथालयांना पुस्तकांचे संच पुरविण्याची '4-क' नावाची योजना विदर्भातील मध्यप्रांतात असणारे जिल्हे राज्य पूनर्रचनेनंतर प्रथम मुंबई व नंतरच्या महाराष्ट्रात समाविष्ट झाल्यानंतरही तशीच सुरू राहिली आहे.

ग्रंथालय संचालनालय अधिनस्त ग्रंथालयांचे / कार्यालयांचे ई-ग्रंथालयामध्ये रुपांतर करणे

ग्रंथालय संचालनालय व अधिनस्त कार्यालयांचे आधुनिकीकरण व ई-ग्रंथालयांमध्ये रुपांतरीत करणे या योजनेस प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे. त्यानुसार प्रथम टप्प्यात सहा विभागीय ग्रंथालये, एक स्मृती ग्रंथालय, दापोली व राज्य मध्यवर्ती ग्रंथालय, मुंबई अशा एकूण आठ  ग्रंथालयांचे ई-ग्रंथालयांमध्ये रुपांतरीत करण्याची कार्यवाही सुरू आहे. या अंतर्गत नाममात्र शुल्क आकारुन वाचकांना ई-बुक्स, ई-जर्नल्स  उपलब्ध करून देण्यात येतील. केंद्र शासन पुरस्कृत (NIC) ग्रंथालय आज्ञावली (e-Granthalaya- web-based) राज्यस्तरावर प्रस्थापित करण्यात येईल. IPR चे पालन करून Digital Access तसेच Online Database उपलब्ध करून देण्यात येईल.  भविष्यामध्ये दुर्मिळ ग्रंथ, हस्तलिखिते, नियतकालिके, वर्तमानपत्राची कात्रणे आणि कॉपीराइट संपुष्टात आलेले ग्रंथ डिजिटायजेशन करून उपलब्ध करून देण्याचा मानस आहे.

### ग्रंथालय संचालनालयाचे भविष्यातील संकल्प

राज्यातील शासकीय आणि सार्वजनिक ग्रंथालांच्या सर्वांगिण विकासासाठी ग्रंथालय संचालनालय प्रयत्नशील आहे. त्यासाठी ग्रंथालय संचालनालयाकडून ग्रंथालय चळवळ आणि वाचन संस्कृतीची जोपासना करणे, ई-प्रशासन धोरणाची अंमलबजावणी, ग्रंथालयांचे संगणकीकरण आणि आधुनिकीकरण इ. उपक्रम राबविण्याचे प्रस्तावित आहे.

### संगणकीकरण

ग्रंथालय संचालनालयांतर्गत शासकीय ग्रंथालयांमधील ग्रंथांचा डेटाबेस करून तो संचालनालयाच्या वेब पोर्टलवर ऑनलाइन स्वरूपात वेब ॲपॅकच्या माध्यमातून जनतेस खुला करणे. त्यामध्ये शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांमधील ग्रंथांचाही समावेश करणे. त्यानंतर राज्यातील शासकीय ग्रंथालयांचे प्रथम नेटवर्क उभारणे व सार्वजनिक ग्रंथालयांनाही त्यामध्ये सामावून घेणे. त्याअनुषंगाने शासकीय विभागीय ग्रंथालय, पुणे येथे संगणकीकीणाचा पथदर्शी प्रकल्प सुरू आहे. तसेच ग्रंथालय संचालनालयाशी संबंधित अन्य कामांचे व सेवांचे संगणकीकरण टप्याटप्याने करणे इ. बाबी यामध्ये अंतर्भूत आहेत.

### राज्य मध्यवर्ती ग्रंथालयाची BOT तत्त्वावर इमारत उभारणे

कालिना परिसरात BOT तत्वावरील अत्याधुनिक इमारत येत्या एक वर्षात बांधून पूर्ण करणे. त्या शिवाय अमरावती, रायगड, लातूर, हिंगोली, बीड व ठाणे इ. जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयांच्या इमारतींची बांधकामे पूर्ण करणे.

### वाचनसेवा विस्तार

राज्यातील शासनाच्या सार्वजनिक ग्रंथालयांमार्फत सर्वस्तरांतील सर्वसामान्य नागरिकांबरोबरच कैदी, रुग्ण व अंध व्यक्तींना वाचन सेवा पुरविणे.

### डिजिटल उपकेंद्रांची स्थापना

डिजिटल उपकेंद्र स्थापना बाबतच्या शासन निर्णयानुसार राज्यातील जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय मार्फत डिजिटल उपकेंद्रांची स्थापना करणे.

### ई-प्रशासन

प्रशासकीय कामकाज अधिक गतिमान आणि कागदविरहीत होण्यासाठी ई-ऑफिस' प्रणाली सुरू करण्यात आली आहे. यामुळे प्रशाकीय कामकाजाला गती येईल. ग्रंथालय संचालनालयांतर्गत कार्यालयांमध्ये ई-प्रशासन प्रभावीपणे राबविण्याकरिता ई-ऑफिस सारख्या प्रणालींचा स्विकार केला आहे.   समाजात वाचन संस्कृती रूजावी म्हणून ग्रंथालय संचालनालयामार्फत नवनवीन उपक्रम राबविले जातात. राज्यातील शासनमान्य आणि सार्वजनिक ग्रंथालयांमार्फत समाजातील लोकांमध्ये वाचनाविषयी अभिरूची निर्माण व्हावी यासाठी विविध लोकाभिमुख कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. त्यामध्ये प्रामुख्याने ग्रंथ प्रदर्शने भरविणे, फिरते ग्रंथालय सेवा, विविध सांस्कृतिक कार्यक्रम, कार्यशाळा, संगणकाधारित नवीन ग्रंथालय आणि माहिती सेवांचा समावेश करता येईल. तसेच केंद्रशासनाच्या राजा राममोहन ग्रंथालय प्रतिष्ठान मार्फत कार्यशाळा, चर्चासत्रे, परिसंवाद इ. कार्यक्रमांचे आयोजन केले जाते.

राज्यातील ग्रंथालयांची उपरोक्त दर्शविलेल्या तक्त्यातील संख्यात्मक स्थितीवर समाधान मानणे पुरेसे नाही. त्यासाठी आपण जाणीवपूर्वक आत्मपरिक्षण करून ही ग्रंथालये केवळ ग्रंथांच्या देवघेवीच्या परिघात न रेंगाळता कालानुरूप अद्ययावत कशी होऊ शकतील या दृष्टीने शासन, ग्रंथालय संचालनालय, ग्रंथालय चळवळीतील कार्यकर्ते, कर्मचारी आणि वाचक या सर्वच घटकांनी प्रयत्न केले पाहिजेत. त्यासाठी सुधारणांना खूप वाव आहे.




# कला संचालनालयाचा शतकी प्रवास

**श्री. राजीव मिश्रा**

दृश्यकलेच्या समृद्ध परंपरेचा वारसा जपणारे महाराष्ट्र राज्य हे कला शिक्षणाच्या क्षेत्रात देशात अग्रस्थानी राहिले आहे. सन १८५७ मध्ये सर जे.जे.स्कूल ऑफ आर्ट, मुंबई या संस्थेच्या स्थापनेपासून सुरू झालेली ही वाटचाल आज 'कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई' या स्वतंत्र विभागाच्या रूपाने बहरलेली दिसते. राज्यात शालेय स्तरापासून उच्च शिक्षणापर्यंत विविध कला शाखांमध्ये शिक्षण दिले जात असून, शासकीय, अनुदानित व विनाअनुदानित अशा २१३ कला संस्था कार्यरत आहेत. कलेच्या प्रसारासाठी आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी समर्पित असलेले हे संचालनालय केवळ शैक्षणिक यंत्रणा नसून, एक सांस्कृतिक चळवळ उभी करणारे केंद्र बनले आहे.

आमच्या संचालांनालायचे नाव 'कला संचालनालय' असे असले तरी खरे तर ते पूर्णपणे दृश्य कलेला वाहिलेले आहे. दृश्य कला ही शालेय स्तरापासून ते उच्च शिक्षण स्तरापर्यंत वापरात येते व कलावंत घडविण्याचे काम करते. आपला महाराष्ट्र कला शिक्षणाच्या क्षेत्रामध्ये नेहमीच अग्रेसर राहिला आहे. राज्याला एका शतकाहून अधिक काळाची कलेची दीर्घ परंपरा लाभली आहे. सर जमशेटजी जीजीभाई यांनी दिलेल्या देणगीतून सन १८५७ मध्ये सर जे.जे.स्कूल ऑफ आर्ट,मुंबई या कला संस्थेची स्थापना झाली. संस्थेचा पहिला वर्ग दोन मार्च मार्च, 1857 रोजी एलफिन्स्टन या संस्थेत सुरू झाला. या संस्थेत सुरुवातीपासूनच डिझाईन, पेंटींग, शिल्पकला व प्रतिमानबंध, धातूकाम इत्यादी अभ्यासक्रम शिकविण्यात येत होते.

दोन्ही महायुद्धांच्या काळातील अस्थिर परिस्थितीमध्येही राज्यातील कला शिक्षणाची पिछेहाट झाली नाही..तर कला शिक्षणाचा प्रसार उत्तरोत्तर वाढतच गेला. मुंबई, नागपूर, पुणे, नाशिक व कोल्हापूर इत्यादी प्रमुख शहरांमध्ये नवनवीन कला संस्था स्थापन झाल्या व त्या आजही कार्यरत आहेत. त्यानंतर गरजेनुसार व कलाप्रेमीकडून आलेल्या मागणीनुसार मातीकाम, धातूकाम, अंतर्गत गृहसजावट, वस्त्र प्रावरणे इत्यादी अभ्यासक्रम सर जे.जे.कला शाळा आवारातील रे-आर्ट वर्कशॉप या स्वतंत्र इमारतीत सन १८९१ मध्ये सुरू करण्यात आले.

कॅप्टन डब्ल्यू इ.ग्लॅडस्टोन सोलोमन यांच्या कारकिर्दीत सर जे.जे.स्कूल ऑफ आर्टच्या कला क्षेत्रातील नावलौकीकात वाढ झाली. भारतीय कलाकारांनी स्वतंत्र अस्तित्व निर्माण केले. सोलोमन यांचे सहकारी श्री.चार्ल्स जेराड यांनी कलेला व्यावसायिकतेची जोड देत उपयोजित कला(applied arts) हा अभ्यासक्रम सन १९३५ साली सुरू केला. सध्या कार्यरत असलेली सर जे.जे.इन्स्टिटयूट ऑफ अप्लाईड आर्ट, मुंबई ही संस्था यातूनच उदयाला आली.

विसाव्या शतकाच्या प्रारंभास भारताच्या राजकीय व सांस्कृतिक क्षेत्रात आमूलाग्र बदल झाले. भारतीय कलाकारांनी आपले कलाकौशल्य जागतिक स्तरावर नेऊन पोहेचविले. म्हणूनच भारतीय कलेचा वारसा त्यांच्या सौंदर्यमूल्यासाठी ओळखला जाऊ लागला. त्यामध्ये कुमारस्वामी व इतर नामवंत कलावंतांचा नामोल्लेख प्रकर्षाने केला जातो.

कालांतराने राष्ट्रीय स्तरावर कला शिक्षणाच्या प्रसाराचे काम सुरू झाले. याच कालावधीत शालेय स्तरावर कला शिक्षणाचा प्रचार व प्रसार करण्यासाठी आणि तसेच शैक्षणिक स्तरावरील कला शिक्षणाच्या निरीक्षणासाठी निरीक्षक,



(चित्रकला व शिल्प), महाराष्ट्र राज्य, मुंबई या कार्यालयाची निर्मिती करण्यात आली. हे कार्यालय शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अखत्यारीत होते. मात्र मुंबईतील सर ज.जी.कला संस्था व सर ज.जी.उपयोजित कला संस्था या दोन महत्त्वाच्या शासकीय संस्था थेट शासनाच्या नियंत्रणाखाली होत्या. या कार्यालयांना विविध कर्तव्ये पार पाडण्यासाठी तसेच कला शिक्षणाच्या योजना अंमलात आणण्यासाठी योग्य मार्गदर्शनाची आवश्यकता होती. तीन स्वतंत्र कार्यालयांकडून करण्यात येणारी कला शिक्षणाची कामे व परीक्षा आयोजनामध्ये योग्य मेळ घालणे अडचणीचे ठरत होते. निरीक्षक, (चित्रकला व शिल्प) हे परीक्षा समितीचे सचिव व रेखाकला परीक्षांचे संघटक होते; आणि उच्चकला परीक्षा सर ज.जी.कला महाविद्यालयाच्या संस्था प्रमुखांमार्फत घेतल्या जात असत. उच्च कला परीक्षा व राज्य कला प्रदर्शनाच्या मंजूर रकमा शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे सुपूर्द करण्यात येत असत. उपरोक्त बाबतीत कामाची द्विरुक्ती होऊन विलंब होत असे. तसेच कामामध्ये तांत्रिक अडचणी निर्माण होत असत. यास्तव कला शिक्षणाच्या बाबींवर धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी आणि कलेचा विकास करण्यासाठी एक स्वतंत्र विभाग निर्माण करण्याचा निर्णय, काळाची गरज लक्षात घेऊन दिनांक १२ जून,१९६५ रोजी घेण्यात आला. त्यानुसार भारतातील पहिलेच "कला संचालनालय"महाराष्ट्रामध्ये सर ज.जी.कला शाळा आवारात स्थापन करण्यात आले आहे. प्रा.वि.ना.आडारकर हे सर जे.जे. इन्स्टिटयूट ऑफ अप्लाइड आर्टचे तत्कालीन अधिष्ठाता पहिले कला संचालक म्हणून नियुक्त झाले होते. आजच्या घडीला कला संचालनालयाच्या अखत्यारित शासकीय(४),अनुदानित(३१) व विनाअनुदानित(१७८) कला संस्था आणि एक संगीत महाविद्यालय कार्यरत आहे.

### कला संचालनालय व अधिपत्याखालील कार्यालये/शासकीय कला संस्था:-

१) कला संचालनालय,महाराष्ट्र राज्य,मुंबई
२) महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ,मुंबई
३) महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ विभागीय कार्यालय, मुंबई
४) महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ विभागीय कार्यालय, नागपूर
५) महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ विभागीय कार्यालय, छत्रपती संभाजीनगर
६) सर ज.जी.कला संस्था वसतिगृह, वांद्रे, मुंबई
७) सर ज.जी.कला महाविद्यालय, मुंबई
८) सर ज.जी.उपयोजित कला महाविद्यालय, मुंबई
९) शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय, नागपूर
१०) शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय, छत्रपती संभाजी नगर
११) भारतरत्न लता दीनानाथ मंगेशकर आंतरराष्ट्रीय संगीत महाविद्यालय,मुंबई

### *पदवी (बी.एफ.ए.) अभ्यासक्रम राबविणाऱ्या खाजगी कला संस्था:-

१) बी.एस.बांदेकर कॉलेज ऑफ फाईन आर्ट, सावंतवाडी,जि.सिंधूदुर्ग
२) रचना संसद कॉलेज ऑफ अप्लाईड आर्ट ॲन्ड क्राफ्ट, प्रभादेवी, मुंबई
३) भारती विद्यापीठाचे भारती कला महाविद्यालय, कात्रज, धनकवडी, पुणे
४) डॉ.डी.वाय.पाटील कॉलेज ऑफ अप्लाईड आर्ट ॲन्ड क्राफ्ट, आकुर्डी,पुणे
५) विवा इन्स्टिटयूट ऑफ अप्लाईड आर्ट, विरार, जि.पालघर
६) पद्मभूषण वसंतदादा पाटील प्रतिष्ठान यांचे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, सायन,मुंबई

**शासकीय कला संस्थांमध्ये शिकविण्यात येणारे अभ्यासक्रम:-**

| अ.क्र. | अभ्यासक्रम | कालावधी | प्रवेश मर्यादा (प्रथम वर्ष) |
|---|---|---|---|
| | **पदवी (बी.एफ.ए.)** | | |
| 1 | रेखा व रंगकला | ४ वर्षे | ७५ |
| 2 | शिल्पकला | ४ वर्षे | ०५ |
| 3 | उपयोजित कला | ४ वर्षे | १६५ |
| 4 | अंतर्गत गृहसजावट | ४ वर्षे | १५ |
| 5 | मातकाम | ४ वर्षे | ०५ |
| 6 | वस्त्रकाम | ४ वर्षे | ३० |
| 7 | धातूकाम | ४ वर्षे | ०५ |
| | **पदव्युत्तर पदवी (एम.एफ.ए.)** | | |
| 1 | रेखा व रंगकला | २ वर्षे | ४५ |
| 2 | शिल्पकला | २ वर्षे | १० |
| 3 | उपयोजित कला(इलस्ट्रेशन/ टायपोग्राफी/फोटोग्राफी/कम्प्यूटर ग्राफीक्स/एक्झीबिशन डिस्प्ले व डिझाईन) | २ वर्षे | ७२ |
| 4 | अंतर्गत गृहसजावट | २ वर्षे | १० |
| 5 | मातीकाम | २ वर्षे | ०५ |
| 6 | वस्त्रकाम | २ वर्षे | ०५ |
| 7 | धातूकाम | २ वर्षे | ०५ |
| | **पदविका** | | |
| 1 | शिल्पकला व प्रतिमानबंध | ४ वर्षे | १० |
| 2 | कला शिक्षक प्रशिक्षण | २ वर्षे | ८५ |
| | **पदव्युत्तर पदविका** | | |
| 1 | कला शिक्षणशास्त्र पदविका | १ वर्ष | २५ |
| | प्रमाणपत्र | | |
| 1 | आर्ट मास्टर (अंशकालीन/सुट्टीतील) | १ वर्ष/३ वर्षे | २५ |
| 2 | छायाचित्रण(अंशकालीन) | १ वर्ष | ९० |





Saurabh-Talekar_Painting_Aqua_Acrylic-Collage-on-Paper_20000




**भारतरत्न लता दीनानाथ मंगेशकर आंतरराष्ट्रीय संगीत महाविद्यालय,मुंबई येथे शिकविण्यात येणारे अभ्यासक्रम:-**

| अ.क्र. | अभ्यासक्रम | कालावधी | प्रवेश मर्यादा |
|---|---|---|---|
| | प्रमाणपत्र | | |
| 1 | हिंदुस्थानी शास्त्रीय संगीत | १ वर्ष | २५ |
| 2 | बासरी वादन | १ वर्ष | २५ |
| 3 | तबला वादन | १वर्ष | २५ |
| 4 | सतार वादन | १ वर्ष | २५ |
| 5 | पियानो/किबोर्ड वादन | १ वर्ष | २५ |
| 6 | संगीत निर्मिती | १ वर्ष | २५ |
| 7 | ध्वनी अभियांत्रिकी | १ वर्ष | २५ |
| 8 | भावसंगीत(अंशकालीन) | ६ महिने | ५० |

**अनुदानित व विनाअनुदानित कला संस्थांमध्ये शिकविण्यात येणारे अभ्यासक्रम:-**

| अ.क्र. | अभ्यासक्रम | कालावधी | प्रवेश मर्यादा (प्रथम वर्ष) |
|---|---|---|---|
| | पदविका | | |
| 1 | रेखा व रंगकला | ४ वर्षे | १५ |
| 2 | शिल्पकला | ४ वर्षे | १५ |
| 3 | उपयोजित कला | ४ वर्षे | १५ |
| 4 | अंतर्गत गृहसजावट | २ वर्षे | १५ |
| 5 | मातकाम | २ वर्षे | १५ |
| 6 | वस्त्रकाम | २ वर्षे | १५ |
| 7 | धातुकाम | २ वर्षे | १५ |
| 8 | मुलभूत | १ वर्ष | १५ |
| 9 | कला शिक्षक प्रशिक्षण | २ वर्षे | २५ |
| | पदवी/पदविकोत्तर पदविका | | |
| 10 | कला शिक्षणशास्त्र पदविका | १ वर्ष | २५ |
| | प्रमाणपत्र | | |
| 11 | आर्ट मास्टर प्रमाणपत्र (अंशकालीन/सुट्टीतील) | १/३ वर्षे | २५ |

**सर ज.जी.कला,वास्तुकला आणि अभिकल्प विद्यालय, मुंबई**

सर ज.जी. कला महाविद्यालय,मुंबई, सर ज.जी. उपयोजित कला महाविद्यालय, मुंबई आणि सर ज.जी.वास्तुशास्त्र महाविद्यालय,मुंबई या तीन शासकीय महाविद्यालयांचे मिळून डी-नोव्हो प्रकारांतर्गत “सर ज.जी.कला,वास्तुकला आणि अभिकल्प विद्यालय” हे अभिमत विद्यापीठ स्थापन करण्यास शासनाकडून मान्यता प्रदान करण्यात आली आहे. सन २०१७ पासून चिकाटीने संचालनालयाने व सर जे.जे. कला महाविद्यालयाने शासनाच्या माध्यमातून प्रयत्नपूर्वक पाठपुरावा करून देशातील तिसरे आणि राज्यातील पहिलेच असे शासनाचे अनन्य अभिमत विद्यापीठ स्थापन झाले आहे. सर ज.जी.कला, वास्तुकला आणि उपयोजित कला या तिन्ही संस्थांचे एकत्रीकरण होऊन संपूर्ण सर ज.जी.कलाशाळा आवार हे विद्यापीठ म्हणून ओळखले जाऊ लागले आहे, ही अभिमानास्पद बाब आहे.

**महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ, मुंबई**

राष्ट्रीय  शैक्षणिक धोरण लक्षात घेऊन पदविका अभ्यासक्रमांचे आधुनिकीकरण आणि प्रमाणिकीकरण करण्याच्या उद्देशाने दि.१९ जानेवारी,२०२४ रोजी “महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ” स्थापन करण्यात आले आहे. कला संचालनालयाच्या अखत्यारीतील निरीक्षक, चित्रकला व शिल्प, महाराष्ट्र राज्य, मुंबई, सहायक निरीक्षक, चित्रकला व शिल्प विभागीय कार्यालय, नागपूर आणि सहायक निरीक्षक, चित्रकला व शिल्प विभागीय कार्यालय, छत्रपती संभाजीनगर या तत्कालीन कार्यालयांचे त्याचप्रमाणे कला संचालनालयातील परीक्षा विभागाचे मिळून महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळात रुपांतर करण्यात आले आहे.

**कला संचालनालयाचे कार्यक्षेत्र:-**

१) दृककलेच्या क्षेत्रातील विविध कार्यांची सुसूत्र  व शास्त्रशुद्ध आखणी करणे, रेखा व रंगकला, शिल्पकला, उपयोजित कला, सर्वसाधारण शिक्षणामध्ये

अंतर्भाव केलेली कला व कला शिक्षक प्रशिक्षण व तत्सम अन्य विषयांसंबंधी उद्भवणाऱ्या समस्या हाताळणे,

२) कला शिक्षकांसाठी प्रायोगिक शिबिरे, कार्यशाळा, चर्चासत्रे आयोजित करणे,

३) शिक्षण क्षेत्रातील कला शिक्षणाच्या तपासणीची व्यवस्था करणे,

४) तालुका व जिल्हा स्तरावर बालचित्रकला स्पर्धा आयोजित करणे,

५) खाजगी कला संस्थांना पदविका अभ्यासक्रम शिकविण्यासाठी शासनमान्यता देणे व त्यांना अनुदान मंजूर करणे,

६) शासकीय, शासनमान्यअशासकीय अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित कला महाविद्यालयांवर नियंत्रण ठेवणे,

७) राज्य कला प्रदर्शन आयोजित करणे,

८) कलाकार विभागातील नामवंत कलाकारांचा रोख रक्कम रु.१,००,०००/-मानधन व सन्मानपत्र देऊन गौरव करणे,

९) विद्यार्थी विभागातील नामवंत कलाकारांचा, रोख रक्कम रु.५०,०००/- मानधन व सन्मानपत्र देऊन गौरव करणे,

10) दृश्यकला पदविका अभ्यासक्रमांना प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी उच्चकला परीक्षेचे आयोजन करणे,

11) शासकीय रेखाकला परीक्षा (एलिमेंटरी व इंटरमिजिएट) यांचे महाराष्ट्र व महाराष्ट्राबाहेरील राज्यांत आयोजन करणे,

12) शासनाकडून वेळोवेळी सोपविण्यात येणारी सर्व प्रकारची कलात्मक सजावटीची कलाविषयक कामगिरी पार पाडणे,

१३) दृश्यकलेच्या क्षेत्रात सातत्यपूर्ण महत्वाचे योगदान देणाऱ्या नामवंत व ज्येष्ठ कलाकारांना "वासुदेव गायतोंडे कला जीवन गौरव पुरस्कार"प्रदान करणे,

14) दृश्य कलेद्वारे सर्वसामान्य जनतेमध्ये सौंदर्याभिरुची निर्माण करणे.

**कला संचालनालयाकडून राबविण्यात येणारे उपक्रम:-**

**१) कला प्रदर्शन**

दृश्य कलेच्या क्षेत्रातील विद्यार्थ्यांचे तसेच उद्योन्मुख कलाकारांच्या सुप्त कला गुणांना वाव मिळावा, त्यांची कला प्रदर्शित करण्यासाठी हक्काचे व्यासपीठ मिळावे म्हणून सन १९६५ पासून महाराष्ट्रात दरवर्षी राज्य कला प्रदर्शन आयोजित करण्याबाबतचा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. सदर कला प्रदर्शन "कलाकार विभाग" व "विद्यार्थी विभाग" अशा दोन विभागात जानेवारी ते मार्च या दरम्यान दरवर्षी आयोजित करण्यात येते. या प्रदर्शनाचे उदघाटन मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या शुभहस्ते करण्यात येते.

**अ)विद्यार्थी विभाग-**

विद्यार्थी विभागाचे कला प्रदर्शन दरवर्षी राज्यातील कोणत्याही एका ठिकाणी आयोजित करण्यात येते. विद्यार्थी विभागाच्या कला प्रदर्शनात मुलभूत, शिल्पकला, चित्रकला, उपयोजित कला, कला शिक्षक प्रशिक्षण आणि कला हस्तशिल्प या विभागातील विद्यार्थी सहभाग घेतात. या प्रदर्शनातील उत्कृष्ट कलाकृतींना पारितोषिके देऊन गौरविण्यात येते. विविध विभागात एकूण १,७०,००० इतक्या रकमेची एकूण ३१ पारितोषिके दिली जातात.

**ब) कलाकार विभाग-**

कलाकार विभागाचे कला प्रदर्शन दरवर्षी जहांगीर आर्ट गॅलरी, मुंबई येथे आयोजित करण्यात येते. कलाकार विभागातील १) रेखा व रंगकला,२)शिल्पकला,३)उपयोजित कला,४)मुद्राचित्रण,५)अपंग कलाकार या विविध विभागाच्या प्रदर्शनातील पारितोषिक विजेत्या एकूण १५ कलाकृतींना प्रत्येकी रु.५०,०००- प्रमाणे रु.७,५०,०००/- इतक्या रोख रकमेची पारितोषिके देण्यात येतात.

**2) नामवंत कलाकार गौरव-**

महाराष्ट्र राज्य कला प्रदर्शनानिमित्ताने दृश्य कला क्षेत्रात योगदान देणाऱ्या नामवंत कराकारांपैकी विद्यार्थी विभाग व कलाकार विभाग अशा दोन्ही विभागात प्रत्येकी एक कलाकाराचा गौरव करून अनुक्रमे रु.५०,०००/- व रु.,००,०००/- इतक्या रोख रकमेचे मानधन देण्यात येते.

**3) वासुदेव गायतोंडे कला जीवन गौरव पुरस्कार-**

दृश्य कला क्षेत्रात महत्त्वाचे योगदान देणाऱ्या महाराष्ट्र राज्यातील नामवंत व ज्येष्ठ कलाकारांचा यथोचित सन्मान करण्यासाठी

**कला संचालनालयाकडून राबविण्यात येणाऱ्या योजना:-**

| अ. क्र. | योजना |
|---|---|
| 1 | कला संचालनालयाचा व मुंबई येथील चित्रकला/हस्तव्यवसाय निरीक्षक यांच्या कार्यालयाचा विस्तार आणि विकास करणे. |
| 2 | पाठयपुस्तक/ कला साहित्य प्रकाशित करणे व दुर्मिळ चित्रांचे संस्करण, संरक्षण व पुन:स्थापन करणे |
| 3 | शासकीय कला संस्थांचा विकास व विस्तार करणे |
| 4 | सर्वसाधारण शिष्यवृत्त्या, (शिष्यवृत्या/ विद्यावेतने) |
| 5 | दक्षिणा व इतर अधिछात्रावृत्त्या,(शिष्यवृत्या/ विद्यावेतने) |
| 6 | स्वेच्छा अनुदानातून वित्तीय व्यवस्था केलेली गौण बांधकामे (लहान बांधकामे) |
| 7 | मोठी बांधकामे करणे |
| 8 | राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना. |
| 9 | डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना. |



**कलाकारांचा राज्य शासनाकडून सन्मान करण्यात आला आहे.**

| अ.क्र. | पुरस्कारार्थीचे नांव | विभाग | सन |
|---|---|---|---|
| 1 | पद्मभूषण श्री. अकबर पदमसी | रेखा व रंगकला | २०१९-२० |
| 2 | पद्मभूषण श्री.राम सुतार | शिल्पकला | २०२०-२१ |
| 3 | श्री.अरुण काळे | उपयोजित कला | २०२१-२२ |
| 4 | श्री.लक्ष्मण श्रेष्ठ | रेखा व रंगकला | २०२२-२३ |

महाराष्ट्र शासनाच्या वतीने सन २०१९-२० पासून दरवर्षी "वासुदेव गायतोंडे कला जीवन गौरव पुरस्कार" प्रदान केले जातात. या पुरस्काराचे स्वरुप रु.५ लक्ष, सन्मान चिन्ह आणि मानपत्र असे आहे. त्यानुसार दृश्य कला क्षेत्रात महत्त्वाचे योगदान देणाऱ्या महाराष्ट्र राज्यातील एका नामवंत व ज्येष्ठ कलाकारांचा रु. पाच लक्ष, सन्मान चिन्ह आणि मानपत्र देऊन दरवर्षी यथोचित सन्मान करण्यात येतो. सन २०१९-२० पासून आजतागायत पुढीलप्रमाणे ज्येष्ठ

**4) बाल चित्रकला स्पर्धा-**

बालकांच्या सर्वांगीण विकासासोबतच त्यांच्यामध्ये कला विषयक अभिरुची निर्माण व्हावी याकरिता दरवर्षी ऑगस्ट महिन्यात शालेय स्तरावर बाल चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात येते. सन १९७० पासून स्वर्गीय पंतप्रधान पंडीत जवाहरलाल नेहरु यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधून दरवर्षी 1१४ नोव्हेंबर रोजी बक्षीसे वितरीत करण्यात येतात. ही स्पर्धा जिल्हास्तरावर आयोजित करण्यात येते. या स्पर्धेतील उत्कृष्ट कलाकृतींना चार गटात प्रत्येक गटात तीन बक्षीसे याप्रमाणे एकूण १२ बक्षीसे देण्यात येतात. तसेच २० स्पर्धकांना उत्तेजनार्थ प्रमाणपत्र देण्यात येतात.

**शालेय शिक्षण व उच्च शिक्षण यामधील दुवा-**

शालेय स्तरावरील विद्यार्थ्यांमध्ये प्राथमिक शिक्षणापासूनच कलेची अभिरुची निर्माण व्हावी याकरिता शालेय स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी कला संचालनालयाकडून शासकीय रेखाकला (एलिमेंटरी व इंटरमिजिएट ड्रॉईंग ग्रेड परीक्षा) परीक्षांचे आयोजन करण्यात येते. सदर रेखाकला परीक्षांचे व पदविका अभ्यासक्रमांच्या उच्चकला परीक्षांचे आयोजन सुत्रबद्ध पद्धतीने करता यावे व त्यामध्ये अत्याधुनिक सोयी सुविधा पुरविता याव्यात याकरिता दि.१९ जानेवारी,२०२४ रोजी महाराष्ट्र शासनाने "महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ" या कार्यालयाची निर्मिती केलेली आहे. महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळामार्फत सध्या महाराष्ट्रात तसेच राज्याबाहेरही मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश, उत्तराखंड या राज्यांमध्ये देखील शालेय स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी शासकीय रेखाकला (एलिमेंटरी व इंटरमिजिएट ड्रॉईंग ग्रेड परीक्षा) परीक्षांचे आयोजन करण्यात येते. शासकीय रेखाकला परीक्षांचा वास्तुशास्त्र, दृश्यकला यांसारखे उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना मोठया प्रमाणावर लाभ होतो. त्यामुळे सद्यस्थितीत रेखाकला परीक्षेकरीता प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या साधारणत: आठ लाखांवर पोहोचली आहे.

**कला संचालनालयांतर्गत योजनांतर्गत योजनेमधील निधीतून खालीलप्रमाणे कामे करण्यात येतात.**

१) सर ज. जी. कला महाविद्यालय, मुंबई येथील "रे आर्ट वर्कशॉप" इमारतीचे नुतनीकरण करणे.

२) सर ज. जी. कला शाळा आवारातील मुख्य इमारतीचा जीर्णोध्दार करणे.

3) सर ज. जी. कला शाळा आवारातील जूनी अप्लाईड आर्ट इमारतीचा जीर्णोध्दार करणे.

4) सर ज. जी. कला शाळा आवारातील जुनी अर्किटेक्चर इमारतीचा जीर्णोध्दार करणे.

५) सर ज.जी.कला वसतिगृह इमारत व सर ज.जी. वास्तूकला वसतीगृह इमारतींचे बांधकाम करणे.

६) भारतरत्न लता दीनानाथ मंगेशकर आंतरराष्ट्रीय संगीत महाविद्यालयाच्या व संग्रहालयाच्या इमारतीचे बांधकाम करणे.

अश्या प्रकारे 'सर ज.जी.कला, वास्तुकला आणि अभिकल्प विद्यालय' या राज्यातील पहिल्या अभिमत विद्यापीठाच्या रूपाने महाराष्ट्राचा कलेचा वारसा पुढे नेला जात असताना महाराष्ट्राची दृश्यकला परंपरा अधिक उज्वल होत आहे.




# डॅशबोर्ड पोर्टल: सुसंगत माहितीचे आगर

**स्वप्नील कोरडे**
सांख्यिकी अधिकारी, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे

सध्याच्या बदलत्या जगात विदा म्हणजे डेटा ही कमालीची महत्त्वपूर्ण गोष्ट ठरत आहे. 'डेटा इज न्यू ऑइल' असे म्हटले जाण्याचा हा काळ आहे. अश्या काळात उच्च आणि तंत्र शिक्षण विभागाच्या आधिनस्त असलेली सर्व विद्यापीठे, संस्था, महाविद्यालये यांचा डेटा स्वयंचलित पद्धतीने गोळा करणारे डॅशबोर्ड पोर्टल सुरू करणे हा एक मैलाचा दगड ठरणार आहे. या डॅशबोर्ड पोर्टलबाबत लिहिलेला हा लेख

विद्यापीठे आणि त्यांच्याशी संलग्न महाविद्यालये म्हणजे माहितीचे आगर आहे. इथून नेहमीच मोठ्या प्रमाणात माहिती आणि विदा(डेटा) निर्माण होत असते. ही माहिती आणि विदा योग्यरित्या संकलीत केली तर तिचा वेळोवेळी उपयोग होऊ शकतो. उदाहरणार्थ दर वर्षी प्रवेश घेणारे विद्यार्थी किती, त्यातील ग्रामीण भागातून येणारे किती आणि शहरी भागातून येणारे किती, मुले किती आणि मुली किती, दर वर्षी महाविद्यालयात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचा विविध विद्याशाखात प्रवेश घेण्याचा कल कसा आहे, तो दर वर्षी कसा बदलतो आहे यासारखी सगळी माहिती योग्य रीतीने संकलित झाल्यास फायद्याचे ठरू शकते.

यापूर्वी उच्च व तंत्र शिक्षण विभागामार्फत माहिती संकलित करण्याची प्रणाली अस्तित्वात नव्हती तसेच विभागा अंतर्गत असलेल्या संचालनालयांमार्फत माहिती व्यवस्थापन प्रणालीद्वारे माहिती गोळा केली जात होती. या प्रणालीद्वारे संचालनालयाच्या अधिनस्त असलेल्या विद्यापीठांतील आणि महाविद्यालयांतील माहिती संकलित होत असे. विद्यापीठे आणि महाविद्यालये ही ऑनलाइन पद्धतीने माहिती भरत होती आणि त्यावर आधारित विविध अहवाल तयार केले जात होते.

हे सर्वेक्षण वार्षिक पद्धतीने घेतले जात होते. विद्यापीठे व महाविद्यालये त्यांचा आवश्यक डेटा पोर्टलमध्ये नोंदवित असत. परंतु, त्या सर्वेक्षणांमधील माहितीमध्ये विसंगती आढळून येत असे. माहिती संकलनाची प्रक्रिया विलंबाने आणि माहितीची उलटतपासणी न करता होत असे त्यामुळे अश्या त्रुटी आढळत. खरे तर विद्यापीठे व महाविद्यालये त्यांच्याकडील डेटा ऑनलाइन पद्धतीने संकलित करत असतात. तरी देखील त्यांची अंतिम माहिती नोंदवताना त्या माहितीच्या अचूकतेचे प्रमाण सुसंगत नसे. परिणामी या माहितीच्या आधारे धोरणे ठरविताना अडचणी येत असत.

या सर्व समस्या सोडविण्यासाठी आणि अचूक व अद्ययावत माहिती मिळविण्यासाठी उच्च व तंत्र शिक्षण विभागाने डॅशबोर्ड पोर्टल विकसित केले आहे. या पोर्टलच्या माध्यमातून, API (Application Programming Interface) च्या सहाय्याने, विद्यापीठे आणि महाविद्यालये स्वयंचलित पद्धतीने माहिती पोर्टलवर अपलोड करतील. शिक्षण विभागांतर्गत सर्व महाविद्यालये, संस्था, विद्यापीठे, ग्रंथालये, यांच्या संबंधित विदा(संलग्नीकरण, विद्यार्थी, परीक्षा, निकाल, शिष्यवृत्ती इत्यादी) यामुळे माहिती संकलनाची प्रक्रिया मानवी हस्तक्षेपाशिवाय, सुसंगत, आणि अचूक होईल. डॅशबोर्ड पोर्टलमुळे रिअल-टाईम डेटा उपलब्ध होत आहे. ज्यामुळे विविध शैक्षणिक घटकांना अधिक सुसंगत, विश्वासार्ह, आणि अद्ययावत माहितीचा आधार मिळत आहे.

सध्या सार्वजनिक विद्यापीठांची माहिती API द्वारे पोर्टलशी जोडली गेलेली असून खाजगी विद्यापीठे API द्वारे जोडण्याचे अभियान सुरू आहे. जेव्हा सर्व विद्यापीठांची माहिती API द्वारे पोर्टलशी जोडली जाईल, तेव्हा संपूर्ण प्रक्रिया स्वयंचलित होईल आणि योग्य, अचूक माहिती अधिक सुलभपणे मिळवता येईल.

डॅशबोर्ड पोर्टलच्या कार्यान्वयनामुळे मानवी हस्तक्षेपाशिवाय डेटा संकलनाची प्रक्रिया अधिक सुसंगत, कार्यक्षम, आणि पारदर्शक होत आहे. या पोर्टलद्वारे, शैक्षणिक संस्थांना त्यांच्या डेटा व्यवस्थापनात सुधारणा करण्याची संधी मिळेल. उच्च व तंत्र शिक्षण विभागाला अद्ययावत, विश्वसार्ह आणि रिअल-टाईम डेटा मिळवता येईल, ज्यामुळे शैक्षणिक धोरणे, योजना, आणि निर्णय अधिक अचूक होऊ शकतील.

तसेच, विविध शैक्षणिक अहवाल एकाच ठिकाणी उपलब्ध होतील. या अहवालात प्रवेशित विद्यार्थ्यांची संख्या, प्रवेश प्रक्रिया, महाविद्यालयाच्या प्रकारानुसार विद्यार्थी संख्या, प्रवेशित विद्यार्थ्यांचे जातनिहाय व लिंगनिहाय विभाजन, महाविद्यालयांच्या भौतिक सुविधांचा तपशील, आणि शिष्यवृत्तीसाठी अर्ज केलेले व प्रत्यक्षात लाभ घेतलेले विद्यार्थी यांची माहिती असेल.

पोर्टलच्या पूर्ण कार्यान्वयनामुळे एकाच ठिकाणी संकलित केलेली माहिती विविध विभागांना एकत्रितपणे आणि सुसंगतपणे मिळवता येईल. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, राज्य सरकार, आणि संबंधित प्रशासनाला वेळेवर आणि अचूक माहिती मिळू शकेल. यामध्ये विद्यापीठांचा रिअल-टाईम डेटा, प्रवेश प्रक्रिया, परीक्षा निकाल, कॅम्पस सुविधांचे तपशील, तसेच शिष्यवृत्तीसाठी अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांची माहिती यांचा समावेश असेल.

तथापि, या पोर्टलच्या यशस्वी कार्यान्वयनासाठी सर्व संबंधित घटकांचे सहकार्य आवश्यक आहे. या पोर्टलचे यश हे विद्यापीठे, महाविद्यालये, आणि शैक्षणिक धोरणात्मक निर्णय घेणाऱ्या सर्व संबंधित व्यक्तींच्या सहकार्यावर अवलंबून आहे. योग्यरित्या सहकार्य मिळाल्यास डॅशबोर्ड पोर्टलच्या माध्यमातून, मानव हस्तक्षेपाशिवाय रिअल-टाईम डेटा संकलित होईल, आणि शैक्षणिक व्यवस्थेत एक नवीन सुधारणा होईल.





# सुशासनाची प्रकाशवाट

**प्रा. (डॉ.) प्रशांत मगर**
शैक्षणिक समन्वयक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे

शासन म्हटलं की डोळ्यासमोर येते ती फाईलींची गर्दी, प्रशासकीय इमारतींचं औपचारिक वातावरण, आणि कधी कधी गुंतागुंतीची प्रक्रिया. पण याच पारंपरिक कल्पनांच्या पलीकडे, जेव्हा शासन व्यवस्था माणसाच्या जीवनाला सुलभ, पारदर्शक आणि उत्तरदायी बनवते — तेव्हा ती केवळ 'शासन' न राहता 'सुशासन' बनते. सुशासन ही एक प्रशासनिक प्रक्रिया नसून, ती आहे विश्वासाची साखळी. महाराष्ट्र राज्याच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाने आपल्या विविध उपक्रमांमधून हीच साखळी मजबूत केली आहे — पारदर्शकतेचा धागा पकडत, कार्यक्षमतेची वीण घट्ट करत, आणि लोकसहभागाची गुंफण तयार करत. सुशासनाचे हे जिवंत संदर्भ, आता तुमच्यासमोर आहेत — शब्दांच्या रूपाने, अनुभवांच्या साक्षीने.

शासन ही संकल्पना ऐकली, की आपल्या डोळ्यासमोर मोठ्या इमारती, फाईलींचे गठ्ठे, आणि गोंधळलेली यंत्रणा उभी राहते. पण खरं पाहिलं, तर सुशासन ही संकल्पना फक्त सरकारी यंत्रणेशी मर्यादित नाही, तर ती आपल्या आयुष्याला हळुवार स्पर्श करणारी एक जिवंत भावना आहे. "सुशासन" म्हणजे केवळ शिस्तीचा बडगा नव्हे, तर विश्वासाची, सहभागाची आणि पारदर्शकतेची प्रकाशवाट.

म्हणूनच सुशासन म्हणजे पारदर्शकता, उत्तरदायित्व, लोकसहभाग, कायद्याचे पालन, समतेचा आधार, दीर्घकालीन दृष्टी आणि कार्यक्षम कार्यपद्धती ही त्याची मूलतत्त्वं आहेत. ही तत्त्वं केवळ कागदोपत्री असावीत, अशी अपेक्षा नाही;तर ती जनतेच्या दैनंदिन जीवनात दिसली पाहिजेत, हेच खरे सुशासन.

आज आपण महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडे पाहिलं, तर ही तत्त्वं कृतीत उतरवलेली स्पष्ट दिसतात. 'महा-डीबीटी'च्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या खात्यावर थेट शिष्यवृत्तीची रक्कम जमा होते. ही पारदर्शकतेची आणि कार्यक्षमतेची जिवंत उदाहरणं होत. यामध्ये कोणतेही मध्य मार्ग नाहीत, विलंब नाही, थेट लाभधारकापर्यंत पोहोचणारी ही सेवा आहे.

'एनओसी पोर्टल'चा वापर करून शिक्षकांच्या भरती प्रक्रियेसाठी लागणारे ना हरकत प्रमाणपत्र देण्यासाठी लागणारा विलंब आता दूर झाला आहे. कारण या प्रक्रियेचं डिजिटलीकरण करण्यात आलेले आहे. या प्रक्रियेचं डिजिटलीकरण करणं हे उत्तरदायित्व व पारदर्शकतेचा अवलंब आहे. यामुळे अनेक महाविद्यालये आणि शिक्षकांना वेळेत योग्य निर्णय मिळतो व प्रक्रियेत पारदर्शकता येते.

'ई-ऑफिस' प्रणालीमुळे प्रशासकीय कारभार जलद, शिस्तबद्ध आणि सुबोध झाला आहे. या प्रक्रियेतील सर्व उणीवा



दूर करण्यात आले असून, ते आता काही क्लिकमध्ये ही सर्व प्रणाली स्पष्ट होते. ही कार्यक्षमतेची नवी परिभाषा आहे.

'सह्याद्री शिक्षण संवाद' ही व्याख्यानमाला शिक्षण क्षेत्राशी संबंधित व्यक्तींना एकत्र आणते. शिक्षक, पालक, विद्यार्थी आणि प्राचार्य यांना संवादासाठी एकच व्यासपीठ मिळतं. हेच तर लोकसहभागाचं खरं उदाहरण!

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० संदर्भात "प्रश्न तुमचे, उत्तर आमचे" हे उपक्रम लोकांमध्ये जागृती निर्माण करतो. समाजाचा प्रत्येक घटक, अगदी ग्रामीण भागातील विद्यार्थीदेखील, यामध्ये सहभाग घेतो. ही समावेशकतेची जाणीव आहे.

'मिशन कर्मयोगी' अंतर्गत प्रशासनातील कर्मचारी सतत नव कौशल्य शिकत आहेत, स्वतःला घडवत आहेत. हे दीर्घकालीन दृष्टिकोनातून उभं राहिलेलं प्रशिक्षणाचं रूप आहे.

शासनाच्या संकेतस्थळाचं मराठी आणि इंग्रजीमधलं स्वरूप हे सर्वसामान्यांपर्यंत पोहोचण्याची गरज अधोरेखित करतं. ही समतेची आणि सर्वसमावेशकतेची मूल्यजाण आहे.

'Maharashtra Higher Education Atlas' ही संकल्पना म्हणजे ज्ञान, जागरूकता आणि नियोजन यांचा त्रिवेणी संगम. Geo-taggingद्वारे महाविद्यालयांची माहिती ही केवळ नकाशावरच नाही, तर विकासाच्या आराखड्यात स्थान मिळवते.

थोडक्यात काय, तर सुशासन म्हणजे लोकशाहीचा उत्सव. शासन आणि जनता यांच्यातील परस्पर विश्वास, जबाबदारी, पारदर्शकता आणि सेवा ही सुशासनाची खरी खरी ओळख. ही ओळख महाराष्ट्र शासनाने आपले धोरण, उपक्रम आणि तंत्रज्ञानाच्या माध्यमातून समृद्ध केली आहे. आणि म्हणूनच, ही यंत्रणा यशस्वी ठरत आहे. कारण ती केवळ "शासन" नाही, तर "सुशासन" आहे. आपल्या भविष्याचा उजळ मार्ग!



# लहान हस्तक्षेप, प्रभावी परिणाम कार्यालयीन सुधारणा : तंत्र शिक्षण संचालनालय

**प्रा.(डॉ.) विनोद मोहितकर**
संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

महाराष्ट्र राज्यातील तंत्रशिक्षण क्षेत्राच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी तंत्र शिक्षण संचालनालय सातत्याने कार्यरत असून, कार्यालयीन सुधारणांच्या माध्यमातून प्रशासन अधिक गतिमान, पारदर्शक आणि लोकाभिमुख करण्यासाठी पुढाकार घेत आहे. राज्य शासनाच्या निर्देशानुसार राबविण्यात आलेल्या १०० दिवसांच्या कृती आराखड्यात संकेतस्थळ व्यवस्थापन, स्वच्छता व अभिलेख व्यवस्थापन, तक्रार निवारण प्रणाली, कार्यालयीन व पायाभूत सुविधा, ई-ऑफिस प्रणालीचा वापर, प्रशिक्षण उपक्रम आणि कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) वापर आदी विविध बाबींमध्ये भरीव सुधारणा करण्यात आल्या आहेत. अशा सुधारणा वरवर किरकोळ वाटत असल्या तरी, त्या कर्मचारी कार्यक्षमतेत आणि वापरकर्त्यांच्या अनुभवात लक्षणीय फरक घडवून आणतात.

महाराष्ट्र राज्यातील अभियांत्रिकी, वास्तुकला, औषधनिर्माणशास्त्र, प्लॅनिंग, डिझाईन आणि हॉटेल व्यवस्थापन आणि कॅटरिंग तंत्रज्ञान व एम.बी.ए या अभ्यासक्रमांसाठी केंद्र आणि राज्य शासनाने तयार केलेली धोरणे, नियम, मार्गदर्शक तत्त्वे यांची अंमलबजावणी करण्यासाठी महाराष्ट्रात तंत्रशिक्षण संचालनालयाची स्थापना करण्यात आलेली आहे.

भारतीय राज्यघटना व त्या अनुषंगाने निर्माण करण्यात आलेल्या विविध यंत्रणा यातील प्रशासन हे महत्त्वाचे अंग आहे. राज्यघटनेनुसार सामाजिक कल्याण या तत्वाचा आपण स्वीकार केलेला आहे. सामाजिक कल्याणाचे तत्व राबवत असताना व्यापक लोकहिताची धोरणे, कार्यक्रम, योजना व निर्णय शासन घेत असते. अशी ही धोरणे, कार्यक्रम, योजना व निर्णय यांची अंमलबजावणी क्षेत्रीय स्तरावर करण्याचे काम प्रशासकीय यंत्रणा करत असते. शासन व्यवस्थेचे यश हे प्रशासकीय व्यवस्था किती कार्यक्षमतेने व गतिमानतेने काम करते यावर अवलंबून असते. प्रशासनाकडून निर्धारित वेळेत व विनासायास कामे व्हावीत ही जनतेची अपेक्षा असते आणि त्या अपेक्षा पूर्ण करणे हे प्रशासकीय यंत्रणेचे आद्य कर्तव्य ठरते.

कार्यालयात उपलब्ध असणारी संसाधने विचारत घेवून जनतेला शासकीय सेवा व सुविधा विहित मुदतीत व विनासायास पुरविण्यासाठी तंत्र शिक्षण संचालनालय कटिबद्ध आहे. कर्मचारी/अधिकारी यांची कार्यक्षमता वाढविण्यासाठी व कार्यालयीन वातावरणात सुधारणा करण्यासाठी राज्य शासनाच्या प्रशासनिक विभागांसाठी १०० दिवसांचा कृती आराखडा निश्चित करण्यांत आलेला होता. त्यानुसार वेगवेगळ्या बाबींवर काम करण्यात आले आहे:

### 11) संकेतस्थळाचे व्यवस्थापन:

कार्यालयाचे संकेतस्थळ हा कार्यालयाचा आरसा असतो. संकेतस्थळाचे व्यवस्थापन म्हणजे त्याची रचना, सामग्री, कार्यक्षमता आणि सुरक्षितता यांसारख्या बाबी व्यवस्थितपणे सांभाळणे, तसेच ते योग्यप्रकारे कार्य करेल याची खात्री करून घेणे, संकेतस्थळावरील डेटा अपडेट करणे, तांत्रिक समस्या सोडवणे आणि वापरकर्त्यांना चांगला अनुभव मिळवून देणे. संकेतस्थळाचे व्यवस्थापन करताना खालील बाबींवर लक्ष दिले जात आहे:

- तंत्रशिक्षण संचालनालयाचे संकेतस्थळ, सर्वसामान्यांना, विद्यार्थ्यांना, पालकांना सहजरित्या समजेल अश्या स्वरुपात तयार करण्यात आलेले आहे. ते लोकाभिमुख आणि सर्वसमावेशक आहे. ते चार रंगपर्यायात उपलब्ध असूक त्यात दिवसा आणि रात्रीच्या वापरासाठी निरनिराळे पर्याय आहेत. दृष्टीदोष असणा-यांकरिता देखील वापरण्यास सुलभ आहे.
- संचालनालयाच्या संकेतस्थळावरील माहिती अद्ययावत असुन, आवश्यकतेनुसार वेळोवेळी त्यात बदल केले जातात. संचालनालयातील सर्व कार्यासने व कार्यरत अधिकारी यांची माहिती त्यांचे दूरध्वनी क्रमांक व इमेल आयडीसहयेथे उपलब्ध आहे.
- माहिती अधिकार अधिनियमांतर्गत माहितीचे स्वंयप्रकटीकरण: याबाबतची आवश्यक माहिती संचालनालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आलेली आहे.
- संकेतस्थळावरील माहिती व संकतेस्थळ हाताळण्याची कार्यपद्धती सुरक्षित असुन याबाबतचे सुरक्षा परीक्षण ( Security Audit) अधिकृत यंत्रणेमार्फ़त ( CERT-In यांच्याद्वारे) करण्यात आले आहे.
- संचालनालयाशी संबंधित असलेली योजनांची माहिती ऑनलाईन प्रसिध्द करण्यात आलेली आहे. (उदा. शिष्यवृत्ती योजना)

### 12) स्वच्छता आणि अभिलेख व्यवस्थापन

कोणत्याही कार्यालयात कार्यालयीन स्वच्छता आणि अभिलेख व्यवस्थापन करण्यासाठी योग्य नियोजन आणि व्यवस्थापनाची आवश्यकता असते. संचालनालयामध्ये या दोन्ही कामांत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यांत येतो.

- संचालनालयामध्ये ई-ऑफ़िस चा वापर करण्यात येत असुन, संचालनालयातील अभिलेख्यांचे निंदणीकरण व वर्गीकरण्यात करण्यात येते व जुने अभिलेख Scan करून ठेवले असल्याने अभिलेख जतन करण्याची कामे सुकर झालेली आहेत.
- संचालनालयातील स्वच्छतेसाठी पहिल्या टप्प्यात वापरात नसलेल्या संगणक/ प्रिंटर्स / झेरॉक्स मशिन, याचे निर्लेखन करण्यात आलेले असून दुस-या टप्प्यात कालबाह्य झालेले संगणक/ प्रिंटर्स / झेरॉक्स मशिन इत्यादी छाननी करून निर्लेखन करण्यात येणार आहे.
- संचालनालयातील मुदतबाह्य अभिलेखे नष्ट करण्याची कार्यवाही करण्यात आलेली असुन जवळपास 2000 किलोग्राम वजनाच्या रद्दीची विल्हेवाट देखील लावण्यात आलेली आहे.
- संचालनालयातील जड वस्तू संग्रह नोंदवही अद्ययावत असुन वेळोवेळी त्यात नोंदी घेण्यांत येतात.
- पहिल्या टप्प्यात संचालनालयात वापरात नसलेल्या संगणक/ प्रिंटर्स / झेरॉक्स मशिन, याचे निर्लेखन करण्यात आलेले असून दुस-या टप्प्यात कालबाह्य झालेले संगणक/ प्रिंटर्स / झेरॉक्स मशिन इत्यादी छाननी करून निर्लेखन करण्यात येणार आहे.

### 13) तक्रार निवारण

- नागरिकांना तसेच विद्यार्थ्यांना त्यांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी महाराष्ट्र शासनामार्फत व्यासपीठ उपलब्ध करून देण्यांत आलेले आहे. त्याव्दारे नागरिकांना आपली तक्रार दाखल करता येते.
- आपले सरकार पोर्टलवरील दि. १ जानेवारी, २०२५ पूर्वीच्या तक्रारीचे निराकरण करण्याची कार्यवाही संचालनालय स्तरावरुन सुरू आहे. लवकरच सर्व अर्ज निकाली काढण्यांत येतील.
- पी.जी. पोर्टल वरील दि. १ जानेवारी,




२०२५ पूर्वीच्या तक्रारीचे निराकरण करण्यात आलेले आहे. संचालनालयास प्राप्त झालेल्या नवीन अर्जांवर वेळोवेळी संबंधित कार्यालयांकडून निराकरण करण्यात येते.

- संचालनालयामध्ये संचालक, तंत्रशिक्षण यांच्या अभ्यागत भेटीचे नियोजन व भेटीच्या वेळांबावत प्रसिध्दी फ़लक लावण्यात आलेले आहे.

**४) कार्यालय सुविधा आणि पायाभूत सुविधा:**

- संचालनालय व अधिपत्याखालील कार्यालयांकरिता Cloud Server सुविधा उपलब्ध करण्यात आलेली आहे. तसेच संचालनालयातील नेटवर्क केबलींग नव्याने टाकण्यात आलेले आहे. त्याचप्रमाणे कार्यालयीन कामकाज त्वरेने होण्यासाठी इंटरनेट ची 100 MBPS ची अद्यावत लीज लाईन घेण्यात आलेली आहे.
- संचालनालयाच्या दोन्ही इमारतींमध्ये कायमस्वरुपी स्वच्छ पिण्याच्या पाण्याची व्यवस्था उपलब्ध करण्यांत आलेली आहे. अभ्यागतांना थंड पाणी मिळावे यासाठी संचालनालयात कुलरची व्यवस्था करण्यांत आलेली आहे.

संचालनालयाच्या दोन्ही इमारतींमध्ये कर्मचारी व अभ्यागत यांचेसाठी स्वच्छ प्रसाधनगृहाची व्यवस्था उपलब्ध करण्यांत आलेली आहे.

मुंबई स्थित मुख्य कार्यालयात येणारे विद्यार्थी, पालक, संस्थाप्रमुख/ प्रतिनिधी यांच्याकरिता माहिती तंत्रज्ञान कक्षामध्ये अद्ययावत प्रतिक्षाकक्ष तयार करण्यात आलेला आहे. तसेच संचालनालकांच्या दालनाबाहेरही अभ्यागतांच्या बसण्याची व्यवस्था करण्यांत आलेली आहे.

बाहेरुन येणाऱ्या अभ्यागतांसाठी संचालनालयामध्ये सुव्यवस्थित नामफलक व दिशादर्शक फलक लावण्यात आलेले आहे.

संचालनालयामध्ये संचालकांचे दालन तसेच आयटी सेल यांचे नुतनीकरण करण्यात आलेले आहे. तसेच संचालनालयाचे सौंदर्य वाढविण्याठी ठिकठिकाणी शोभेच्या झाडांच्या कुंड्या ठेवण्यांत आलेल्या आहे.

**4. क्षेत्रीय कार्यालयांना भेटी:**

प्रशासन हे कार्यालयाचे महत्त्वाचे असे अंग आहे. प्रशासकीय व्यवस्थेचे यश अनेक बाबींवर अवलंबून असते. त्यापैकी क्षेत्रीय भेटी आणि दौरे याला प्रशासनात अनन्यसाधारण महत्त्व आहे. या क्षेत्रीय भेटी आणि दौरे या आधारे राज्यातील नागरिक तसेच संबंधित कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी यांचेशी प्रत्यक्ष संपर्क साधून त्यांच्या अडचणी आणि समस्या समजावून घेता येतात. तसेच क्षेत्रीय कार्यालयांच्या भेटी आणि दौरे यामुळे प्रशासकीय कामकाजात गती येते. संचालक, तंत्र शिक्षण यांनी निरनिराळ्या विभागीय कार्यालयांना भेट देऊन कृती आराखडयाच्या अंमलबजावणीबाबतचा आढावा घेतला आहे. तसेच विभाग़ीय सहसंचालकांच्या अखत्यारितील संस्थांची नियमीत तपासणी करण्याच्या सुचना सर्व संबंधित विभागीय सहसंचालकांना देण्यांत आलेल्या आहेत. आवश्यकतेनुसार, प्रशासनिक बाबी तपासण्याकरिता संचालक, तंत्र शिक्षण हे वेळोवेळी संस्था तसेच विभागीय कार्यालयांना भेटी देतात.

संचालनालयामार्फत केंद्र आणि राज्य शासनाच्या महत्त्वाच्या कार्यक्रम / तसेच संस्थेतील खालील प्रकल्पांना भेटी देऊन अंमलबजावणी व पर्यवेक्षण करण्यात येते.

- वसतिगृह व इमारत बंधकामे
- उत्कृष्टता केंद्र स्थापन करणे
- परीक्षा केंद्र उभारणे.
- नवीन संस्था स्थापन करणे इत्यादी.

**14) ई-ऑफिस प्रणालीचा वापर**

ई-ऑफ़िस ही एक कामकाजाची डिजिटल प्रणाली आहे. या प्रणालीमुळे शासकीय कार्यालयांत कागदी दस्तावेजांचा वापर टाळून कार्यालयीन कामकाजात गतिमानता आणता येते. ई-ऑफ़िस प्रणालीमुळे शासकीय कार्यालयांची कार्यप्रणाली पारदर्शी होते. सर्वसामान्य नागरिकांना जलद, पारदर्शक आणि कालमयदित सेवा उपलब्ध होते आणि नस्त्या ऑनलाईन सादर करता येतात. नागरिकांचे कार्यालयात येणारे अर्ज, विनंत्या, तक्रारी देखील ई-ऑफ़िसद्वारे सादर करता येतात. शासनाच्या निर्देशानुसार, तंत्रशिक्षण संचालनालयाचे कामकाज ई-ऑफीस प्रणालीमार्फत करण्यात येते.

अधिकारी/कर्मचारी प्रशिक्षण, सेवा विषयक बाबी आणि कृत्रिम बुध्दीमत्ता तंत्रज्ञानाचा वापर

कोणत्याही कार्यालयातील कर्मचारी/ अधिकाऱ्यांच्या कार्यक्षमतेत वाढ होण्यासाठी तसेच वेळोवेळी त्यांचे ज्ञान व कौशल्य वाढविण्यात प्रशिक्षणाचा मोठा वाटा आहे. सर्व स्तरावर कार्यक्षमता वाढवून प्रशासन गतीमान होण्यासाठी राज्य शासनाने प्रशिक्षण धोरण तयार केलेले आहे. या धोरणांतर्गत कर्मचाऱ्यांच्या प्रगतीसाठी आवश्यक असलेल्या विविध प्रशिक्षणांचा समावेश आहे. यात पायाभूत प्रशिक्षण, उजळणी वर्ग आणि सेवा प्रशिक्षण यांचाही समावेश आहे. राज्य शासनाने सदरच्या प्रशिक्षणाची जबाबदारी यशदा तसेच महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास संस्थेवर सोपविलेली आहे.

नव्याने सेवेत प्रविष्ट अधिकारी / कर्मचारी यांना प्रशिक्षित करणे: राज्य प्रशिक्षण धोरणानुसार संचालनलयाच्या अधिपत्याखालील कार्यालये/संस्थां यांमध्ये सेवेत असलेल्या व नव्याने सेवेत प्रविष्ट अधिकाऱ्यांना यशदा, पुणे तसेच महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास संस्थेने आयोजित केलेल्या प्रशिक्षणासाठी नियमित प्रतिनियुक्त करण्यांत येते. तसेच संचालनालयाच्या अधिपत्याखालील संस्था/ कार्यालयांतील वर्ग-३ च्या कर्मचाऱ्यांसाठी दरवर्षी सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण व पर्यवेक्षकीय प्रशिक्षणाचे आयोजन करण्यांत येते. कृत्रीम बुध्दीमत्ता तंत्रज्ञान वापरण्यासाठी अधिकारी / कर्मचारी यांना प्रशिक्षण देणे व कार्यालयातील कामकाज अचूक होण्यासाठी प्रत्यक्ष कृत्रीम बुध्दीमत्ता तंत्रज्ञानाचा वापर (AI) सुरू करणे यासाठी शासनाच्या निर्देशानुसार कार्यवाही सुरू करण्यात आलेली आहे.

पदोन्नत्या व कर्मचाऱ्यांच्या तक्रारीचे निराकरण करणे: संचालनालयातील वर्ग-२, वर्ग-३ व वर्ग-४ च्या कर्मचाऱ्यांच्या पदोन्नतीबाबत वेळोवेळी नियमितपणे कार्यवाही करण्यांत येते. तसेच सहसंचालक, उपसंचालक या पदावरील पदोन्नतीकरिता शासनास प्रस्ताव सादर करण्यात आलेले असुन, सहाय्यक संचालक (तां), प्रशासकीय अधिकारी या पदांकरिताचे प्रस्ताव विचारणा केलेल्या महितीसह शासनास सादर करण्याचे नियोजन आहे.

15) नाविन्यपूर्ण उपक्रम

संचालनालयाने अनेक उपक्रमांची अंमलबजावणी करताना पारंपरिक पद्धती सोडून नवीन आणि प्रभावी मार्ग वापरले आहेत. यात शासकीय तंत्रनिकेतनांचे आवश्यक दुरुस्ती करून सुशोभीकरणासह फ़ेसलिफ़्टींग करणे किंवा सर्व शासकीय संस्थेतील मुला मुलींचे वसतिगृहाच्या सुरक्षिततेसाठी CCTV यंत्रणा अद्ययावत करणे अश्या उपक्रमांचा समावेश आहे. हे उपक्रम राबविताना अनेक अपरंपारिक मार्गांचा वापर करण्यात आलेला आहे.

दैनंदिन कामकाजात उपयोग होणाऱ्या प्रक्रिया आणि प्रणालींमध्ये सूक्ष्म आणि वरवर पाहता किरकोळ वाटणाऱ्या सुधारणा केल्याने कार्यसंघाच्या कार्यक्षमतेवर आणि वापरकर्त्यांच्या अनुभवावर मोठा परिणाम होतो. या सुधारणा वेळ वाचवतात, गोंधळ टाळतात आणि एकसंधपणे काम पूर्ण होण्यास मदत करतात. त्यामुळे, अशा सूक्ष्म सुधारणा दुर्लक्षित न करता त्यांचे वेळोवेळी परीक्षण करून योग्य ती अंमलबजावणी करणे ही व्यवस्थापनाची महत्त्वाची जबाबदारी ठरते. कारण, छोट्या बदलांनीच मोठा सकारात्मक परिणाम साधता येतो. तंत्रशिक्षण संचालनालय या दिशाने सतत प्रयत्नशील आहे.



**स्कूल कनेक्ट 2.0 : शाळेचा हॉल, स्वप्नांनी गजबजलेला!**

# स्कूल कनेक्ट 2.0: शाळेपासून स्वप्नांपर्यंत आत्मनिर्भरतेकडे नेणारा ज्ञानसेतू

**डॉ. राजनीश कामत**
कुलगुरू, डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठ, मुंबई

स्कूल कनेक्ट -2.0 हा महाराष्ट्र सरकारचा अभिनव उपक्रम 1 ते 15 जानेवारी 2025 या काळात राबविण्यात आला. इयत्ता ९ वी टी १२ वीच्या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाच्या संधी करीयर मार्गदर्शन आणि कौशल्य विकासावर आधारीत शिक्षण संधींची ओळख करून देणे हा या उपक्रमाचा उद्देश होता. महाराष्ट्रातील विद्यापीठे आणि विद्यापीठांशी सलग्न महाविद्यालये येथील प्राध्यापक आणि विद्यार्थी व औद्योगीक क्षेत्रातील व्यक्ती यांनी उपक्रमात सहभागी होऊन शालेय विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. उपक्रमाचा अहवालाच्या संपदक मंडळाच्या अध्यक्षांचा हा या उपक्रमाचा आढावा घेणारा लेख.

कधी कधी एखादा शांत क्षण संपूर्ण आयुष्य बदलवू शकतो नाही? दूरच्या गावातल्या एका शाळेत, वर्गातील काळ्या फळ्यावर एक प्रश्न लिहिला होता: “मी भविष्यात काय होऊ शकतो?”

त्या वर्गात त्या दिवशी आले होते काही मार्गदर्शक — ते हातात फक्त पॉवर पॉइंट सादरीकरण घेऊन आलेले नव्हते, तर आशा घेऊन आले होते. त्यांनी सांगितलं की शिक्षण म्हणजे संधी, शिक्षण म्हणजे तुमच्या पायातली साखळी तोडणारा विश्वास. आणि त्या विश्वासातून त्या विद्यार्थ्यांच्या डोळ्यांत एक नवंच स्वप्न उगम पावलं – स्वतःसाठी, घरासाठी आणि समाजासाठी! हीच आहे स्कूल कनेक्ट 2.0 ची खरी कहाणी. ही फक्त योजना नव्हती.

ही होती एक स्पंदनांची चळवळ ही होती एक उजळपाटी, जिच्यावर कोणीही नाव लिहू शकेल – वाडीतला गणेश असो वा धारावीतील शबाना. महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाने सुरू केलेला स्कूल कनेक्ट 2.0 हा उपक्रम म्हणजे केवळ आकड्यांची गोष्ट नाही. हा आहे एका नव्या सामाजिक बांधिलकीचा दस्तावेज — जिथे प्रत्येक विद्यार्थ्याचं मन म्हणतंय: "आता माझंही एक भविष्य आहे. आणि ते उज्वल असू शकतं."

आज आपण ही गोष्ट सांगत आहोत – स्वप्नांनी भरलेल्या डोळ्यांची, आत्मविश्वासाने फुलणाऱ्या काळजांची, आणि शिक्षणाच्या नवप्रकाशाची. कारण ज्ञानाचा सेतू एकदा बांधला गेला, की आत्मनिर्भरतेकडे नेणारा मार्ग आपोआप तयार होतो.

### एका व्यापक चळवळीची सुरुवात

दूरच्या ग्रामीण भागातील एक शाळा-शाळेतील गोंगाट थांबतो, एका तासासाठी संपूर्ण वर्ग शांत होतो. एक प्राध्यापक-ख्यातीप्राप्त विद्यापीठातून आलेला -विद्यार्थ्यांच्या नजरेला नजर देत सांगतो — "भविष्य घडतं ते नशिबाने नाही, तर योग्य निर्णयांनी." आणि त्याक्षणी विद्यार्थ्यांच्या मनात नवीन स्वप्न उगम पावते. हेच आहे स्कूल कनेक्ट 2.0 चं जादुई सामर्थ्य. याला पार्श्वभूमी होती गतवर्षीच्या 'स्कूल कनेक्ट 1.0' या यशस्वी अभियानाची.

महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाने १ ते १५ जानेवारी २०२५ दरम्यान संपूर्ण राज्यभर राबवलेला स्कूल कनेक्ट 2.0 हा केवळ एक शिक्षण उपक्रम नव्हता. तो शालेय शिक्षण आणि उच्च शिक्षण यामधील दरी कमी करणारा, विद्यार्थ्यांच्या आकांक्षांना दिशा देणारा आणि आत्मनिर्भर भारताच्या स्वप्नाला बळकटी देणारा एक शैक्षणिक प्रवास होता. या अभियानात राज्यातील जवळजवळ सर्वचं अकृषी विद्यापीठांनी सहभाग घेतला आणि ५००० पेक्षा अधिक शाळांमध्ये १० लाखांहून अधिक विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचण्याचं विक्रमी उद्दिष्ट साध्य केलं

### उद्दिष्टांची उजळणी

५ जानेवारी २०२४ रोजी महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले — एका शासन निर्णयान्वये ‘स्कूल कनेक्ट कार्यक्रम 2.0’ ची सुरुवात झाली. या निर्णयाच्या माध्यमातून शिक्षण आणि विद्यार्थ्यांच्या भविष्याचा नवीन अध्याय उघडला गेला. शहरी आणि ग्रामीण भागांतील शालेय विद्यार्थ्यांपर्यंत उच्च शिक्षणाच्या संधी पोहोचवणे हे या उपक्रमाचे मुख्य ध्येय होते. विविध प्रकारच्या विद्यापीठांची – राज्य, खाजगी, स्वायत्त आणि कौशल्याधारित संस्थांची माहिती विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचू लागली. त्यांना उद्योगजगत, संशोधन, तंत्रज्ञान, कौशल्य विकास आणि उद्योजकतेच्या संधींची झलक मिळू लागली. या कार्यक्रमाने केवळ माहिती पुरवणं एवढ्यावरच थांबावं असं महाराष्ट्र राज्य शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाला वाटलं नाही. तर त्याहून पुढे जाऊन विद्यार्थ्यांना राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या अंतर्गत बहुविषयक शिक्षण, बहुप्रवेश-निर्गमन आणि शैक्षणिक गुणनिर्देश बँक सारख्या सुधारणांची ओळखही देण्यात आली. ते ऑनलाईन शिक्षण व्यासपीठे, डिजिटल अभ्यासक्रम आणि दूरस्थ शिक्षण यांच्याशी अधिक आत्मविश्वासाने जोडले गेले.

सरकारी शिष्यवृत्ती, शिक्षण कर्ज आणि आर्थिक सहाय्य योजनांविषयी मिळालेली माहिती अनेक घरांतील उच्चशिक्षित होण्यासाठीचे अडथळे दूर करू लागली. अनुभवसंपन्न प्राध्यापक, उद्योगतज्ज्ञ आणि करिअर मार्गदर्शक यांच्याकडून मिळणाऱ्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना अधिक ठोस आकार मिळू लागला. या संपूर्ण प्रक्रियेत एक महत्त्वाचा दुवा तयार झाला — शाळा आणि विद्यापीठ यांच्यातील भागीदारी. विद्यापीठ दौरे, प्राध्यापकांशी संवाद आणि प्रत्यक्ष शैक्षणिक अनुभवांनी विद्यार्थ्यांना आपली दिशा शोधायला मदत झाली.

शेवटी, स्कूल कनेक्ट 2.0 फक्त माहितीचा प्रवाह नव्हता — ती मूल्याधारित शिक्षणाची एक जिवंत चळवळ होती. या चळवळीतून प्रत्येक विद्यार्थी जबाबदार नागरिक, सक्षम व्यावसायिक आणि भविष्याचा नेतृत्वकर्ता होण्यासाठी सज्ज होऊ लागला.या उपक्रमाने विद्यार्थ्यांच्या मनात त्यांच्या भविष्यतील जडणघडणीबद्दल स्पष्टता निर्माण केली. त्यांना उद्योग ४.० च्या युगात प्रभावीपणे प्रवेश करता यावा आणि राष्ट्राच्या विकासात भाग घेता यावा, यासाठी योग्य मार्गदर्शन आणि प्रेरणा दिली. स्कूल कनेक्ट कार्यक्रम 2.0 हा एक पूल ठरला — भविष्याकडे नेणारा, सक्षमतेने बांधलेला. या उपक्रमामागे असलेल्या दृष्टीकोनात ठोस उद्दिष्टे होती:

इयत्ता ९वी ते १२वीच्या विद्यार्थ्यांमध्ये उच्च शिक्षण, बहुविषयक अभ्यासक्रम व राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मधील नवकल्पनांविषयी जागरूकता निर्माण करणे.

डिजिटल शिक्षण, शिष्यवृत्ती, रोजगारक्षमतेसाठी आवश्यक कौशल्ये आणि करिअर मार्गदर्शन यांचं स्पष्ट, समर्पक आणि प्रेरणादायी सादरीकरण.

शाळा, महाविद्यालये, उद्योग आणि समाज यांच्यातील ज्ञानाचे पूल बांधणे, जेणेकरून विद्यार्थी त्यांच्या भविष्यासाठी अधिक सज्ज होतील.

### विद्यानगरीपासून आदिवासी वाड्यांपर्यंतचा स्पर्श

डॉ. होमी भाभा स्टेट युनिव्हर्सिटी, मुंबईपासून ते गडचिरोलीच्या गोंडवाना विद्यापीठापर्यंत, प्रत्येक विद्यापीठाने या अभियानात आपल्या क्षेत्रातील शाळांमध्ये कार्यशाळा, संवाद सत्रे, सादरीकरणे आणि व्यवसाय निवडीचं समुपदेशन केले. उदाहरणार्थ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने पंढरपूरच्या एका शाळेमधील घेतलेले सत्र हे विद्यार्थ्यांसाठी नव्या दृष्टीकोनाचे आणि पालक-शिक्षकांसाठी माहितीचा स्रोत ठरले.

या उपक्रमातील आणखी एक उल्लेखनीय उदाहरण म्हणजे मुंबई विद्यापीठाने धारावी परिसरातील शाळांमध्ये घेतलेले कार्यक्रम. धारावीतील विद्यार्थी, जे बहुतांश वेळा शिक्षणात मागे पडलेले असतात, त्यांच्यासाठी या संवाद सत्रांनी एक नवी दिशा दिली. एका मुलाने कार्यक्रमानंतर विचारले, “सर, मी एखाद्या बहुराष्ट्रीय कंपनीचा सीईओ होऊ शकतो का?” – आणि मार्गदर्शकांनी केवळ होकार दिला नाही, तर त्याला त्या दिशेने मार्गदर्शन देखील केले.

भंडारद्या जवळच्या मुठखेल येथील एका शाळेमधील एक विद्यार्थिनी पूर्वी कृत्रिम




स्कूल कनेक्ट 2.0 : विद्यार्थ्यांशी थेट संवादाचा एक क्षण

बुद्धिमत्ता आणि डेटा सायन्स सारख्या शब्दांनी घाबरायची. पण स्कूल कनेक्ट कार्यक्रमात मार्गदर्शकांनी समजावले की हे क्षेत्र तिच्यासारख्या जिज्ञासूंसाठी खुले आहे. ती म्हणते, "माझ्या डोळ्यांसमोर एक नवीन जग उभं राहिलं. आता मी संगणक विज्ञान शिकायचं ठरवलं आहे."

कार्यक्रमात काही ठिकाणी पुस्तकांचे वाटप, कथा कथन स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आल्या. विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे देऊन त्यांचा उत्साह वाढवण्यात आला. काही विद्यापीठांनी कॅम्पस टूरच्या निमित्ताने शाळांतील विद्यार्थ्यांना विद्यापीठाच्या आधुनिक प्रयोगशाळा, ग्रंथालये, उद्योजकता केंद्रे दाखवली. याने त्यांच्या मनात उच्च शिक्षणाविषयी जिवंत चित्र उभे राहिले. अनेक ठिकाणी संवाद सत्रात विद्यार्थ्यांनी प्रश्न विचारले – " राष्ट्रीय शैक्षणिक धोरण म्हणजे काय?", "क्रेडिट बँक म्हणजे काय असतं?", "कला शाखेतून उद्योजकता शिकता येईल का?" या प्रश्नांना दिलेली उत्तरं केवळ माहितीपुरती मर्यादित नव्हती; ती विद्यार्थ्यांच्या विचारविश्वात मोठा बदल घडवत होती.

**स्कूल कनेक्ट 2.0: कीबोर्डवरच्या बोटांमध्ये उज्वल भविष्याची नांदी नवचैतन्याचे प्रसंग**

या उपक्रमात शिक्षकांना आशा काही क्षणांचे साक्षीदार व्हायला मिळालं, जे शब्दांत मांडणं कठीण आहे. साताऱ्यातील एका शाळेत, सत्र संपल्यानंतर एक विद्यार्थी शांतपणे एका शिक्षिकेच्या जवळ आला. त्याच्या डोळ्यांत अश्रू होते. तो म्हणाला, "आई रोज म्हणते, तू फक्त दहावीपर्यंत शीक आणि त्यानंतर कामाला लाग. पण आज पहिल्यांदा मला वाटलं की मी कॉलेजमध्ये जाऊ शकतो." त्या शिक्षिकेने फक्त त्याचे हात हातात घेतले. त्या स्पर्शात आधार होता, आश्वासन होतं. ठाणे जिल्ह्यात, एका झोपडपट्टी मधील शाळेमध्ये, कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाबद्दल प्रश्न विचारायला सुरुवात केली. एका मुलीने विचारलं, "क्रेडिट बँकेमुळे मी शिक्षण अर्धवट थांबवलं तरी परत सुरू करू शकते ना?" हे ऐकून मार्गदर्शक स्तब्ध झाले — हे त्या मुलीने शिकलेलं नव्हतं, हे तिचं स्वप्न होतं जे तिला आज एक शक्यता वाटू लागलं होतं.

दूर चंद्रपूर जिल्ह्यातील एका आदिवासी शाळेमध्ये एका विद्यार्थिनीला पहिल्यांदाच प्रोजेक्टरवर सादरीकरण पाहायला मिळालं. कार्यक्रमानंतर तिने विचारलं, "हे शिकायला मी कुठं जाऊ शकते?" तिचा आवाज धीमा होता, पण त्या प्रश्नात साक्षात आत्मविश्वासाची पायवाट दिसत होती. त्या दिवशी शिक्षण हा अधिकार वाटू लागला होता.

छत्रपती संभाजीनगर विभागातील एका शाळेत विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेले एक लघुनाट्य उत्स्फूर्तपणे सादर केले. या नाट्यप्रस्तावनेत त्यांनी ग्रामीण विद्यार्थ्यांच्या स्वप्नांचा संघर्ष आणि शिक्षणाच्या माध्यमातून मिळणारी उभारी यांचं चित्रण केलं. कार्यक्रम संपल्यानंतर, एका प्राध्यापकाने विद्यार्थ्याला विचारलं, "हे लिहिण्याची प्रेरणा कुठून मिळाली?" – तर त्याचं उत्तर होतं, "आज तुम्ही जे बोललात, त्यातूनच." हे संवाद केवळ प्रेरणा नव्हते, ते कृतीची पायरी ठरत होते.

नागपूर विद्यापीठाच्या सहभागाने काही शाळांमध्ये विज्ञान प्रदर्शनांचं आयोजन करण्यात आलं. विद्यार्थ्यांनी माती परीक्षण, जलशुद्धीकरण आणि सौरऊर्जेवर आधारित मॉडेल्स तयार केली. त्यांच्या सादरीकरणातून स्पष्ट दिसलं की ज्ञान केवळ पुस्तकी न राहता, कृतीमधून उगम पावलं पाहिजे, ही समज वाढत आहे.

सहयोगाचा महासंवाद

या उपक्रमाच्या यशाचे गमक होते समन्वय. प्रत्येक विद्यापीठाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष, प्राचार्यवर्ग, शिक्षक, उद्योगतज्ज्ञ, विद्यार्थी स्वयंसेवक यांच्यातील समन्वय आणि शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे सर्वतोपरी मार्गदर्शन. या भागीदारीच्या जोरावर स्कूल कनेक्ट 2.0 केवळ अभियान न राहता, चळवळ झाली. त्याचा प्रभाव आता विद्यार्थ्यांच्या निर्णयक्षमतेत, स्वप्नांच्या व्याप्तीत आणि शाळा-विद्यापीठ संवादात स्पष्ट दिसतो.

या उपक्रमात सहभागी महाविद्यालयांमध्ये आंतरविषय अभ्यासक्रमांवर चर्चा झाली. विद्यार्थ्यांना स्पष्ट सांगण्यात आलं की ते विज्ञान, कला आणि वाणिज्य यांचे एकत्र अभ्यास करू शकतात. एका आदिवासी भागातील शिक्षक म्हणाले, "या उपक्रमामुळे आमच्याच शाळेत शिकणाऱ्या मुलांनी प्रथमच 'पीएच.डी.' हा शब्द ऐकला." या एका अनुभवातून लक्षात येतं की ज्ञानाच्या व्याप्तीची दारं खऱ्या अर्थाने उघडू लागलीआहेत.

**आकडे सांगतात यशाची गोष्ट**

या उपक्रमात सहभागी विद्यापीठांमध्ये संलग्न विद्यापीठे मोठ्या प्रमाणावर सहभागी झाली होती. उदाहरणार्थ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशिक्षण विद्यापीठाने विद्यार्थ्यांना नोकरी देणाऱ्या तांत्रिक अभ्यासक्रमांविषयी मार्गदर्शन दिलं. त्यांच्या सत्रांमध्ये उपलब्ध इंजिनीअरिंग आणि पॉलिटेक्निक अभ्यासक्रमांची माहिती, तसेच शिष्यवृत्ती योजनांसंदर्भात विश्लेषणात्मक संवाद घडवला गेला.

या सर्व सत्रांचा एकत्रित प्रभाव असा की, शैक्षणिक संधी केवळ काही प्रमुख विद्यापीठांपुरत्या मर्यादित राहिल्या नाहीत, तर राज्यातील प्रत्येक कोपऱ्यातील विद्यार्थ्यांपर्यंत त्या पोहोचल्या. ही सत्रे विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना दिशा देणारी ठरली. 'शिष्यवृत्ती' ही संकल्पना त्यांच्या आयुष्यात प्रथमच समाविष्ट झाली. प्रत्येक विद्यापीठाने आपल्या कार्यक्षेत्रातील जिल्ह्यांमध्ये जाऊन शाळांशी थेट संवाद साधण्याचे उद्दिष्ट बाळगले. उदाहरणार्थ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने पुणे, सोलापूर आणि अहमदनगर जिल्ह्यांतील शाळांमध्ये ४५० सत्रांचे आयोजन केले. या सत्रांमध्ये करिअर मार्गदर्शन, आणि उद्योजकतेसंबंधी सखोल संवाद साधण्यात आला. मुंबई विद्यापीठाने शहराच्या मध्यवर्ती आणि उपनगरी भागातील ३९८ शाळांमध्ये कार्यक्रम राबवले. धारावीसारख्या क्षेत्रांमध्ये विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधून त्यांच्यामधील संकोच दूर करण्यात आला. नागपूर विद्यापीठाने विदर्भातील ग्रामीण शाळांमध्ये ३५० सत्रे आयोजित करून विज्ञानप्रदर्शन, कौशल्याधारित प्रशिक्षण आणि बहुविषय अभ्यासक्रमांची माहिती दिली.

गोंडवाना विद्यापीठाने गडचिरोली आणि चंद्रपूर जिल्ह्यातील २७५ शाळांमध्ये शैक्षणिक सत्रे राबवून आदिवासी भागातील विद्यार्थ्यांपर्यंत ही ज्ञानगंगा पोहोचवली. त्यांच्यासाठी ही सत्रे केवळ माहिती नव्हती, तर एका नव्या विश्वाची दारं उघडणारा अनुभव हा अनुभव होता.

औरंगाबाद, नांदेड, अमरावती, कोल्हापूर, परभणी, नाशिक, जळगाव आणि सातारा येथील विद्यापीठांनीही त्यांच्या क्षेत्रात तितक्याच जोमाने सहभाग घेतला. उदाहरणार्थ, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाने मराठवाडा विभागात विविध शाळांमध्ये डिजिटल साक्षरता, नवीन शैक्षणिक धोरण, आणि सरकारी शिष्यवृत्ती योजनांविषयी सत्रे घेतली. शिवाजी विद्यापीठाने पश्चिम महाराष्ट्रातील शाळांमध्ये विद्यार्थ्यांसाठी संवादात्मक स्पर्धा आणि शैक्षणिक सादरीकरणे राबवली. प्रत्येक विद्यापीठाने आपल्या परीने योगदान दिले. त्यांनी केवळ आदेशाची पूर्तता केली नाही, तर त्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांच्या मनामध्ये आत्मविश्वासाचे बीज पेरले. ही आकडेवारी म्हणजे शाळा-विद्यापीठ नात्याचा, शैक्षणिक समृद्धीचा आणि सामाजिक समरसतेचा आरसाच आहे.

स्कूल कनेक्ट 2.0 उपक्रमाची व्याप्ती ही केवळ भौगोलिकच नव्हती, तर तिचं मोजमाप करता येईल अशा तपशीलवार आकड्यांमधूनसुद्धा दिसून आली. एकंदरित महाराष्ट्रभर १८ विद्यापीठे सहभागी झाली,




स्कूल कनेक्ट 2.0: प्रेरणेची पायरी – शाळा ते विद्यापीठ



**स्कूल कनेक्ट 2.0: एक व्याख्यान... शंभर विचार... हजार दिशा!**

ज्यांनी राज्यातील जवळपास सर्वच ५००० हून अधिक शाळांमध्ये हा उपक्रम राबवला. या माध्यमातून जवळपास १० लाख विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचता आले. या आकड्यांमधून दिसून येतं की 'स्कूल कनेक्ट 2.0' उपक्रमाने केवळ संपर्क साधला नाही, तर ज्ञानाची बीजं रोवण्याचं कार्य केलं. सततच्या संवादाचं, मार्गदर्शनाचं आणि प्रेरणेचं बळ मिळत राहिले तर या बीजांचं रोप निश्चितच पुढे फुलणार आहे.

या उपक्रमामुळे अनेक पालकही संवादात सामील झाले. काही ठिकाणी पालकांसाठी खास सत्र आयोजित करण्यात आली जिथे त्यांना शिष्यवृत्ती, आर्थिक सहाय्य, कन्या शिक्षण योजनेविषयी माहिती देण्यात आली. परिणामी, शिक्षणाविषयी पालकांचा दृष्टिकोनही अधिक सकारात्मक झाला.

उदाहरणार्थ, बुलढाण्याच्या एका शाळेत, एका पालकांनी कार्यक्रमानंतर सांगितलं, "माझा मुलगा दहावीनंतर शिकेल का, याची मला शंका होती. पण आज जे ऐकलं, त्यामुळे मला वाटतं, त्याचं भविष्य उज्वल होऊ शकतं." अशा प्रतिक्रिया या उपक्रमाच्या सामाजिक प्रभावाचं प्रतिबिंब आहेत.

**दीर्घकालीन परिणाम : गळती रोखणे, प्रवेश वाढवणे**

स्कूल कनेक्ट 2.0 उपक्रमाचा सर्वात मोठा सकारात्मक परिणाम म्हणजे शाळांमधील गळतीचे प्रमाण कमी करण्याच्या दृष्टीने पडलेली पायाभरणी. जेव्हा विद्यार्थ्यांना त्यांच्या भविष्यातील शक्यतांबाबत ठोस, व्यवहार्य आणि प्रेरणादायी माहिती मिळते, तेव्हा त्यांच्यात शिक्षणाबाबतची समर्पण भावना वाढते. या उपक्रमात सहभागी विद्यार्थ्यांना जेव्हा त्यांचे स्वतःचे स्वप्नं साकार होण्याच्या वाटा दिसू लागल्या, तेव्हा 'शाळा सोडावी' हा विचार दूर गेला.

या उपक्रमामुळे अनेक मुलांनी पहिल्यांदाच महाविद्यालयीन जीवनाचे दर्शन घेतले. या थेट अनुभवामुळे त्यांचं शिक्षणाबाबतचं आकलन अधिक खोल आणि वैयक्तिक झालं. त्यामुळे राज्याचा एकूण उच्च शिक्षणामधील सहभाग – म्हणजेच 'ग्रॉस एनरोलमेंट रेशो' वाढण्याच्या दृष्टीने ही एक महत्त्वाची पायरी ठरू शकते. खासकरून ग्रामीण, आदिवासी आणि वंचित घटकांतील विद्यार्थ्यांना ही संधी लाभल्यास समावेशी शिक्षणाची व्याप्ती अधिक वाढेल.

स्कूल कनेक्ट 2.0 मध्ये रोजगारक्षमतेवरही विशेष भर देण्यात आला. विविध विद्यापीठांनी 'फिनिशिंग स्कूल', 'स्किल डेव्हलपमेंट', 'इंटर्नशिप' संधी, आणि 'इंडस्ट्री लिंक्ड कोर्सेस' यांची माहिती दिली. यामुळे शिक्षणानंतर विद्यार्थ्यांचा उद्योग क्षेत्राशी थेट संबंध प्रस्थापित होईल, ज्यामुळे शिक्षणानंतर बेरोजगारीचे प्रमाण कमी होण्यास मदत होईल.

या उपक्रमामुळे 'शिक्षण पोहोचेल तिथेच परिवर्तन शक्य' हे सिद्ध झालं आहे. ज्यांच्यापर्यंत शिक्षण पोहोचत नव्हतं — त्या दुर्गम भागांतील, अल्पसंख्याक, गरीब कुटुंबातील, आणि विशेष गरजा असलेले विद्यार्थी — यांच्यासाठी हा एक प्रकाशाचा किरण ठरला. शाळा आणि महाविद्यालय यांच्यातील ही नवी भागीदारी, गुणवत्तापूर्ण आणि समतेच्या आधारे उभं राहिलेले उच्च शिक्षणाचे भविष्य घडवण्यास नक्कीच मदत करणार आहे.

**नव्या शक्यतांकडे वाटचाल**

शालेय शिक्षणात असताना विद्यार्थ्यांना पुढच्या शैक्षणिक पर्यायांविषयी योग्य वेळी, योग्य प्रकारे मार्गदर्शन मिळणे हेच स्कूल कनेक्ट 2.0 चं गमक होतं. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 च्या ध्येयाशी सुसंगत असलेला हा उपक्रम केवळ शैक्षणिक जागरूकता नव्हे, तर समाजातल्या उच्च शिक्षणाकडे पाहण्याच्या दृष्टिकोनात बदल घडवणारा ठरतो आहे. महाराष्ट्राच्या शैक्षणिक धोरणांमध्ये ही एक आदर्श 'नवदिशा' ठरली आहे.

पुढच्या टप्प्यात हा उपक्रम शहरी झोपडपट्ट्या, ग्रामीण व आदिवासी विद्यार्थ्यांच्या गरजांनुसार आणखी सघनपणे राबवण्याची गरज आहे. त्यासाठी डिजिटल तंत्रज्ञान, विद्यार्थ्यांचे मूल्यमापन व व्यक्तिमत्त्व विकासाचे घटक अंतर्भूत करून, एक 'School Connect 3.0' म्हणून तो पुढे नेता येईल.

शाळांमध्ये विद्यार्थ्यांनी जेव्हा बोलायला सुरुवात केली, तेव्हा त्यांच्या बोलण्यात केवळ प्रश्न नव्हते, तर आशा होती. "मी आर्किटेक्ट कसा होऊ शकतो?", "आमच्या गावात विद्यापीठ का नाही?", "माझी बहीण कॉलेजला जाऊ शकते का?" – हे प्रश्न म्हणजे समाजाच्या अंतःकरणातील स्पंदन होतं. या स्पंदनांना योग्य दिशा देणं, ही आपली सामूहिक जबाबदारी आहे.




**एक अंतर्निहित क्रांतीची नांदी**

शालेय अभ्यासक्रम हे अनेकदा एका चौकटीत गुंतलेलं असतात. पण 'स्कूल कनेक्ट 2.0' मुळे त्या चौकटीतून बाहेर येण्याची संधी मिळाली. या उपक्रमाने विद्यार्थ्यांना केवळ ज्ञान दिलं नाही, तर त्यांना प्रश्न विचारण्याचं धैर्य दिलं, स्वप्न बघण्याची मुभा दिली आणि अनेक घटकांनी एकत्र येऊन शिक्षणाचं मूल्य अधोरेखित केलं. या उपक्रमामुळे शाळा आणि विद्यापीठ यांच्यातील संवाद अधिक मानवी, संवेदनशील आणि यथार्थ झाला आहे.

एक महत्वाची गोष्ट म्हणजे, या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील शिक्षकांनाही नव्या मार्गदर्शन पद्धतींची ओळख झाली. अनेक ठिकाणी शिक्षकांनी या संवाद सत्रांनंतर आपल्या अध्यापन पद्धतीत बदल केला. त्यांनी विद्यार्थ्यांशी केवळ शैक्षणिक संवाद न ठेवता, त्यांच्या भविष्यासाठी समुपदेशकाचं स्थान स्वीकारलं. ही शिक्षकांची बदलती भूमिका ही 'स्कूल कनेक्ट 2.0' ची अजून एक शांत पण प्रभावी क्रांती आहे.

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठीसुद्धा हा उपक्रम शिकवण्याच्या पलीकडे गेला. त्यांनी समाजातील विविध स्तरांतील विद्यार्थ्यांशी संवाद साधताना स्वतःचं आत्मपरीक्षण केलं, त्यांच्या स्वतःच्या विशेषाधिकारांची जाणीव झाली, आणि त्यांनी आपली जबाबदारी नव्यानं स्वीकारली. शिक्षण हे केवळ प्रमाणपत्र मिळवण्याचं साधन नसून, ते एक सामाजिक भान जागवणारी प्रक्रिया आहे, हे त्यांना समजलं.

हा उपक्रम म्हणजे एका नव्या भारताची बीजं रोवण्याचं कार्य आहे — जिथे विद्यार्थ्यांच्या मनात प्रश्न आहेत, शिक्षकांकडे सहानुभूती आहे, पालकांमध्ये उमेद आहे आणि संपूर्ण समाज शिक्षणाच्या एका नवीन दिशेकडे वाटचाल करत आहे. हा बदल सहजपणे घडलेला नाही; तो शेकडो विद्यापीठ प्राध्यापक, शिक्षक, स्वयंसेवक आणि धोरणकर्त्यांच्या सामूहिक प्रयत्नातून आकाराला आलेला आहे.

आणि म्हणूनच...

शाळेतील त्या एका तासात घडलेला संवाद, एक प्रश्न, एक उत्तर, एक सादरीकरण — या साऱ्यांतून घडतोय एक नवीन भारत. शाळांमधील काळसर डेस्कवर बसलेला विद्यार्थी, ज्याच्या डोळ्यांत भविष्याचं स्वप्न आहे, आता एका अधिक स्पष्ट, सुसंगत आणि प्रेरणादायी मार्गावर आहे.

हा आहे 'स्कूल कनेक्ट 2.0' — केवळ एक शैक्षणिक उपक्रम नाही, तर महाराष्ट्राच्या ज्ञानसंपन्नतेचा आणि विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वासाचा सेतू आहे.



उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य आणि भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयांतर्गत असलेल्या बोर्ड ऑफ एप्रेंटिसशिप ट्रेनिंग, पश्चिम विभाग, मुंबई यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला. या प्रसंगी उपस्थित महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ संचालक डॉ प्रमोद नाईक, उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर, महाराष्ट्र राज्य बोर्ड ऑफ एप्रेंटिसशिप ट्रेनिंग, पश्चिम विभागाचे संचालक पी.एन. जुमले, उपसंचालक एन.एन. वडोदे

# एप्रेंटिसशीप एम्बेडेड डिग्री प्रोग्राम: शिक्षणातून रोजगाराकडे

**श्री पी. एन. जुमले**
संचालक, बोर्ड ऑफ एप्रेंटिसशिप ट्रेनिंग (पश्चिम विभाग), मुंबई

पारंपरिक वर्गखोल्यांच्या चौकटीमधून बाहेर पडत, शिक्षणाच्या अनुभवाला नवसंजीवनी देणारा ‘Apprenticeship Embedded Degree Programme’ हा उच्च शिक्षणातील एक परिवर्तनकारी टप्पा आहे. या उपक्रमात, विद्यार्थ्यांना शिकतानाच उद्योगजगताचा थेट अनुभव मिळतो- ज्यातून आत्मविश्वास, कौशल्य आणि रोजगारक्षमतेची पायाभरणी होते. शिक्षण आणि अनुभव यांचा हा संगम, केवळ नोकरीसाठी नव्हे तर जीवनासाठी विद्यार्थ्यांना तयार करतो.

कामाच्या जागी थेट उतरायची वेळ येते तेव्हा शिकलेले कितपत उपयोगी पडते? आणि पदवी घेतल्यानंतरही अनेक विद्यार्थी बेरोजगार का राहतात? या प्रश्नांची उत्तरं शोधण्यासाठी शिक्षण आणि उद्योग यांच्यातील सहकार्य नव्याने मांडले जात आहे." पारंपरिक वर्गखोल्यांच्या चौकटीमधून बाहेर पडत, शिक्षणाच्या अनुभवाला नवसंजीवनी देणारा ‘Apprenticeship Embedded Degree Programme’ हा उच्च शिक्षणातील एक परिवर्तनकारी टप्पा आहे. या उपक्रमात, विद्यार्थ्यांना शिकतानाच उद्योगजगताचा थेट अनुभव मिळतो — ज्यातून आत्मविश्वास, कौशल्य आणि रोजगारक्षमतेची पायाभरणी होते. शिक्षण आणि अनुभव यांचा हा संगम, केवळ नोकरीसाठी नव्हे तर जीवनासाठी विद्यार्थ्यांना तयार करतो.

**राष्ट्रीय शिक्षुता प्रशिक्षण योजना (National Apprenticeship Training Scheme-NATS)**

राष्ट्रीय शिक्षुता प्रशिक्षण योजना (NATS) ही भारत सरकारची युवकांचे ऑन-द-जॉब ट्रेनिंग घडावे आणि त्यांचा कौशल्य विकास व्हावा यासाठी आखलेली प्रमुख योजना आहे. ही योजना प्रशिक्षु अधिनियम, १९६१ आणि शिक्षुता नियम, १९९२ अंतर्गत कार्यरत आहे. केंद्र शासनाकडून चालवली जाणारी ही योजना शिक्षण मंत्रालयाच्या उच्च शिक्षण विभागाद्वारे चार प्रादेशिक शिक्षुता प्रशिक्षण/व्यावहारिक प्रशिक्षण मंडळांकडून (BOATs/BOPT) कार्यान्वित केली जाते. ही मंडळे मुंबई, कानपूर, चेन्नई, आणि कोलकाता येथे स्थित आहेत.

प्रशिक्षु अधिनियमानुसार ज्या आस्थापनांमध्ये तीस किंवा त्याहून अधिक कामगार (कायम स्वरुपी, कंत्राटी, आऊटसोर्स, आणि अर्धवेळ कामगारांसह) कार्यरत आहेत त्यांना या योजनेत सहभागी होणे बंधनकारक आहे. अश्या आस्थापनांना त्यांच्या एकूण कामगार संख्येच्या २.५% ते १५% इतक्या उमेदवारांना प्रशिक्षणासाठी नियुक्त करणे बंधनकारक आहे. या प्रशिक्षण योजनेचे वैशिष्ट्य असे आहे की पदवीधर/डिप्लोमा उमेदवारांच्या एका वर्षाच्या शिक्षुता प्रशिक्षणाला केंद्रीय आणि राज्य शासनाच्या आस्थापनेत रोजगारासाठी अनुभव म्हणून मान्यता दिली जाते. मागील पाच आर्थिक वर्षांत, NATS योजनेद्वारे सुमारे १२.९४ लाख उमेदवारांना प्रशिक्षित केले गेले. आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये, देशभरात NATS अंतर्गत ५,२३,१२८ हून अधिक उमेदवारांना प्रशिक्षण दिले आहे.

कोणताही पूर्व अनुभव नसलेल्या सर्व पदवीधर आणि डिप्लोमा धारकांना या योजनेअंतर्गत सहा ते बारा महीने प्रशिक्षणाची संधी मिळते. सर्व पदवीधर आणि डिप्लोमा धारकांना पदवीधर झाल्यानंतर पाच वर्षांच्या आत NATS अंतर्गत प्रशिक्षणासाठी अर्ज करता येतो. शिक्षुता प्रशिक्षणादरम्यान उमेदवारांना छात्रवृत्ती (स्टायपेंड) प्रदान केली जाते. निर्धारित किमान छात्रवृत्तीच्या अर्धी रक्कम शिक्षुकांना भारत सरकार प्रदान करते. गत वर्षी भारत सरकारने थेट लाभ हस्तांतरण (DBT) यंत्रणेद्वारे शिक्षुकांच्या बँक खात्यात त्यांच्या छात्रवृत्तीचा वाटा जमा करण्यास सुरुवात केली आहे.

**शिक्षु प्रशिक्षण मंडळ (पश्चिम विभाग) बद्दल**

शिक्षु प्रशिक्षण मंडळ (पश्चिम विभाग) [BOAT (WR)] हे भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयाच्या उच्च शिक्षण विभागांतर्गत एक स्वायत्त संस्थान आहे. हे संस्थान इंजिनियरिंग आणि नॉन इंजिनीअरिंग पार्श्वभूमी असलेल्या पदवीधर आणि डिप्लोमा धारकांना शिक्षुता प्रशिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देऊन राष्ट्रीय शिक्षुता प्रशिक्षण योजना (NATS) लागू करण्यास मदत करते. यामध्ये अभियांत्रिकी पदवीधर, डिप्लोमा धारक, सँडविच कोर्सचे विद्यार्थी आणि सामान्य पदवीधर (B.A., B.Sc., B.Com., इत्यादी) यांचा समावेश होतो. BOAT (WR) महाराष्ट्र, गुजरात, गोवा, छत्तीसगड, मध्य प्रदेश या राज्यामधे आणि दमण आणि दीव आणि दादरा आणि नगर हवेली या केंद्रशासित प्रदेशामध्ये योजनेचीची अंमलबजावणी करते.

**BOAT (WR) द्वारे राष्ट्रीय शिक्षुता प्रशिक्षण योजनेची अंमलबजावणी प्रक्रिया**

BOAT (WR) आस्थापनांना सहभागी करून घेते. उमेदवारांसाठी प्रशिक्षण स्लॉट आखून त्यांना नोंदणीस मदत करते आणि उच्च शैक्षणिक संस्थांना सहकार्य करून NATS ची अंमलबजावणी करते. BOAT (WR) आस्थापना आणि इच्छुक उमेदवार यांच्यात शिक्षुता करार तयार करण्यासाठी आणि प्रशिक्षण पूर्ण करण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावते.

२०२४-२५ या आर्थिक वर्षात, BOAT (WR) ने भरती मेळावे, करिअर मार्गदर्शन कार्यक्रम (CGP), पर्यवेक्षक विकास कार्यक्रम (SDP), उद्योजकता विकास कार्यक्रम (EDP), उद्योग संस्थान संवाद बैठक, NATS जनजागृती कार्यक्रम, आणि विविध क्षेत्रांमध्ये सेवा शिबिरे असे शंभराहून अधिक जनजागृती पूरक कार्यक्रम आयोजित केले आहेत.

BOAT (WR) शिक्षण मंत्रालय (MoE) द्वारे सुरू केलेल्या उपक्रमांच्या अंमलबजावणीत देखील महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. प्रशिक्षु प्रशिक्षणार्थ्यांचे मूल्यांकन आणि श्रेयांकन, सामान्य सेवा केंद्रांसह (CSCs) सहकार्य, NATS अंतर्गत एप्रेंटिसशीप एम्बेडेड डिग्री प्रोग्राम (AEDP) ची अंमलबजावणी त्यादी उपक्रमांचा यात समावेश आहे.

**एप्रेंटिसशीप एम्बेडेड डिग्री प्रोग्राम (AEDP)**

सद्य स्थितीत 'वर्गात जे शिकवले जाते' आणि 'उद्योगाला जे आवश्यक असते' यात बरेच अंतर आहे आणि ते भरून काढण्याची गरज आहे. उद्योगाला आवश्यक असलेल्या कौशल्यांचा समावेश विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात करणे गरजेचे आहे. असे केल्यास शिक्षण आणि रोजगारक्षेत्रामधील अंतर कमी होईल. हे अंतर कमी करण्यात एप्रेंटिसशीपचा महत्त्वाचा वाटा आहे.

एप्रेंटिसशी एम्बेडेड डिग्री प्रोग्राम (AEDP) हा एक शैक्षणिक कार्यक्रम आहे. UGC अधिनियम, १९५६ मुसार हा कार्यक्रम राबविला जातो. उच्च शैक्षणिक संस्थेत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्याला या अधिनियमांनुसार मान्यता प्राप्त, पदवी/डिप्लोमा कार्यक्रमाचा एक घटक म्हणून एप्रेंटिसशीप प्रशिक्षण घेण्याची परवानगी मिळते,.

AEDP ची अंमलबजावणी करण्याचा शिक्षण मंत्रालयाचा (MoE) दृष्टिकोन राष्ट्रीय शिक्षण धोरण (NEP), २०२०च्या उद्दिष्टांमध्ये खोलवर रुजलेला आहे. अधिक सर्वसमावेशक शिक्षण देण्यावर या धोरणात जोर दिला आहे. उच्च शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी एप्रेंटिसशीप प्रशिक्षण अत्यावश्यक आहे, कारण हे प्रशिक्षण प्रभावीपणे सैद्धांतिक ज्ञान आणि व्यावहारिक कौशल्यांमधील अंतर भरून काढते.

**एप्रेंटिसशीप एम्बेडेड डिग्री प्रोग्राम (AEDP) चा कालावधी**

| S. N. | कार्यक्रम | अनुमत शिक्षुता समावेश | |
|---|---|---|---|
| | | किमान | कमाल |
| 1 | UG – ३ वर्षे | १ सेमेस्टर | ३ सेमेस्टर |
| 2 | UG – ४ वर्षे | २ सेमेस्टर | ४ सेमेस्टर |

शिक्षण मंत्रालय विद्यार्थ्यांच्या रोजगारक्षमतेला लक्षणीयरीत्या चालना देण्यासाठी AEDPs राबवण्यास कटीबद्ध आहे. आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये, BoAT (WR) ने महाराष्ट्र, गुजरात, छत्तीसगड, आणि मध्य प्रदेशातील पंचवीसपेक्षा जास्त शैक्षणिक संस्था आणि विद्यापीठां बरोबर सामंजस्य करार (MoUs) केले आहेत.

सर्व प्रादेशिक बोर्डांमध्ये NATS अंतर्गत, येत्या शैक्षणिक वर्षांमध्ये दोनशेहून अधिक AEDP अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थांशी ७५ पेक्षा जास्त सामंजस्य करार झाले आहेत.

### उच्च शिक्षण संचालनालय आणि BOAT (WR) यांच्यात सामंजस्य करार

, राज्यातील उच्च शिक्षणाच्या विकासासाठी विविध योजना तयार करून त्यांची अंमलबजावणी करणे, उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थांमधील एकूण अभ्यासक्रम विकासात नवकल्पनांना प्रोत्साहन देणे, शैक्षणिक संस्थांमध्ये परस्पर समन्वय वाढवणे आणि उद्योग भागीदार आणि इतर संबंधित संस्थांशी संवाद साधण्यासाठी संधींचा शोध घेणे हे

महाराष्ट्र सरकारच्या उच्च शिक्षण संचालनालयाचे उद्दिष्ट आहे. संचालनालयाद्वारे नियंत्रित सर्व विद्यापीठे, स्वायत्त आणि शासकीय महाविद्यालये, तसेच अनुदानित आणि विना अनुदानित महाविद्यालयांमध्ये AEDP ची अंमलबजावणी या उद्दिष्टांना पाठिंबा देईल.

या संदर्भात, उच्च शिक्षण संचालनलयाने BOAT (WR) सोबत सामंजस्य करार केला आहे. या करारामुळे संचालनालयाद्वारे नियंत्रित सर्व उच्च शिक्षण संस्थात NATS अंतर्गत AEDP अंमलबजावणीस आणखी बळकटी येईल. विद्यार्थ्यांना त्यांच्या शैक्षणिक अभ्यासक्रमाच्या शेवटच्या वर्षात शिक्षुता प्रशिक्षणादरम्यान स्टायपेंडचा लाभ तर प्राप्त होईलच. शिवाय शिक्षुता प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केल्यानंतर, विद्यार्थ्यांना BOAT (WR) कडून त्यांच्या कार्य अनुभवाचे प्रमाणपत्र देखील मिळेल.

मागील पाच आर्थिक वर्षांत, BoAT (WR) ने पश्चिम विभागात सुमारे ३.६३ लाख उमेदवारांना प्रशिक्षित केले आहे. आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये, NATS अंतर्गत १,४०,५४५ उमेदवारांना प्रशिक्षण देण्यात येत आहे. ऑटोमोबाईल आणि ऑटोमोटिव्ह घटक, IT/ ITeS, उत्पादन क्षेत्र, BFSI, फार्मास्युटिकल, सेवा क्षेत्र, शैक्षणिक संस्था, शासकीय व निमशासकीय आस्थापना यांसारख्या विविध क्षेत्रांमध्ये सध्या प्रशिक्षु शिक्षुता प्रशिक्षण घेत आहेत.




| कोणत्याही शाखेतील विद्यार्थ्यांची श्रेणी | ठरवलेल्या किमान दराप्रमाणे छात्रवृत्तीची रक्कम | छात्रवृत्तीमधील सरकारचा हिस्सा |
|---|---|---|
| तंत्रज्ञ/डिप्लोमा-कोर्स विद्यार्थी | रु. ७,००० प्रति महिना | रु. ३,५०० प्रति महिना |
| पदवी-कोर्स विद्यार्थी | रु. ८,००० प्रति महिना | रु. ४,००० प्रति महिना |

### छात्रवृत्तीचा लाभ

शिक्षुता प्रशिक्षणादरम्यान NATS उमेदवारांना छात्रवृत्ती प्रदान करते. भारत सरकार शिक्षुकांसाठी निर्धारित किमान छात्रवृत्तीच्या अर्धी रक्कम प्रदान करते. गतवर्षी भारत सरकारने थेट लाभ हस्तांतरण (DBT) यंत्रणेद्वारे थेट शिक्षुकांच्या बँक खात्यात त्यांच्या छात्रवृत्तीचा वाटा जमा करण्यास सुरुवात केली आहे.

### नवीन दिशा, नव्या संधी

हा लेख म्हणजे या योजनांचा केवळ आकडेवारीत मांडलेला यशस्वी प्रवास नव्हे, तर तो शिक्षणव्यवस्थेतील एक सकारात्मक बदल दर्शवणारा टप्पा आहे. शिक्षणाचा अनुभव शैक्षणिक संकुलांमध्ये फक्त पुस्तकं व प्रयोगशाळांपुरता मर्यादित न राहता, उद्योग जगताशी प्रत्यक्ष संपर्क साधत विद्यार्थ्यांना जगण्याची, शिकण्याची आणि घडण्याची संधी मिळते आहे.

BOAT (Western Region) आणि उच्च व तंत्र शिक्षण संचालनालय यांच्या संयुक्त प्रयत्नातून आज महाराष्ट्रात जे घडते आहे, त्याने शिक्षणाची आणि कौशल्याची उत्कृष्ट सांगड घातली जात आहे. यामुळे विद्यार्थी नुसते पदवीधर न होता, रोजगारक्षम आणि आत्मनिर्भर होत आहेत.

एप्रेंटिसशीप एम्बेडेड डिग्री प्रोग्राम (AEDP) हे केवळ एक शिक्षणमाध्यम नाही; ते एका नव्या विचारसरणीचे, नव्या दिशेचे आणि नव्या भारताच्या युवाशक्तीच्या सबलीकरणाचे प्रतीक आहे. केवळ नोकरी शोधणारा तरुण तयार करण्याऐवजी, उद्योगातील समस्यांवर विचार करणारा, त्या सोडवणारा आणि स्वतःहून पुढे जाणारा तरुण घडवण्याची ही प्रक्रिया आहे.

शिक्षणात "हाताला काम" आणि "मनाला दिशा" मिळाल्यास, विद्यार्थी ही केवळ संख्या न राहता देशाच्या प्रगतीचा भाग होतात. कारण शिक्षण म्हणजे केवळ ज्ञान नाही — ती एक संधी आहे. आणि ही संधी आता विद्यार्थ्यांच्या दारात उभी आहे — शिक्षुता रूपाने, अनुभव रूपाने, आणि उज्ज्वल भविष्याची वाट दाखवणाऱ्या AEDP च्या रूपाने!




# वाचन संकल्प महाराष्ट्राचा: ग्रंथ हे समाजसुख


**प्रा. रमेश नारायण वरखेडे**
निवृत्त संचालक, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक



एक जानेवारी ते १५ जानेवारी दरम्यान राज्य सरकारच्या वतीने महाराष्ट्रात राज्यशासित शैक्षणिक संस्थांमध्ये, म्हणजेच विद्यापीठे आणि संलग्न महाविद्यालयात 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' हा अभिनव उपक्रम राबविण्यात आला. शासनाच्या वतीने राज्यभरात एकाच वेळी वाचनसंस्कृती जोपासण्यासाठी असा उपक्रम राबविण्याची ही पहिलीच वेळ होती. या उपक्रमात अंतर्भूत असलेले कार्यक्रम आणि त्यातून साध्य झालेली उद्दीष्टे यांचा आढावा घेणारा एक अहवाल प्रकाशित करण्यात आला आहे. या अहवालाच्या संपादक समितीतील एक सदस्य प्रा. रमेश वारखेडे यांचा या उपक्रमाचा लेखाजोखा मांडणारा हा लेख.


अध्ययनशील समाजाच्या जडणघडणीत पुस्तकवाचनाचे महत्त्व किती आहे, याची अनेक उदाहरणे आपल्याला माहीत आहेत. महात्मा गांधींच्या जीवनावर थोरोच्या 'वॉल्डन' आणि जॉन रस्किनच्या 'अन् टु द लास्ट' ह्या पुस्तकांचा प्रभाव होता. त्यातून त्यांना अहिंसा व सत्याग्रहाचे तत्त्वज्ञान गवसले, आणि आपल्या जीवितकार्याचे ध्येय गाठण्यासाठीचा नकाशा प्राप्त झाला. आब्राहम लिंकनला जॉर्ज वॉशिंग्टनच्या चरित्रातून प्रेरणेचा स्त्रोत प्राप्त झाला आणि अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षपदापर्यंत आपल्या कर्तृत्वाची मजल त्यांना गाठता आली. पुस्तकांचे हे महत्त्व कथन करताना लोकमान्य टिळक यांनी लिहून ठेवले आहे की, "स्वर्गापेक्षा मी चांगल्या पुस्तकांचे स्वागत करीन; कारण पुस्तक जिथे असेल तिथे मी

स्वर्ग निर्माण करीन.” पद्मपुराणासारख्या प्राचीन संहितेतही हे ग्रंथमहात्म्य वर्णन कराना म्हटले आहे की, “हजारो गाई दान दिल्या असता जे पुण्य मिळते , तेवढे पुण्य एक पुस्तक दान दिल्याने मिळते”. “ग्रंथ हे समाजसुख आहे” असे इतिहासकार वि. का. राजवाडे यांनी म्हटले आहे. “ ग्रंथ वाचल्याने मनुष्य विचार करू लागतो. विचारांचा खल झाल्यावर आचार बनतात व नंतर समाजाचे पाऊल पुढे पडते” , अशी ग्रंथांची महती राजवाडे यांनी सांगितली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पुस्तकप्रेम आपणा सर्वांना ठाऊक आहे. त्यांनी त्याविषयी लिहून ठेवले आहे की, “माझे ग्रंथालय म्हणजे माझा प्राण. पुस्तकांच्या सहवासात शांत आयुष्य वेचण्यासारखा दुसरा आनंद नाही. पुस्तकं मला नवी वाट दाखवतात, ती खूप आनंद देतात.” राष्ट्रनेते, इतिहासलेखक आणि विचारवंतांनी पुस्तकवाचनाचे हे महात्म्य वेळोवेळी सांगितले आहे. आचार्य काका कालेलकर यांनी म्हटले होते की राष्ट्रउभारणीसाठी लागणारे प्रबुद्ध नेतृत्व घडवायचे असेल तर वाचनसंस्कृतीचा विकास करणे हा सर्वोत्तम मार्ग आहे. त्यांनी यासंदर्भात लिहून ठेवले आहे की, “लोकशाहीला जर समर्थ विचारवंत आणि दीर्घद्रष्टे लोकसेवक आणि लोकनेते मिळवायचे असतील, तर ग्रंथालये आणि वाचनालये देशात जितकी पसरतील तितकी हवी आहेत." हे सगळे विचार लक्षात घेऊन महाराष्ट्र सरकारने महाविद्यालयीन तरुणांमध्ये नवभारत निर्माणाच्या प्रेरणा जागविण्यासाठी ‘वाचनसंस्कृती’ निर्माणाचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प हाती घेतला आहे. अध्ययनशील समाजाच्या जडणघडणीतील तरुणांचा वाटा वाढविण्यासाठी आणि नव्या पिढीची वैचारिक मशागत करण्याचे ज्ञानात्मक माध्यम म्हणून सरकार वाचनसंस्कृती जोपासण्यावर भर देत आहे.

## राज्य सरकारचा वाचनसंकल्प कार्यक्रम

राज्य सरकारने युवा पिढीच्या विकासासाठी, वैचारिक भरणपोषणासाठी आणि सामाजिक प्रबोधनासाठी संपूर्ण महाराष्ट्रात १ ते १५ जानेवारी २०२५ या काळात ‘वाचनसंकल्प महाराष्ट्राचा’ ह्या उपक्रमाचा प्रारंभ केला. वाचनसंस्कृतीचा विकास करण्यासाठी महाराष्ट्र सरकारने आखलेला हा एक अभिनव उपक्रम होता. तरूण वर्गाला वाचनाकडे वळवून डिजिटल युगात मनावर येणारा ताण हलका करण्यात या अभियानाचा फार सकारात्मक परिणाम दिसून आला. या उपक्रमात राज्यातील १५ शासकीय व अभिमत विद्यापीठे, २८ शासकीय आणि १४८५ संलग्न महाविद्यालये, आणि ५९ सार्वजनिक वाचनालयांचा सहभाग होता. संपूर्ण राज्यातून ५,९६,५१२ विद्यार्थी या अभियानात सहभागी झाले. या पंधरा दिवसात या तरुणांनी ४,४२,१६० पुस्तके वाचली. वाचनामुळे अनुभवाची क्षितिजे विस्तारतात, जीवन अभिरुचिसंपन्न बनते ह्याचे महत्त्व बिंबवण्यासाठी विद्यापीठे, शासकीय आणि संलग्न महाविद्यालयांतील प्राध्यापक, ग्रंथपाल यांचा सहयोग होताच; परंतु त्याखेरीज २,४६९ लेखकांनी विद्यार्थ्यांशी वाचनाच्या विविध पैलूंवर चर्चासंवाद साधला. या लेखकांमध्ये विज्ञानलेखक बाळ फोंडके, अच्युत गोडबोले , संगणक तंत्रज्ञ अतुल कहाते, कथा-कादंबरीकार भारत सासणे, समीक्षक सुधार रसाळ, इतिहासलेखक पांडुरंग बलकवडे, कवियित्री नीरजा यांचा प्रातिनिधिक सहभाग लाभला होता.

वाचन पंधरवाडा साजरा करताना केवळ संख्यात्मक सहभागावर लक्ष केन्द्रित न करता वाचनाभिरुचीचे शाश्वत संस्कार रुजविण्यावर भर देण्यात आला होता. आजच्या डिजिटल युगात समाजमाध्यमांतून प्रासंगिक आणि उडत्या संवादाचे पेव फुटले आहे. त्यामुळे ग्रंथवाचनाचे प्रमाण कमालीचे घटले आहे, हे वास्तव बदलण्यासाठी ह्या अभियानाची कल्पकतापूर्ण आखणी करण्यात आली होती. नव्या पिढीला आभासी माध्यमांकडून मुद्रित वाचनस्त्रोतांकडे वळविण्यासाठी सामुहिक वाचनाचा प्रयोग सुचविण्यात आला होता. या उपक्रमातून अभिवाचन शैलीच्या नानाविध छटा विद्यार्थ्यांना समजल्या. कुसुमाग्रजांच्या ‘फक्त लढ म्हणा' यासारख्या कवितांच्या सामूहिक वाचनातून विद्यार्थ्यांच्या मनातले आत्मबळ वाढले. नाटक-एकांकिकांच्या अभिवाचनातून संवादशैलीच्या विभ्रमांचे सौंदर्य मुलांपर्यंत पोहचले. नाटकाची रंगभाषा, कवितेची ध्वनिप्रतिमांची छंदोलयीची भाषा आणि विज्ञान व निबंधात्मक लेखनातील वैचारिक व्याकरणाची परिभाषा यांतले वैविध्य मुलांना उलगडले. काही ठिकाणी विज्ञान व गद्य वाड्मयातील वरकरणी दुर्बोध वाटणाऱ्या वेच्यांचे वाचन करून त्यातली आशयसंपृक्तता जाणून घेण्यासाठी वाचनकौशल्ये कशी अवगत करावीत, याचे मार्गदर्शन करण्यात आले. अशा प्रकारच्या लेखनात सूत्रे, प्रमेये, कोष्टके, तालिका, नकाशे, सांख्यिकी यांचे स्थानमहात्म्य काय असते, याचे विद्यार्थ्यांना ज्ञान झाले. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या मनातील संभ्रम दूर झाले. या अभियानाला विद्यार्थ्यांकडून फार उत्तम प्रतिसाद मिळाला. राज्यातील पाच लाखांहून अधिक विद्यार्थ्यांनी या उपक्रमाचा लाभ घेतला.

## ग्रंथालयांचे अंतरंग

या उपक्रमांतून ग्रंथालयांचा वापर कसा करावा याविषयीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. त्यासाठी पुस्तक प्रदर्शने भरविण्यात आली. शब्दकोश, ज्ञानकोश, संदर्भग्रंथ, नकाशे, गॅझेटियर्स, नियतकालिके, परिभाषा संग्रह यांचा उपयोग कसा करावा ह्याची माहिती देण्यात आली. पुस्तकांचे वर्गीकरण, ग्रंथालयातील वर्गीकरण तालिका, सूचीग्रंथ यांच्या माध्यमातून विशिष्ट विषयांतील वाचनसाहित्य कसे शोधावे याची कौशल्ये संपादित करण्याची तंत्रे समजावून सांगण्यात आली. ग्रंथालयांची स्वच्छता, पुस्तकांची निगा कशी राखावी यासंबंधीही जाणीव-जागृती करण्यात आली. सर्वच पुस्तके आपल्याला अथपासून इतिपर्यंत वाचण्याची गरज नसते. उपलब्ध कामकाजाचा वेळ लक्षात घेता आपल्याकडे तेवढा वेळही उपलब्ध नसतो. अशा वेळी पुस्तकाची पाने चाळताना ठळक शब्द, सूत्रवाक्ये यावरून नजर कशी फिरवावी, वाचता वाचता मुख्य आशयसूत्रांची टिपणे कशी काढावीत, संदर्भसूची, विषयसूची, नामसूची या परिशिष्टांचा माहिती शोधनासाठी उपयोग कसा करावा याची प्रात्यक्षिके विद्यार्थ्यांना करून पाहता आली. इ-पुस्तके वाचताना हायपरटेक्स्टच्या खुणांवरून पूरक माहिती कशी शोधावी याचाही प्रत्यक्षानुभव विद्यार्थ्यांना घेता आला. डॉ. राजेंद्र कुंभार, डॉ. नवनाथ तुपे यांच्यासारख्या ग्रंथालयशास्त्र व शिक्षणशास्त्रातील ज्येष्ठ तज्ज्ञांचे यासाठी विशेष सहकार्य लाभले.





## आवांतर वाचनाचे महत्त्व

पाठ्यपुस्तकांखेरीज आवांतर वाचनासाठी कोणती पुस्तके निवडावीत याविषयीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. चरित्र-आत्मचरित्रांच्या वाचनातून वाचकांना व्यक्तित्वविकासाचे नमुनादर्श मिळतात. मनुष्यस्वभावाचे निरनिराळे नमुने कळतात. नवनिर्मितीसाठी लागणारी अध्ययनसाधना कशी करावी याची उदाहरणे मिळतात. परिस्थितीशी झुंझण्याचे आत्मबळ प्राप्त होते. कथा-कादंबऱ्या, कविता-नाटकंतून सर्जनशीलता आणि कल्पकतेच्या विकासाच्या वाटा प्रशस्त होतात,प्रवासवर्णनांतून निसर्गघटिते आणि स्थळवैशिष्ट्यांचे पाहाण्याची नजर तयार होते; इतिहास ग्रंथांतून राष्ट्रीय अस्मितेचे भान जागे होते, ऐतिहासिक वीरपुरुषांच्या योगदानाचे माहात्म्य कळते. युद्धनीतीचे डावपेच कळतात. संकटातून मार्ग काढण्याच्या क्लृप्त्या उमजतात. ग्रंथवाचन हा एक मानसोपचार (बिब्लिओथेरपी) आहे, हे आता सर्वमान्य झाले आहे. ग्रीक ग्रंथकारांनी पुस्तकांचे महात्म्य वर्णन करताना ‘Medicine (or Remedy) for the soul” असे एक वचन सांगितले आहे. तिथल्या ग्रंथालयाच्या भिंतीवर ते लिहिलेले असते. युवा पिढीचे भावनिक व वैचारिक भरणपोषण करण्यासाठी म्हणूनच आवांतर वाचनाची सवय लावण्याची गरज आहे. या वाचनमहोत्सवातून हा एक संदेशवाचकांपर्यंत पोचविण्यात नक्कीच यश प्राप्त झाले आहे.

## वाचनकौशल्य कार्यशाळा

वाचनोपचारांबरोबरच वाचनकौशल्यांचे समग्र आकलन व्हावे यासाठी काही कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले होते. त्यात विद्यार्थ्यांना प्रकट वाचनाच्या संधी उपलब्ध करून दिल्या गेल्या. कथनातील निवेदनशैली लक्षात घेऊन वाचन कसे करावे, वाचनातील चढ-उतार, अवरोह-अवरोध, बलाघात, छंदोलय, गती आणि विराम यांचे बारकावे कसे लक्षात घ्यावेत याची प्रात्यक्षिके मुलांना अनुभवता आली. आपल्या वाचनदोषांची जाणीवही झाली. शब्दकोश, ज्ञानकोश, परिभाषाकोशांचे महत्त्व आणि उपयोजन करण्याची कौशल्ये वाचकांना अवगत करून देण्यात आली. शब्दकोश म्हणजे विचारांची तिजोरी असते, भाषाप्रभुत्व वाढविण्याचे साधन असते, हे विद्यार्थ्यांना या कार्यशाळेतून उमजले. शब्दकोश (डिक्शनरी), शब्दशोधनकोश (थिसॉरस) , परिभाषाकोश (टर्मिनॉलॉजी), संख्यासंकेत कोश, लोकसाहित्य शब्दकोश, विज्ञानपरिभाषाकोश असे शब्दकोशांचे विविध प्रकार या कार्यशाळेतून विद्यार्थ्यांना परिचित झाले. ज्ञानकोशांचेही विश्वकोश, भारतीय संस्कृतीकोश, समाजविज्ञान कोश, तत्त्वज्ञान महाकोश असे विविध प्रकार आणि त्यांचे अध्ययनप्रक्रियेतील महत्त्व याविषयीची कार्यात्मक कौशल्येही विद्यार्थ्यांना शिकायला मिळाली. पुस्तक वाचताना समासात पेन्सिलीने नोंदी किंवा अधोरेखिते कशी करावीत, वाचन आराखडा करून वाचनाचे नियोजन कसे करावे, वाचननोंदवहीचे व्यवस्थापन, वाचनवेग आणि आकलनवेग वाढविण्याची तंत्रे अशा अनेक अंगोपांगांवर विद्यार्थ्यांशी संवाद प्रस्थापित झाला.

## पुस्तक परीक्षण कार्यशाळा

या उपक्रमाला जोड म्हणून पुस्तकपरीक्षणांची कार्यशाळाही आयोजित करण्यात आली होती. या उपक्रमात राज्यातील २,६२,७२१ विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता. बऱ्याच विद्यार्थ्यांनी पुस्तकपरीक्षणासाठी अब्दुल कलाम, शास्त्रज्ञ कार्व्हर, दया पवार इत्यादींची लोकप्रिय चरित्र-आत्मचरित्रे निवडली होती. तसेच छत्रपती शिवाजी महाराज, संभाजी राजे यांच्या जीवनावरील श्रीमानयोगी, छावा अशा ऐतिहासिक कादंबऱ्या आणि मृत्युंजय, ययाती यासारख्या पौराणिक विषयांतील पुस्तकांची निवड करण्याकडे कल होता. वैचारिक ग्रंथांकडे विद्यार्थ्यांचा कल अपवादानेच दिसून आला. पुस्तक परीक्षणासाठी लागणारी प्राथमिक वाचनकौशल्ये विद्यार्थ्यांना अवगत करून देण्यात आली. अनुक्रमणिकेतून आणि ग्रंथाच्या शेवटी दिलेल्या विषयसूचीतून आशयाचा तपास कसा करावा, प्रस्तावनेतून पुस्तकाचे मध्यवर्ती आशयसूत्र आणि

लेखकाचा  दृष्टिकोन कसा समजावून घेता येतो, याचा प्रात्यक्षिक अनुभव देण्यात आला. लेखनातील शब्दांचा, वाक्प्रयोगांचा आणि वाक्यावलींचा अर्थ लावणे, माहितीचा सारांश लिहिणे, रसग्रहण करणे, कल्पनाविस्तार करणे अशा विविध कौशल्यांची प्रात्यक्षिके व स्वयंअनुभवाचे कृतीकार्यक्रम हे या वाचन कार्यशाळांचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य होते.

वाचक पंधरवाड्याच्या ह्या उपक्रमात विद्यार्थ्यांचा आणि शिक्षकांचा उत्साह वाखाणण्याजोगा होता. काही महाविद्यालयांनी मोबाईल ॲप तयार केले. त्यावर विद्यार्थ्यांनी लिहिलेली पुस्तकपरीक्षणे प्रसिद्ध केली. काही महाविद्यालयांनी कात्रणसंग्रहाची, हस्तलिखितांची प्रदर्शने भरविली. भित्तिपत्रके, डिजिटल माध्यमे, समाजमाध्यमांचा कल्पक वापर केला.  बऱ्याच महाविद्यालयांनी ग्रंथदिंड्या काढल्या. एका महाविद्यालयाने गावातील ज्येष्ठ नागरिकांचे स्वयंसेवक दल स्थापन करून घरोघरी ग्रामस्थांना धार्मिक व आरोग्यविषयक  पुस्तके वितरीत केली. सार्वजनिक वाचनालयांनीही ह्या उपक्रमात उत्स्फुर्त सहभाग दिला. काहींनी ग्रंथप्रदर्शने भरविली, प्रसिद्ध  पुस्तकांच्या  सामूहिक वाचनाचे उपक्रम केले.

## इतिकथन

महाराष्ट्राची वाचनसंस्कृती प्रगल्भ होण्यासाठी ह्या उपक्रमातून बरेच काही शिकायला मिळाले. शालेय पातळीपासून विद्यार्थ्यांवर वाचनसंस्कार होण्यासाठी वाचनपंधरवाड्यासारखे वार्षिक उपक्रम व्हावेत. शालेय व महाविद्यालयीन पातळीवर वाचनकौशल्यांचे अधिष्ठान अभ्यासक्रम अनिवार्य करावेत. वैचारिक वाङ्मयकडे विद्यार्थी, शिक्षक आणि नागरिकांचे दुर्लक्ष ही चिंतेची बाब आहे. ज्ञानात्मक समाजाची प्रगल्भता वाढविण्यासाठी वैचारिक साहित्याची निर्मिती आणि प्रसार याकडे विशेष लक्ष  देण्याची गरज आहे. तसेच शिक्षक आणि प्राध्यापकांची वाचनसमृद्धी ह्यासाठी काही उपक्रम व प्रोत्साहन योजनांची आखणी करण्याला अग्रक्रम दिला पाहिजे. आदर्श  शिक्षकांप्रमाणे आदर्श ग्रंथपालांसाठी राज्यपुरस्कारांची योजना असावी, ग्रंथालये समृद्ध होण्यासाठी राज्याच्या वार्षिक अंदाजपत्रकांत भरीव तरतूद असावी अशा अपेक्षा या अभियानातून पुढे आल्या आहेत.

मराठीच्या संदर्भात आजचे वर्तमान संख्यात्मक परिमाणाच्या दृष्टीने फारच उजवे आहे.  दहा कोटी मराठी भाषकांची संख्या असणाऱ्या मराठी भाषेचा जागतिक क्रमवारीत  १०वा  क्रमांक लागतो.  अर्थात केवळ संख्यात्मक मोजपट्टीने भाषांचे महत्त्व ठरत नसते.  संप्रेषणव्यवहारांची भाषिक घनता आणि ज्ञानक्षेत्रातील उपयोजनाचे गमक  यावरून  भाषेची महत्ता ठरत असते. त्यासाठी गावपातळीवर सार्वजनिक ग्रंथालयांचे आंतरजाल स्थापन झाले पाहिजे. सार्वजनिक  ग्रंथालयांच्या माध्यमांतून विधिसाक्षरता ,  आरोग्य  साक्षरता,  आधुनिक शेतीची तंत्रे यांचा  लोकशिक्षणाची केंद्रे म्हणून  वापर करून घेता येईल.

महाराष्ट्रात  एकूण ४३,७२२ खेडी आहेत; पण गावपातळीवर फक्त  ११,८३१ ग्रंथालये आहेत. शहरी भागातही हजाराहून अधिक ग्रंथालये नाहीत.  अशा सर्व सार्वजनिक ग्रंथालयांत  चांगल्या पुस्तकांचे संच असावेत; त्यांची देखभाल आणि ग्रंथसेवा देण्यासाठी ग्रंथालय सेवकांची उपलब्धी असावी. खेड्यातल्या  'ड' वर्ग वाचनालयांना वर्षाला केवळ ३०,००० रुपयांचे अनुदान दिले जाते, त्यापैकी ५०% रक्कम वेतनावर खर्च करण्याची अट असते. ग्रंथालय सेवकाला ना पुरेसे वेतन ना पुस्तक खरेदी व अन्य उपक्रमांसाठी पुरेसे पैसे, अशी सर्वत्र स्थिती आहे.  १९४८ साली मद्रास ग्रंथालय कायदा पारित करून  स्थानिक स्वराज्य संस्थांनी 'ग्रंथालय कर' लावून स्थानिक ग्रंथालये चालवली होती. गोवा राज्यात  ग्रामपंचायत असलेल्या प्रत्येक गावात सार्वजनिक ग्रंथालय आहे. फिरत्या वाहनातून लहान वाड्या-वस्त्यांत, झोपडपट्ट्यांत पुस्तके पोहचविली जातात. तसे काही प्रयत्न महाराष्ट्रातही झाले पाहिजेत. अलिकडे बिल गेट्स फाउंडेशनने भारतीय लोकांच्या वाचनसवयी वाढविण्यासाठी  सार्वजनिक ग्रंथालय चळवळीला ३२ कोटी रुपयांचे अर्थसाहाय्य केले आहे. पाच राज्यातील ६० जिल्ह्यांना  या योजनेचा लाभ मिळत आहे. महाराष्ट्रातल्या उद्योजकांनीही आपल्या कार्पोरेट रिझर्व्ह  फंडातून  (सीएसआर) वाचक चळवळीसाठी वित्त साहाय्य करायला पुढे यावे यासाठी त्यांना प्रवृत्त करणारी काही यंत्रणा निर्माण करता येईल का याचाही विचार करायला हवा.

मराठीच्या ग्रंथसंस्कृतीच्या विकासाच्या दृष्टीने या वर्षी काही सकारात्मक घटना घडल्या आहेत.  या वर्षी मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला आहे. केंद्र शासनाने उच्च शिक्षणाच्या क्षेत्रांत स्थानिक भाषांतून ज्ञानविज्ञानाचे शिक्षण घेता यावे यासाठी २२ भारतीय भाषांमध्ये पाठ्यपुस्तकांची निर्मिती करण्याचा प्रकल्प हाती घेतला आहे. मराठीतही अशी पुस्तके लिहून घेतली जात आहेत. महाराष्ट्र शासनाने यशवंतराव चव्हाण ग्रंथनिर्मिती आणि अनुवाद मंडळाची स्थापना करून मराठी भाषेत जागतिक ज्ञानप्रवाहातील संदर्भग्रंथांची निर्मिती करण्याचा संकल्प घोषित केला आहे. श्रीधर व्यंकटेश केतकर यांनी महाराष्ट्राचे बौद्धिक स्वातंत्र्य टिकविण्यासाठी ज्ञानकोश निर्मितीचा प्रकल्प हाती घेतला होता, त्याचे स्मरण जागविणारा हा कृतिकार्यक्रम आहे. महाराष्ट्राच्या वाचनसंस्कृतीची प्रगल्भता वाढण्याची ही सुचिन्हे आहेत.  आपण सर्वांनी यासाठी राज्य शासनाला शुभेच्छा दिल्या पाहिजेत!  त्यासोबत  राजा शिरगुप्पे आणि डॉ. पृथ्वीराज तौर यांनी 'एका ग्रंथालयाची गोष्ट' ह्या नाटकासाठी एक समूहगीत (कोरस) लिहिले आहे, ते  तरुण वाचकांसाठी एखाद्या प्रेरणास्त्रोत्रासारखे आहे, ते भरतवाक्य म्हणून येथे उद्धृत करीत आहे –

"आहे शिकायचे काही, वाचा पुस्तकं पुस्तकं
आहे घडवायचे काही, वाचा पुस्तकं पुस्तकं
आहे निर्मायाचे काही, वाचा पुस्तकं पुस्तकं
पुस्तक असते मित्र, पुस्तकच होते गुरू
पुस्तक सोबती असेल, तर समस्यांना पुरून
उरू"





# ज्ञानगंगा घरोघरी!
# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ

**प्रा. संजीव सोनवणे**
कुलगुरु, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

नव्या युगात शिक्षणाला व्यापक आणि सर्वसमावेशक रूप देणाऱ्या यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने (YCMOU) मागील ३६ वर्षांत महाराष्ट्राच्या शिक्षण क्षेत्रात अभूतपूर्व कामगिरी बजावली आहे. "ज्ञानगंगा घरोघरी" हे ब्रीद घेऊन सुरू झालेली ही शैक्षणिक चळवळ आज लाखो विद्यार्थ्यांसाठी आशेचा किरण ठरली आहे. पारंपरिक शिक्षणाच्या चौकटी पार करून, समाजातील शेवटच्या व्यक्तीपर्यंत शिक्षण पोहोचवण्याचा ध्यास घेतलेल्या या विद्यापीठाने डिजिटल शिक्षण, कौशल्याधारित अभ्यासक्रम, कृषीविज्ञानातील प्रयोगशील उपक्रम, तसेच राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरील सहकार्यांमुळे आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे.

शिक्षण हा अधिकार आहे, हक्क आहे आणि तो सर्वदूर पोहोचविण्यासाठी शासकीय पातळीवरून जे प्रयत्न केले जातात, त्यास एक प्रकारचे शैक्षणिक चळवळीचेच स्वरूप प्राप्त होते. समाजातला प्रत्येक घटक शैक्षणिकदृष्ट्या सुजाण करणे, ज्ञानवंत करणे यासाठीचे प्रयत्न कधी संपत नसतात. म्हणूनच शिक्षण चळवळ ही एक चिरंतन चळवळ आहे. या चळवळीला अधिक व्यापक करून प्रसंगी पारंपरिक चौकटींच्या पलिकडे जाऊन मुक्त शिक्षणाची नवी वैश्विक वहिवाट तयार करणारी एक महत्त्वाची दणकट यंत्रणा महाराष्ट्रात ३६ वर्षांपूर्वी विद्यापीठाच्या रूपाने उभी राहिली. त्या विद्यापीठाचे नाव - यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक... जागतिकीकरणाच्या उंबरठ्यावर महाराष्ट्राच्या शिक्षणक्षेत्राने कूस बदलली आणि समाजातील शिक्षणवंचित घटकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी महाराष्ट्र शासनाची 'ज्ञानगंगा घरोघरी' हे ब्रीदवाक्य असलेली मुक्त शिक्षणाची चळवळ सुरू झाली. 'एक प्रतिज्ञा असे आमुची ज्ञानाची साधना! चिरंतन ज्ञानाची साधना!' या ज्ञानपीठ पुरस्कार विजेते कवीवर्य कुसुमाग्रज यांनी लिहिलेल्या विद्यापीठ गीताला सार्थ ठरविण्यासाठी संस्थापक कुलगुरू आणि दूरस्थ शिक्षणाचे देशातील गाढे अभ्यासक, शिक्षणतज्ज्ञ डॉ. राम ताकवले यांनी १ जुलै १९८९ ला अस्तित्वात आलेल्या या विद्यापीठाला लोकविद्यापीठ बनविण्याकडे वाटचाल सुरू केली.

मुक्त शिक्षणाची चळवळ देशात खरं तर १९८२ मध्ये सुरू झाली. आंध्रप्रदेशात पहिले मुक्त विद्यापीठ स्थापन झाले. त्यानंतर १९८५ मध्ये 'इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ' नवी दिल्लीत, १९८७ मध्ये राजस्थान व बिहार राज्यात, आणि मग यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ १९८९ मध्ये महाराष्ट्रात. विद्यापीठाने आज सर्वच क्षेत्रात प्रगती साधून अद्यायावत बदल करून मार्गदर्शक, प्राध्यापक, विद्यार्थी या सर्वांच्या सहकार्याने आपले एक वेगळे आस्तित्व निर्माण केले आहे. अभ्यासकेंद्रे, पाठ्यपुस्तकांचा दर्जा, मूल्यमापन, गुणवत्ता, इ – लर्निंगची उपलब्धता, उत्तीर्ण होण्याचे प्रमाण, व्यवहारातील पारदर्शकता, समाजातील विशेष वंचित घटकांसाठी विशेष शिक्षणक्रम आणि शिक्षण प्रक्रियेला सहाय्यभूत अशी कार्यक्षम नवनवोन्मेषी व्यवस्था या बळावर आज साडेतीन दशकांनंतर विद्यापीठाने महाराष्ट्र कार्यक्षेत्र असतानाही देशात आणि विदेशातही एक वेगळी ओळख प्रस्थापित केली आहे. स्थापना झाली त्या वर्षी ३,७५७ विद्यार्थी होते आणि १५ शिक्षणक्रम होते. आज ही विद्यार्थी संख्या पाच लाखांवर गेली आहे. तब्बल १७६८ अभ्यासकेंद्रे आणि ११६ शिक्षणक्रम, अशी मोठी झेप घेणाऱ्या विद्यापीठाला नॅकचे 'अ' मानांकनही मिळाले, ही बाब विद्यापीठासाठी गौरवशाली आहे.

काम करता करता शिक्षण, शिक्षणापासून वंचितांना पुन्हा नव्याने शिक्षणाच्या प्रवाहात आणणे, प्रमाणपत्रापासून संशोधनापर्यंत शिक्षणप्रवाह, अध्ययनासाठी बहुमाध्यमाचा वापर, आवडी व सवडीनुसार स्वत:च्या गतीने शिक्षणक्रम पूर्ण करण्याची संधी, प्रमाणपत्र / पदवी / संशोधन पदव्या इतर विद्यापीठांच्या पदव्यांशी समकक्ष, अद्ययावत मूल्यमापन पद्धतीद्वारे परीक्षा आयोजन, आकाशवाणी, दूरदर्शन, दृक - श्राव्य चित्रफितीद्वारे घरबसल्या मार्गदर्शन, शिक्षणात अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग, अध्ययनाच्या संदर्भात लवचिक धोरण, पारंपरिक महाविद्यालयात शिकत असतांना मुक्त विद्यापीठातील शिक्षणक्रम शिकण्याची संधी असे एकाहून एक उपक्रम प्रस्थापित करून, प्रभावीपणाने अंमलबजावणी करत विद्यापीठाने आजवरची वाटचाल केली आहे. या वाटचालीत संस्थापक कुलगुरू प्रा. राम ताकवले व नंतरचे कुलगुरू डॉ. उत्तमराव भोईटे, प्राचार्य अशोक प्रधान, डॉ. बी. पी. साबळे, डॉ. राजन वेळूकर, डॉ. आर. कृष्णकुमार, डॉ. माणिकराव साळुंखे, प्रा. ई. वायुनंदन या सर्वांचा मोलाचा वाटा आहे. या साऱ्यांची प्रबळ इच्छाशक्ती व कर्तव्यनिष्ठतेमुळे विद्यापीठाला 'कॉमनवेल्थ ऑफ लर्निंग' या जागतिक संघटनेने 'अवार्ड ऑफ एक्सलन्स' पुरस्काराने दोन वेळा गौरविले आहे.

**शिक्षणाची गरज आणि गरजेचे शिक्षण**

शिक्षण ही समाजाची नितांत गरज आहेच, परंतु ती पूर्ण करताना समाजाच्या गरजेचेही शिक्षण कसे देता येईल, याचा मुक्त विद्यापीठाने नेहमीच विचार केला आहे. माननीय पंतप्रधान महोदयांच्या संकल्पनेतील नवा भारत घडविताना विविध कौशल्यांवर आधारित शिक्षणक्रमांची रचना करून गुणवान सुशिक्षित मनुष्यबळाची निर्मिती करणे हे विद्यापीठाचे कर्तव्यच आहे. त्यास सुसंगत असे निरनिराळे वैविध्यपूर्ण शिक्षणक्रम सुरू करण्यात आले आहेत. राज्याच्या कृषी क्षेत्रात सुधारणा करून फलोत्पादन क्षेत्रात महाराष्ट्र प्रथम क्रमांकावर ठेवण्यात मुक्त विद्यापीठाच्या कृषीविज्ञान केंद्राचे योगदान मोठे आहे. ३६ वर्षांपूर्वी लावलेल्या मुक्त शिक्षणक्रमाच्या रोपट्याचा आज वटवृक्ष झाला आहे याचा आनंद वाटतो. विशेष बाब म्हणजे महाराष्ट्रात चार कृषी विद्यापीठे असून देखील मुक्त विद्यापीठाच्या कृषीविज्ञान शाखेतून आजवर सुमारे तीन लाखाहून अधिक विद्यार्थ्यांनी शिक्षण घेतले असून त्यापैकी अनेक जण महाराष्ट्र शासनाच्या सेवेत, काही खाजगी सेवेत कार्यरत आहेत. काही विद्यार्थ्यांनी स्वत:चा व्यवसाय सुरू केला आहे. आज त्यातील सुमारे एक लाखाहून अधिक विद्यार्थी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून शेती व्यवसाय करत आहेत. कृषीविज्ञान प्रत्यक्ष शेतात नेऊन यशस्वी करण्यासाठी १९९४ मध्ये भारतीय कृषी अनुसंधान परिषद, नवी दिल्ली यांनी मुक्त विद्यापीठात कृषीविज्ञान केंद्राची स्थापना केली. कष्टकरी, शेतकरी, ग्रामीण युवक-युवतींना कृषीतंत्रज्ञानाचे अद्यावत व्यावसायिक प्रशिक्षण देणे हे सर्वात महत्त्वाचे कार्य या केंद्रामार्फत केले जाते. शेतकऱ्यांच्या मुलभूत गरजांचा आणि संबंधित प्रदेशातील हवामान, पिके, साधनसामग्री या बाबींचा बारकाईने विचार करून प्रशिक्षणाचे कार्यक्रम सातत्याने आयोजित केले जातात.



**स्वयंअध्ययनासाठी सक्षम यंत्रणा**

सलून कामगार, पोलिस कर्मचारी, तुरुंगातील कैदी, गृहिणी आणि इतर अनेक घटक शिक्षणापासून वंचित आहेत. विद्यापीठातील विद्यार्थ्यांची नोंदणी दरवर्षी वाढत आहे आणि दरवर्षी जवळजवळ सहा लाखापेक्षा जास्त विद्यार्थी विविध अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश घेतात. स्वयं अध्यन साहित्य (सेल्फ इंस्ट्रक्शनल मटेरियल ) विशिष्ट स्वरुपात विकसित केल्याने मुक्त आणि दूरस्थ शिक्षण पद्धतीतील अभ्यासाची सामग्री ही कोणत्याही मुक्त विद्यापीठाचा कणा आहे आणि यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाबाबत देखील हे खरे आहे. स्वयं अध्यन साहित्य किवा स्टडी मटेरियलची गुणवत्ता विविध घटकांना विचारात घेवून सुनिश्चित केली जाते. स्वयंअध्ययन साहित्याची निर्मिती अभ्यास केंद्रांवर काम करणारे अनुभवी शिक्षक तसेच इतर तज्ञांनी केलेली असते. प्रत्येक नोंदणीकृत विद्यार्थ्यांच्या घरापर्यंत स्वयं अध्ययन साहित्य पाठविण्यासाठी जलद वितरण यंत्रणा, शक्यतो रविवार किंवा शनिवारी अभ्यास केंद्रांवर तज्ञ सल्लागारांकडून विद्यार्थ्यांचे योग्य समुपदेशन, प्रश्न पत्रिकेचे ऑनलाइन वितरण, ऑनलाइन मूल्यांकन, विद्यार्थ्यांची त्यांच्या परीक्षेत चांगली कामगिरी आणि यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने विकसित केलेल्या अतिशय चांगल्या प्रशासकीय नेटवर्कमुळे विद्यापीठाने स्वत: चा ब्रँड स्थापित केला आहे. म्हणूनच समाजातील प्रत्येक वंचित समूहाचा संबंध या विद्यापीठाशी प्रस्थापित झाला असून इतर कोणत्याही विद्यापीठाच्या तुलनेत समाजातील जवळपास सर्वच घटकांची शिक्षणासाठी पहिली निवड म्हणजे यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ (YCMOU) ही असते.

**विविध विद्याशाखा आणि शिक्षणाच्या संधी**

विद्यार्थ्यांना आपल्या आवडीच्या क्षेत्रात करिअर करण्यासाठी विद्यापीठातील मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे, वाणिज्य व व्यवस्थापन, शिक्षणशास्त्र, निरंतर शिक्षण, आरोग्य विज्ञान, कृषीविज्ञान, संगणक, विज्ञान व तंत्रज्ञान, ऑनलाईन शिक्षण प्रणाली, बहुविद्याशाखा अभ्यास प्रशाला, व्यावसायिक शिक्षण व कौशल्य विकास प्रशाला, ग्रामीण विकास प्रशाला या विद्याशाखा आणि शैक्षणिक सेवा विभागाच्या अनेक कौशल्याधिष्ठीत शिक्षणक्रमांचे पर्याय मराठी बरोबरच हिंदी, इंग्रजी आणि उर्दू माध्यमातूनही उपलब्ध करून देण्यात आलेले आहेत. याशिवाय औद्योगिक क्षेत्रातील विविध संस्थांच्या सहकार्याने शिका व कमवा योजनेंतर्गत विद्यावेतन आणि नोकरीची संधी असलेले शिक्षणक्रम विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करून देण्यात आलेले आहेत. रोजगाराभिमुख अभ्यासक्रम, गुणवत्तापूर्ण अभ्यास साहित्य, महाराष्ट्रभर असणारी अभ्यास केंद्रे, कृषी विज्ञान केंद्र ही विद्यापीठाची आजवरच्या यशस्वी वाटचालीतील बलस्थाने आहेत.

**कृषी विज्ञान केंद्राचे उपक्रम**

महाराष्ट्रातील एकमेव पारंपरिक विद्यापीठ की ज्या विद्यापीठात कृषी विज्ञान केंद्र आहे. कृषी विज्ञान केंद्राद्वारे जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढीसाठी सुधारित व तंत्रज्ञानाचा प्रसार, ग्रामीण युवक युवतींसाठी रोजगाराभिमुख प्रशिक्षण तसेच जिल्ह्यातील कृषी विस्तार कर्मचाऱ्यांसाठी प्रशिक्षणे असे उपक्रम राबविले जातात.



याचबरोबर विद्यापीठ आवारात कृषी विज्ञान केंद्राने संपूर्ण परिसरात विविध फळबागांच्या लागवडी केल्या आहेत. याचबरोबर कृषी विज्ञान प्रक्षेत्रावर विविध उत्पादन व प्रात्यक्षिक युनिटची उभारणी केलेली आहे. यात अद्ययावत फळ रोपवाटीका, पशुपालन युनिट, मधमाशीपालन युनिट, मशरुम उत्पादन युनिट, माती व पाणी प्रयोगशाळा, जैविक घटक निर्मिती प्रयोगशाळा, सुधारीत यंत्रे प्रात्यक्षिके युनिट अशा विविध उपक्रमांचा समावेश आहे. विद्यापीठ आवारातील कृषी विज्ञान उपक्रमांतून वर्षभरात जवळपास 30 टन विविध फळांचे उत्पादन घेतले जाते. सुमारे 6 टन विविध जैविक घटकांचा, व 50 हजार रोपांचा शेतकऱ्यांना पुरवठा केला जातो. कृषी विज्ञान केंद्राच्या विविध उपक्रमांद्वारे जवळपास 20 हजार शेतकरी ग्रामीण, युवक, युवती व विस्तार कर्मचारी यांना प्रशिक्षित करण्यात येते. जानेवारी 2025 मध्ये कॉमनवेल्थ ऑफ लर्निंग व महाराष्ट्र ज्ञान मंडळाच्या (MKCL) सहकार्याने 'शेतकऱ्यांसाठी कृत्रिम बुद्धिमत्ता साक्षरता' हा ऑनलाईन अभ्यासक्रम सुरू करण्यात आला आहे. या अभ्यासक्रमासाठी 10 हजार शेतकऱ्यांनी नोंदणी केली आहे.

**नव्या शैक्षणिक धोरणाची प्रभावी अंमलबजावणी**

आज विद्यापीठाच्या नव्या वाटचालीमध्ये भारतात लागू झालेले नवे राष्ट्रीय शिक्षण धोरण मोठे पाठबळ देणारे आहे. देशाच्या






संपूर्ण शिक्षण व्यवस्थेची पुनर्रचना करणाऱ्या या धोरणाच्या तरतुदीनुसार दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षणाला मोठे स्थान देण्यात आले आहे. विद्यापीठाने सर्व अभ्यासक्रमांची रचना नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार (एन.ई.पी. २०२०) पूर्ण केली आहे आणि पदव्युत्तर पदवीसाठी या वर्षी अंमलबजावणी सुरू केली आहे. अकॅडमिक क्रेडिट बँकेमध्ये विद्यार्थ्यांना आपले श्रेयांक साठवता येणार आहेत. विद्यार्थ्यांच्या अकॅडमिक क्रेडिट बँकेत नोंदणी करण्यात यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ महाराष्ट्रात अव्वल स्थानावर आहेच, शिवाय देशपातळीवरही आघाडीवर आहे. त्यामुळे विद्यार्थी आपली पदवी अथवा पदव्युत्तर पदवी आपल्या सोयीप्रमाणे विषयांची निवड करून तसेच, निर्धारित कालावधीत पूर्ण करू शकणार आहेत. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार नियमित पदवी व पदव्युत्तर पदवीसाठी प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना आता विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक तत्वानुसार दुसरी पदवी व पदव्युत्तर पदवी घेता येईल. अशा सर्व विद्यार्थ्यांसाठी मुक्त विद्यापीठ ही सुविधा उपलब्ध करून देत आहे. नियमित पदवी, पदव्युत्तर पदवी करताना आता यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाची अन्य पदवी व पदव्युत्तर पदवीही विद्यार्थी पूर्ण करू शकतो.

**यशोक्स (YASHOEX) अध्ययन व्यवस्थापन प्रणाली (Learning management system)**

"यशोक्स" या अध्ययन व्यवस्थापन पध्दतीद्वारे विद्यापीठ लवकरच ऑनलाईन पदविका प्रमाणपत्र अभ्यासक्रम, पदवी, पदव्युत्तर पदवी श्रेयांक पद्धतीने सुरू करणार आहे. ही एक 'जेथे आहात, जसे आहात, जेव्हा आहात, त्याच स्थितीत शिकणाऱ्याच्या व शिकण्याच्या वेगाप्रमाणे ऑनलाईन उच्चशिक्षण घेण्याची सुविधा आहे. तंत्रज्ञानावर आधारित समृद्ध विषयज्ञान व रोजगार कौशल्ये प्रत्येक विद्यार्थ्यामध्ये विकसित करण्याचे उद्दिष्ट ठेवून, हे सर्व ऑनलाईन अभ्यासक्रम उपलब्ध करून दिले जाणार आहेत. यशोक्स प्रणालीवर सायबर सुरक्षा, मूल्य शिक्षण ई. अभ्यासक्रम सुरु झाले आहेत. "भारतीय ज्ञान परंपरा" हा दोन श्रेयांकाचा ऑनलाईन अभ्यासक्रम आगामी शैक्षणिक वर्षापासून सर्व महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिला जाणार आहे.

**बौद्धिक स्वामित्व हक्काची चळवळ**

भारतीयांमध्ये असलेली बुद्धी-वैभवाची परंपरा फार मोठी आहे. अनेक सामान्य शेतकरी, कामगार, गृहिणी हे नवनवी कल्पना मांडतात. त्यांच्याच स्तरावर या नवीन कल्पना समाजोपयोगी पडण्यासाठी व्यवहारिक पातळीवर धडपड करत असतात. परंतु, त्यांच्याकडे त्यांच्या स्वतःच्या संकल्पनेचा स्वामित्वहक्क (पेटंट) नसतो आणि याची त्यांना कल्पनाही नसते. आपल्या एकूण व्यवस्थेत स्वामित्व हक्काबाबत फारशी माहिती व आस्था नाही. त्याबाबतचे गांभीर्यही नाही. यासाठी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ या संदर्भात स्वामित्व हक्क अर्थात पेटंट मिळविण्याच्या संदर्भातील चळवळ उभी करत आहे. त्यासंदर्भात आर्थिक पाठबळ, जनजागृती, समज-गैरसमज, त्याबाबतचे प्रस्ताव, नोंदणी, प्रमाणपत्र या पातळीवर उपाययोजना करून पेटंट मिळविण्याच्या दृष्टीने व्यासपीठ उपलब्ध करून दिले जाईल आणि भारतीयांच्या ज्ञानाचे हक्क अबाधित करण्याचे कार्य विद्यापीठाच्या माध्यमातून तडीस नेण्याचा मानस आहे.

**भारतीय ज्ञान परंपरांचा अभ्यास**

समृद्ध अशा भारतीय स्थापत्य कला, नृत्य कला, संगीत, नाटक, योग, आयुर्वेद, साहित्य, लोकपरंपरा या सर्व प्राचीन, अर्वाचीन अशा ज्ञानपरंपरांचा अभ्यास करण्याच्या दृष्टीने विद्यापीठ मोठ्या प्रमाणावर प्रकल्प हाती घेत आहे. अभ्यासक्रमांची आखणी करून संशोधन केंद्राच्या माध्यमातून हा प्रकल्प राबविला जाईल. तसेच, मराठी भाषेत उपलब्ध नसलेले साहित्य अनुवाद केंद्राच्या माध्यमातून अनुवादित करून उपलब्ध करून दिले जाईल. यासोबतच मराठी भाषेतील साहित्यही इतर भाषांमध्ये उपलब्ध करून देण्याचा प्रकल्पदेखील विद्यापीठ हाती घेत आहे.

**प्रा. राम ताकवले संशोधन केंद्र**

मुक्त विद्यापीठाने प्रथम कुलगुरू प्रा. राम ताकवले यांच्या नावाने संशोधन केंद्र सुरू केले आहे. तंत्रज्ञानाद्वारे ज्ञानविस्तार, सामाजिक प्रश्नांच्या संभाव्य उत्तरांसाठी 'संशोधन व नवोपक्रम' या संशोधनाच्या धोरणातून संशोधन कार्यातही आघाडीवर राहण्याचा विद्यापीठाचा मानस आहे. यासाठी संशोधकांना संशोधन कार्याकरिता निधी व छात्रवृत्ती उपलब्ध करून दिला आहे व 39 संशोधक आपले संशोधन प्रकल्प पूर्ण करत आहेत.

**औद्योगिक क्षेत्राशी साहचर्य**

उत्पादन व सेवा क्षेत्रातील उद्योग तसेच, सामाजिक संस्था यांच्याबरोबरचे सहकार्य वाढवून त्यांच्या आवश्यकतेनुसार अभ्यासक्रमांची निर्मिती करण्याचा विद्यापीठाचा मानस आहे. या माध्यमातून रोजगारनिर्मिती व कुशल, ज्ञानी मनुष्यबळ नक्कीच उपलब्ध होईल. या संबंधतील काही करारदेखील करण्यात आले आहेत. उदाहरणार्थ वाढवण बंदर विकासाच्या राष्ट्रीय कार्यक्रमात मुक्त विद्यापीठाने सहभाग नोंदवताना जवाहरलाल नेहरू पोर्ट ऑथोरीटी (JNPA) या संस्थेशी सामंजस्य करार करून त्यांना आवश्यक असलेल्या मनुष्यबळाला आवश्यक त्या ज्ञानतंत्रज्ञानाचे कौशल्याधिष्ठित शिक्षण देण्यासाठी प्रकल्पाची आखणीही केली आहे. यासंदर्भातील अंमलबजावणी लवकरच सुरूही होत आहे. अशाच विविध महत्त्वाच्या संस्थांसोबत या पद्धतीचे साहचर्य पुढील काळात व्यापक होत जाईल. नव्याने व्यवसाय सुरू करणाऱ्यांना सहाय्य करण्यासाठी नवोपक्रम, नवउद्योजक संचालनालय विद्यापीठ स्तरावर सुरू करण्यात आले आहे. व्यवसाय सुरु करण्यासाठी प्रकल्प अहवाल, वित्त उपलब्धता, तंत्रज्ञानाची उपलब्धता, विक्री सहाय्य या सर्व बाबींसाठी संपूर्ण मार्गदर्शन हे केंद्र नवउद्योजकांना मार्गदर्शक ठरणार आहे.



**काही महत्त्वाचे औद्योगिक क्षेत्राशी केलेले सामंजस्य करार:**

- जवाहरलाल नेहरु पोर्ट ट्रस्ट, न्हावासेवा – बंदरसंबंधीत कौशल्य विकास अभ्यासक्रम निर्मिती व अंमलबजावणी
- सायकॉपस, पुणे – सायबर गुन्हे अन्वेषण प्रमाणपत्र व पदविका अभ्यासक्रम
- कॉमनवेल्थ एज्युकेशन इंडिया केंद्र, नवी दिल्ली – शेतकरी कृत्रिम बुध्दिमत्ता साक्षरता ऑनलाईन अभ्यासक्रम
- महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रिज, मुंबई – इंटर्नशिप प्रोग्रॅम 28000 सदस्य उद्योगामध्ये उपलब्धता
- इंडिग्राम लॅब फाउंडेशन, नवी दिल्ली – स्टार्टअप व एंटरप्रेन्योरशिप संवर्धन व गुंतवणूक
- बि.व्ही.जी. इंडिया लि. – सेवा सुविधा क्षेत्रासाठी मनुष्यबळ निर्मिती अभ्यासक्रम
- पॉवरकॉन लि. – विंडामिल व्यवस्थापन व दुरुस्ती कौशल्य प्रमाणपत्र अभ्यासक्रम

**विद्यापीठाचे आंतरराष्ट्रीय कार्य**

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ आता आंतरराष्ट्रीय स्तरावर आपले योगदान देण्यासाठी सज्ज झाले आहे. विद्यापीठाने पुढील काळात विदेशातील नावाजलेल्या विद्यापीठांसमवेत अभ्यासक्रम निर्मिती आणि संशोधन प्रकल्प हाती घेण्याचा निश्चय केला आहे. याचाच एक भाग म्हणून संवाद प्रक्रियाही सुरू झाली आहे. नॉर्वेमधील 'युनिवर्सिटी ऑफ साऊथ इस्टर्न' या विद्यापीठासोबत ज्ञानात्मक आदान-प्रदान सुरू आहे.. ही एका नव्या पर्वाची सुरुवात आहे.

**आगामी काळाकडे वाटचाल करताना...**

जग झपाट्याने बदलत आहे. पदवी, पदव्युत्तर पदवीच्या पलिकडे जाऊन संशोधनात्मक, कौशल्याधिष्ठित ज्ञानशिक्षणाच्या जाणिवा जाग्या करणे आणि त्यानुसार पुढील दशकासाठी महामार्ग तयार करणे ही विद्यापीठांची जबाबदारीच आहे. ते भान ठेवून यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने आगामी संकल्पनांची आखणी केली आहे. एवढेच नव्हे, तर त्यावर कामही सुरू केले आहे. सन २०२५-३५ मध्ये या कालावधीत विद्यापीठ कुठे असेल, हे लक्षात घेऊन, हा दूरदृष्टी आराखडा तयार करण्यात आला आहे. त्यात पुढील गोष्टींचा अंतर्भाव असेल.

**१. शैक्षणिक दर्जा आणि डिजिटल शिक्षण :** आगामी काळाची पावलं पहाता शैक्षणिक दर्जा आणि गुणवत्ता ही अधिक व्यापक करण्याचा आणि त्याकरिता डिजीटल माध्यमांचा प्रभावी वापर करण्याचा मानस आहे. या अंतर्गत राष्ट्रीय शिक्षण धोरण (NEP) २०२० अनुसार अभ्यासक्रमांची रचना असेल. बहुविद्याशाखीय शिक्षण, अनुभवाधिष्ठित शिक्षण आणि कौशल्य विकासाभिमुखता यांना प्राधान्यक्रम असेल. पदवी आणि पदव्युत्तर पदवी यात बहुपर्यायी प्रवेश आणि निर्गमनाची सोय असेल. ऑनलाईन

शिक्षण कार्यक्रम, ई-सामग्री तयार करणे, कृत्रिम बुध्दिमत्ता (ए.आय.) आधारित शिक्षण साधने आणि आभासी (व्हर्चुअल) प्रयोगशाळा तयार केल्या जातील. डिजिटल शिक्षण पुढे नेण्यासाठी “स्कूल ऑफ इमर्जिंग टेक्नॉलॉजीज” आणि ए.आय. अशी शैक्षणिक अध्यासने स्थापन करण्याचा निर्धार आहे.

**२. शिक्षणबाह्य घटकांचा सहभाग आणि संज्ञापनविस्तार :** वंचित भागातील प्रादेशिक शिक्षण केंद्रांना पाठबळ देणे, ग्रामीण आणि आदिवासी विद्यार्थ्यांना सेवा देण्यासाठी स्थानिक भाषांमध्ये संदर्भित शिक्षण साहित्य विकसित करणे, अतिदुर्गम भागातील विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती आणि आर्थिक मदत कार्यक्रम राबविणे, कौशल्य-आधारित कार्यक्रम तयार करण्यासाठी ग्रामपंचायती, स्वयंसेवी संस्था आणि सरकारी संस्थांना सामावून घेणे यासाठी विद्यापीठ हा ज्ञान आणि शिक्षणविस्ताराचा उपक्रम विविध माध्यमांच्या सहभागातून आगामी दशकात राबविणार आहे. बंदीवान (7216), नक्षलग्रस्त भागातील 07 पोलीस स्टेशन क्षेत्रातील विद्यार्थी (7822) तृतिय पंथी, दृष्टीहीन, अनाथ विद्यार्थी यांना शैक्षणिक शुल्क न घेता शिक्षणाची संधी दिली जाते.

**३. उद्योगक्षेत्राशी सामंजस्य करार आणि रोजगारक्षमतेवर भर :** कौशल्य-आधारित शिक्षण आणि नोकरीच्या प्लेसमेंटसाठी उद्योग आणि शिक्षण क्षेत्राला हातात हात गुंफून चालावे लागणार आहे. त्यासाठी एक प्रकारची शैक्षणिक-उद्योग भागीदारीच निर्माण करावी लागणार आहे. इंटर्नशिप, अप्रेंटिसशिप आणि स्टार्टअप, इनक्युबेशन सपोर्ट यासह करिअर कौन्सिलिंग, प्लेसमेंट सेल आणि माजी विद्यार्थ्यांचे नेटवर्क वाढवणे हे या धोरणात समाविष्ट आहे. उद्योगगामी विशिष्ट शैक्षणिक कार्यक्रम तयार करण्याचा करण्याचा मानस आहे. उदाहरणार्थ लॉजिस्टिक्स, आरोग्यसेवा, आयटी आणि कृषी या क्षेत्रांमधील सुधारित कार्यक्रमांकडे विद्यापीठ प्राधान्याने लक्ष देणार आहे.

**४. संशोधन आणि नवोपक्रम :** आगामी दशकात संशोधन आणि नवोपक्रमांवर भर देण्याचा विद्यापीठाचा निर्धार आहे. त्याकरिता ‘यश सेंटर फॉर इनोव्हेशन, इनक्युबेशन आणि लिंकेजेस (YCIIL)’ स्थापन करून आंतरविद्याशाखीय संशोधन आणि बौद्धिक संपदा यावर भर दिला जाईल. विविध ठिकाणी अत्याधुनिक संशोधन प्रयोगशाळा आणि नवोपक्रम केंद्रे स्थापन करण्यास प्राधान्य दिले जाईल. प्राध्यापकांना व विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देतानाच स्टार्टअप्ससाठी पाठबळ आणि अर्थसहाय्याकरिता मार्गदर्शन केले जाईल.

**५. ई-प्रशासन, पायाभूत सुविधा आणि गुणवत्ता हमी :** शैक्षणिक आणि प्रशासकीय प्रक्रियांच्या ऑटोमेशनसाठी ERP लागू करणे, भौतिक आणि डिजिटल पायाभूत सुविधा (ग्रंथालये, वर्गखोल्या, डिजिटल शिक्षणासाठी जागा) यात आधुनिकीकरण करणे, संशोधन आणि प्राध्यापक प्रशिक्षणासाठी दर्जेदार केंद्रे स्थापन करणे, NAAC ची उच्च श्रेणी प्राप्त करणे, आंतरराष्ट्रीय सहकार्य आणि मान्यता मिळविण्यासाठी प्रयत्न करणे, ही विद्यापीठाची आगामी काळातील अजून काही महत्त्वाची ध्येय व धोरणे आहेत.

विद्यापीठाने पदवी प्रमाणपत्रे देतांना आधुनिक तंत्रज्ञानाधारित ब्लॉकचेन टेक्नॉलॉजीचा अवलंब केला आहे. त्यामुळे खोटी प्रमाण पत्रे तयार करता येणार नाहीत.

### भविष्यवेधी उपक्रमांचे नियोजन

इ.स. २०३५ पर्यंत अपेक्षित ध्येयपूर्ती :

विद्यार्थ्यांची नोंदणी ५ लाखांवरून ११ लाखांपर्यंत वाढवणे, विद्यापीठाची विद्यमान विभागीय ८ केंद्रे ही १५ पर्यंत नेणे आणि अभ्यास केंद्रांची संख्या १,७६८ वरून ३,००० पर्यंत वाढविणे ही प्रमुख ध्येये २०३५ पर्यंत मुक्त विद्यापीठाने पूर्ण केलेली असतील. २७ पेक्षा अधिक MOOCs, AI-Powered ऑनलाइन पदवी कार्यक्रम सुरू करणे, हेही ध्येय गाठायचे आहे. ग्रामीण आणि शहरी विद्यार्थ्यांसाठी कौशल्य-आधारित शिक्षणाच्या सोयी करून त्यांना रोजगारक्षम करण्याचे ध्येय आहे. आंतरराष्ट्रीय सहकार्यातून परदेशी अभ्यास केंद्रांची स्थापना करणे हे विद्यापीठाचे स्वप्न आहे. त्या दृष्टीने वाटचाल सुरू करण्यात आली आहे.

### व्यावसायिक शिक्षण व कौशल्य विकास

विकसित भारत 2047 अंतर्गत राष्ट्रनिर्माणाच्या महत्त्वपूर्ण उपक्रमांमध्ये बंदर विकास विशेष उल्लेख म्हणजे वाढवन बंदर, पालघर 2030 पर्यंत उभारण्याचे नियोजित केले आहे. हे बंदर जे.एन.पी.अे. विकसित करत आहे. विद्यापीठाने जे.एन.पी.अे. सोबत या बंदराच्या उभारणीसाठी तसेच पुढे कामकाज करण्यासाठी लागणाऱ्या मनुष्यबळाच्या प्रशिक्षणासाठी सामंजस्य करार केला आहे. या सामंजस्य करारानुसार विद्यापीठ वाढवण पालघर व लोक विकास नाव्हासेवा येथे बंदर संबंधीत कौशल्य विकास केंद्र स्थापन करत आहे. बंदर विकास प्राकिरणामध्ये आतापर्यंत 19 अभ्याक्रमांची यादी प्रथम टप्प्यात सुरू करण्याविषयी निश्चित केली आहे. यापैकी 17 अभ्यासक्रमांची निर्मिती प्रक्रिया सुरू असुन मे 2025 पासून कौशल्य विकास प्रशिक्षणास सुरुवात होत आहे. पुढील तीन वर्षात किमान 1 लाख मनुष्यबळास प्रशिक्षण देऊन बंदरात कामकाजात सामावुन घेण्याच्या पहिल्या टप्प्याचे नियोजन आहे. या उपक्रमासाठी विद्यापीठाने व्यावसायिक शिक्षण व कौशल्य विकास प्रशाला स्थापन केली असुन राष्ट्रीय व्यावसायिक प्रशिक्षण परिषद (NCTVT) यांची मान्यता विद्यापीठाने प्राप्त केली आहे.

### सौदी - अर्थ मुव्हिंग मनुष्यबळ व्यवस्थापन उपक्रम

जगभरामध्ये सौदी अरेबिया विकास कामात मोठे उपक्रम हाती घेत आहेत व मोठे प्रकल्प नियोजित केले आहे. या कामांसाठी अर्थ मुव्हिंग व्यवस्थापक, अर्थ मुव्हिंग इक्विपमेंट ऑपरेटर, दुरुस्ती यांची मोठी मागणी आहे. या संधीचा विचार करून विद्यापीठाने व्यावसायिक शिक्षण व कौशल्य विकास प्रशालेअंतर्गत महायान ग्लोबल सर्व्हीसेस ली. या उद्योगाबरोबर सामंजस्य करार केला आहे. महायान ग्लोबल सर्व्हीसेस ली. हे या उपक्रमात 25 वर्षापासून यशस्वी उद्योग देशात व काही बाहेरील देशात करत आहेत. अर्थ मुव्हिंग क्षेत्रात जगभरात मोठ्या प्रमाणात कुशल मनुष्यबळाची तीव्र आवश्यकता लक्षात घेता या उद्योग समुहाबरोबर सामंजस्य करार करण्यात आला असून, सन -2025 2026 मध्ये किमान 5000 अर्थ मुव्हिंग क्षेत्रातील कुशल मनुष्यबळ निर्माण करून सौदी क्षेत्रासाठी उपलब्ध करून देण्यात येत आहे. अर्थ मुव्हिंग क्षेत्रातील तंत्रज्ञान व कौशल्याबरोबर अरबी भाषा, अरबी संस्कृती इ. बाबींचा सुध्दा प्रशिक्षणामध्ये समावेश केला आहे.

### कुंभमेळा स्वयंसेवक प्रशिक्षण उपक्रम

नाशिक हे कुंभमेळ्याचे तिर्थस्थान असल्याने 2026 पासून कुंभमेळा पर्व नाशिक येथे होणार असल्याने येणाऱ्या भाविकांना विविध सेवा देण्याचे नियोजन शासन स्तरावर व स्थानिक संस्थांनी केले आहे. यासाठी आवश्यकता असणाऱ्या स्वयंसेवकांना प्रशिक्षित करण्यासाठीचा अभ्यासक्रम तयार करण्यात आला असुन, यासाठी सुध्दा विद्यापीठाने जॉगर्स अॅकॅडमी, नाशिक बरोबर सामंजस्य करार केला असुन, सुमारे 5000 महाविद्यालयीन युवकांना हे प्रशिक्षण दिले जाणार आहे. या विधींची वेळापत्रकासह माहिती, स्वयंसेवकांच्या कर्तव्य व जबाबदाऱ्या तसेच वर्तन, आपातग्रस्त स्थिती प्रतिबंधक उपाय व स्थिती निर्माण झाल्यास उपाययोजना ई. सविस्तर कृतीद्वारे प्रशिक्षीत करण्याची योजना आखण्यात आली आहे. सदर प्रशिक्षणाची हस्तपुस्तिका, कृती पत्रिका तयार करण्याचे काम प्रगती पथावर आहे.

### महाराष्ट्राच्या उच्च शिक्षणासाठीचा भविष्यवेधी उपक्रम - महास्वयम

“महास्वयम” हा महाराष्ट्र राज्याच्या उच्च शिक्षण विभागाने राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 च्या धोरणातील महत्त्वाची तत्त्वे, संधी, समानता व गुणवत्ता यावर आधारीत ऑनलाईन उच्च शिक्षणाचा उपक्रम सुरू केला आहे.

### महास्वयम ऑनलाईन उपक्रमाचे मुख्य उद्दिष्टे अशी :

- उत्तम इ - अध्ययन साहित्य निर्माण करणे.
- गुणवत्तापूर्ण इ - समंत्रणाची सुविधा निर्माण करणे.
- सर्व विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीच्या व व्यावसायिक गरजेप्रमाणे निवडलेल्या विषयांचा अभ्यास सहज सोपा करण्याच्या दृष्टीने अध्ययन व्यवस्थापन ऑनलाईन व्यासपीठाद्वारे उपलब्ध करून देणे.
- महाराष्ट्रातील अध्यापकांचा राष्ट्रीय स्तराव रील “स्वयम” उपक्रमाअंतर्गत अभ्यासक्रम देशभर उपलब्ध करून देण्याचा वाटा वाढविणे.

महाराष्ट्रातील उच्च शिक्षण संस्थांमधील अध्यापकांना ई-आशय निर्मितीचे प्रशिक्षण देऊन त्यांना ई-आशय निर्मितीतज्ञ म्हणून विकसित करणे.

यासाठी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने पुढाकार घेऊन महाराष्ट्रातील सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, मुंबई विद्यापीठ, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, एस.एन.डी.टी. विद्यापीठ, मुंबई या विद्यापीठांना एकत्र करून महासंघ केला आहे व तसा सामंजस्य करार उच्च शिक्षण विभागासह केला आहे.

या उपक्रमांतर्गत विद्यापीठाने इतर विद्यापीठांच्या सहकार्याने “भारतीय ज्ञान परंपरा” हा 2 श्रेयांकांचा अभ्यासक्रम ऑनलाईन पध्दतीने विकसित केला असून, दिनांक 15 एप्रिल 2025 रोजी मा. मुख्यमंत्र्यांच्या 100 दिवसीय निश्चिती कृती कार्यक्रमाअंतर्गत महाराष्ट्रातील सर्व उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करून देण्यात येत आहे.

### डिजीटल विद्यापीठामध्ये विद्यापीठाचे उन्नयन करणे

“ज्ञानगंगा घरोघरी” हे ब्रिद वाक्य घेऊन विद्यापीठ आजपर्यंत 35 वर्ष वाटचाल करत असताना दूरस्थ व मुक्त मार्गाने शिक्षण वंचितांपर्यत पोहचवले. आता डिजीटल तंत्रज्ञानामध्ये झालेला विकास पाहता ऑनलाईन शिक्षणाचे पर्व अवतरले आहे. त्याप्रमाणे विद्यापीठाने डिजीटल शिक्षण प्रशाला स्थापन केली असून, ऑनलाईन अध्यापक विद्यापीठाच्या “यशोक्स” अध्ययन व्यवस्थापन प्रणालीद्वारे सुरू केले आहेत. विद्यापीठाच्या ऑनलाईन शिक्षणाचे उन्नयन करून डिजीटल विद्यापीठात विद्यापीठाचे रुपांतर करत आहे. त्यामुळे व्हरच्युअल प्रयोगशाळा निर्मिती, कौशल्य प्रशिक्षणासाठी सिमुलेशन व्यवस्था तसेच ऑगमेंटेड रिअॅलिटी, व्हरच्युअल रिअॅलिटी,आर्टिफिशियल रिअॅलिटी या तंत्रज्ञानावर आधारित अभ्यासक्रम तसेच कौशल्य विकासाचे उद्धिष्टे समोर ठेऊन विद्यापीठाचे अभ्यासक्रम जगभर पोहचविण्याचे धेय्य आहे.

शेवटी, हेच की यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ आगामी काळातही मुक्त आणि दूरस्थ शिक्षणात आघाडीवर राहणार आहे. शिक्षण अधिक सुलभ, डिजिटल आणि उद्योगाभिमुख करण्याचे ध्येय आणि त्याचबरोबर गुणवत्तेसह नावीन्याचा अंतर्भाव या गुणवैशिष्ट्यांसह पुढील दशकाच्या दमदार वाटचालीसाठी सज्ज आहे.

मुक्त विद्यापीठ आता ३६ वा वर्धापनदिन साजरा करताना राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या यशस्वी अंमलबजावणीसाठी संपूर्ण तयारीनिशी सज्ज आहे. त्याबरोबरच तंत्रस्नेही उपक्रमांद्वारे महाराष्ट्रभर असलेल्या केंद्रांच्या माध्यमातून मुक्त विद्यापीठ तंत्रज्ञानाच्या व्यापक वापराच्या दृष्टीने पावले टाकत आहे. महाराष्ट्रभर अभ्यासकेंद्र असलेली महाविद्यालये, तसेच आजी-माजी विद्यार्थी, सर्व सेवक यांच्या सहाय्याने उच्चशिक्षणाद्वारे महाराष्ट्रातील विविध समाजघटकांचे जीवनमान उंचावण्यासाठी मुक्त विद्यापीठ कटिबद्ध आहे. ज्ञान, कौशल्य आणि मूल्ये यावर आधारित कार्याद्वारे आपला देश या विश्वात एक महाशक्ती म्हणून प्रस्थापित होण्याची महत्त्वाकांक्षा बाळगून त्या अनुषंगाने भरीव योगदान देण्याचा विद्यापीठाचा निर्धार आहे.



# नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०20 आणि विकसित भारताचा पाया

**-प्रा. (डॉ.) नितीन करमळकर**
मा. माजी कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

मेकॉलेने भारतात सुरू केलेल्या ब्रिटिश कालीन शिक्षण पध्दतीत आमूलाग्र बदल घडवण्यासाठी नवे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० सालात अस्तीत्वात आले. या धोरणाची उद्दीष्टे कोणती आणि त्यामुळे विकसित भारत निर्माण करण्यासाठी कशी मदत होणार आहेत हे सांगणारा या धोरणाच्या सुकाणू समितीचे अध्यक्ष प्रा. डॉ. नितीन करमळकर यांचा हा लेख

राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 सालात अस्तीत्वात आले ते नव्या युगासाठी भारतीय युवकांना सक्षम आणि कौशल्यवान बनविण्याच्या हेतूने. विकसनशील भारताला विकसित भारतामध्ये परावर्तित करण्यासाठी साधनसंपत्तीचा विकास करणे, उत्पादन क्षेत्राला गती देणे आणि कौशल्यावर आधारित पिढी तयार करणे ही नवीन शैक्षणिक धोरणाची काही महत्त्वाची उद्दिष्टे आहेत. भारतात ब्रिटिश राज्यकर्ते आणि आम जनता यांच्यात पूल म्हणून काम करणारा एक इंग्रजाळलेला भारतीय वर्ग तयार करण्यासाठी १८३५ सालात मेकॉलेने जी शिक्षणपद्धती अस्तीत्वात आणली तीच आपण आजतागायत वापरत होतो. या शिक्षणपद्धतीत आमूलाग्र असे बदल करणाऱ्या नवीन धोरणासंबंधी विचारांची सुरुवात साधारणपणे २०१४ साली झाली. अस्तित्वात असणाऱ्या शिक्षण प्रणालीतील त्रुटींचा अभ्यास करून अहवाल सादर करण्यासाठी निवृत्त सचिव श्री सुब्रमण्यम यांच्या अध्यक्षतेखाली समितीचे गठन करण्यात आले. या समितीने आपला अहवाल २०१७ साली राष्ट्रीय शिक्षण मंत्रालयाला सुपूर्त केला. या अहवालावर काम करण्यासाठी आणि नवीन धोरणाचा आराखडा ठरवण्यासाठी इस्रो संस्थेचे निवृत्त प्रमुख डॉ. कस्तुरीरंगन यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली. या समितीने अनेक संवाद आणि बैठका यांच्या माध्यमातून नवीन शैक्षणिक धोरणाचा आराखडा ठरवला आणि दोन हजार एकोणीस साली राष्ट्रीय शिक्षण मंत्रालयाला सादर केला. मंत्रालयाने हा आराखडा सार्वजनिक करून त्यावर समाजातून सूचना मागविल्या. जवळजवळ एक लाख सूचना प्राप्त झाल्या व त्यातील अनेक सूचनांचा अंतर्भाव धोरणामध्ये करण्यात आला. मंत्रिमंडळाने हे धोरण २०२० साली स्वीकारले आणि राष्ट्रीय पातळीवर अंमलबजावणीसाठी खुले केले. महाराष्ट्रामध्ये या धोरणाच्या अंमलबजावणीसाठी सुकाणू समितीची स्थापना त्या वेळचे महामहीम राज्यपाल यांनी डिसेंबर २०२०मध्ये केली. सुकाणू समितीने वेळोवेळी बैठकांच्या माध्यमातून महत्त्वाच्या भागधारकांशी म्हणजेच कुलगुरू, कुलसचिव, अधिष्ठाता, प्राचार्य, शिक्षक या सर्वांशी चर्चा केली व अंमलबजावणीसाठी आराखड्याचे प्रारूप ठरवले. शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये १५०महाविद्यालयातून या धोरणाची अंमलबजावणी सुरू झाली. 'बहुशाखिय शिक्षण' हा या नवीन धोरणाचा आत्मा आहे. त्याचप्रमाणे कौशल्यावर आधारित शिक्षण, ऑन जॉब ट्रेनिंग, इंटर्नशिप, भारतीय ज्ञानसंपदा, मूल्याधिष्ठित शिक्षण, मातृभाषेतून शिक्षण ही देखील या धोरणाची वैशिष्ट्ये आहेत.

'शिक्षण द्या, प्रोत्साहन द्या आणि प्रबोधन करा' ही या धोरणाची त्रिसूत्री आहे. पदवी आणि पदव्युत्तर शिक्षणामध्ये लवचिकता आणणे, बहुविध प्रवेशाच्या शक्यता देऊ करणे आणि श्रेयांकीकरण करणे (क्रेडिट सिस्टीम) इत्यादी या धोरणाची ठळक वैशिष्ट्य आहेत. कोरोनाच्या काळात आपण पाहिले की जवळजवळ एक कोटी विद्यार्थी शिक्षणक्षेत्रातून कायमचे बाहेर फेकले गेले. काहींनी आपले पालक गमावले,काहींच्या पालकांची नोकरी गेली तर काही विद्यार्थ्यांच्या घरात ऑनलाईन शिक्षणासाठी आवश्यक असलेलूया सोई सुविधांचा अभाव होता. अश्या अनेक कारणांमुळे विद्यार्थ्यांना शिक्षण सोडावे लागले. या सर्व गोष्टींचा विचार करून नवीन शैक्षणिक धोरणात प्रवेश आणि निकासाच्या एकाहून अधिक शक्यतांची (मल्टिपल एन्ट्री आणि एक्झिट) सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. विद्यार्थ्यांना काही अडचणींमुळे शिक्षण सोडावे लागले तरी या सुविधेमुळे त्यांना पुन्हा शिक्षण प्रवाहात परत येण्याची संधी उपलब्ध असते. तुकड्यांमध्ये विखुरलेल्या शैक्षणिक अधिवासामुळे सज्ञानात्मक कौशल्य विकास आणि अध्ययन निष्पत्ती याकडे झालेले दुर्लक्ष या यापूर्वी अस्तित्वात असलेल्या धोरणातील काही महत्त्वपूर्ण त्रुटी आहेत. विषयांच्या कप्पेबंद विभागणीमुळे अभ्यासकाच्या ज्ञानात संकीर्णता येत असे. समानता आणि सर्वसमावेशकतेचा अभाव, माहिती तंत्रज्ञान आणि शिक्षण यांच्यातील एकरुपतेचा अभाव, व्यावसायिक शिक्षणाचा अभाव या देखील त्रुटीं या धोरणात होत्या. त्यांचा विचार करून त्यावर विस्तृत मार्ग शोधण्याचा प्रयत्न करणे हे नवीन शैक्षणिक धोरण २०२० चे महत्त्वाचे अंग आहे. नव्या धोरणातून गुणात्मक परिवर्तनाचे प्रयत्न सुरू करण्यात आले आहेत. एकविसाव्या शतकातील हे पहिले धोरण आहे. जागतिक ज्ञानाधिष्ठित अर्थव्यवस्था होण्याच्या दृष्टीने चाललेल्या वाटचालीस बळ देणारी आणि शाश्वत विकास ध्येय प्राप्त करण्यासाठी सशक्त बनविणारी व्यवस्था उभी करणे हे या धोरणाचे एक महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. या धोरणांत शैक्षणिक व्यवस्था व संस्था याकरिता मूलभूत तत्त्वे निश्चित करण्यात आली आहेत. सर्जनशील आणि चिकित्सक विचार, संभाषण कला, सहकार्य, सहवेदना आणि आत्मविश्वास जोपासणे यांना हे धोरण चालना देते. तसेच भारतीय मूल्य जपणाऱ्या अभ्यासक्रमाची निर्मिती, मूलभूत कर्तव्याची जाणीव करून देणारे, संविधानिक मूल्य आणि भारतीय मातीचा गंध असलेले राष्ट्र अभिमान जोपासणारे शिक्षण हे या धोरणाचे वैशिष्ट्य आहे. हे धोरण प्रत्येक विद्यार्थ्याच्या वैशिष्ट्यपूर्ण क्षमता ओळखून त्यांच्या विकासासाठी प्रयत्न करते. अभ्यास आणि अभ्यासेतर इतर अश्या दोन्ही क्षेत्रांचा विकास, अध्ययनाचा मार्ग आणि कार्यक्रम निवडण्याची मुभा आणि बहुआयामी जगासाठी सगळ्या ज्ञानाची एकता आणि अखंडता जोपासून बहुशाखीय समग्र शिक्षणाचा विकास करणे ही या धोरणामागची बैठक आहे. यात घोकमपट्टी ऐवजी संकल्पना समजून घेण्यावर भर दिला जाईल, नाविन्यतेला प्रोत्साहन देण्यासाठी कल्पकता आणि तार्किक विचार शिकविला जाईल. या धोरणाने विद्यार्थ्यात वैज्ञानिक दृष्टिकोन,समानता आणि सर्व समावेशकता रुजविली जाईल. हे धोरण शालेय, माध्यमिक आणि उच्च शिक्षणापर्यंतच्या सर्व पातळ्यांवरील शिक्षणाच्या अभ्यासक्रमात सुसूत्रता आणण्याचा प्रयत्न करेल. स्वायत्तते बरोबरच परिणामकारक नियमांची चौकट सुनिश्चित करणारी ही नवीन शिक्षण प्रणाली आहे.

सुकाणू समितीने गेल्या दोन वर्षात विद्यापीठ, कुलगुरू, अधिष्ठाता, प्राचार्य, शिक्षक, संस्थाचालक आणि विद्यार्थी या सर्व भागधारकांबरोबर चर्चा करून या अंमलबजावणीसाठी धोरणात्मक परिपत्रके आणि शासकीय ठराव निर्गमित केले आहेत. प्रायोगिक तत्वावर सुरुवातीला १५० स्वायत्त, पारंपारिक आणि अभियांत्रिकी महाविद्यालयात याची अंमलबजावणी सुरू केली. त्यातील अनुभवाच्या आधाराने महाराष्ट्रातील सर्व संलग्नित महाविद्यालयामध्ये या धोरणाची अंमलबजावणी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ साठी सुरू करण्यात आली आहे. विद्यापीठांनीही या धोरणासंबंधी जागरूकता




निर्माण करण्यासाठी अनेक कार्यशाळांचे आयोजन केले.

भारताच्या शिक्षण संस्थांकडे आता विकसित भारताचे साधन म्हणून पाहिले जात आहे. विकसित भारत घडवायचा असेल तर त्यासाठी देशाला उद्योग प्रधान क्षेत्र बनविले पाहिजे. उद्योगांसाठी वीज, जमीन आणि साधन संपत्तीचा विकास ही जशी प्राथमिक आवश्यकता आहे त्याचप्रमाणे कौशल्याने परिपूर्ण असे मनुष्यबळ देखील गरजेचे आहे. ही गरज पूर्ण करण्याची जबाबदारी शिक्षण संस्थांना पार पाडायची आहे. यासाठी उद्योग विश्व आणि शैक्षणिक संस्था यांच्यातील संवाद आणि भागीदारी वाढवावी लागेल. वर्तमान काळात ज्ञानाधिष्ठित समाजाच्या गरजांची पूर्तता करणे ही शिक्षणाची भूमिका बनली आहे.

शैक्षणिक संस्था विशेषत: विद्यापीठे ही आता केवळ शिक्षण देणारी केंद्रे असणार नाहीत. ज्ञानादृष्टी असलेल्या समाजाची निर्मिती करणे आणि सर्वसामान्यांच्या आकांक्षा पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करणे ही कामे त्यांना पार पाडायची आहेत. एकूणच हे नवीन धोरण शिक्षणाला जीवनाच्या जवळ नेणारे आहे. शिकताना विद्यार्थ्यांपुढे नाना अडसर उभे करण्याऐवजी त्यांना जमेल तेव्हा जमेल तसे जमेल त्या कालावधीत अधिक अधिक शिकायला प्रोत्साहन देणारे आहे. या धोरणात अनेक सकारात्मक गोष्टी घडवून आणण्याची ताकद आहे. अंमलबजावणी कितपत ताकतीने होते यावर या धोरणाचे व्यावहारिक यश अवलंबून आहे. पारंपरिक किंवा काहीशा प्रतिगामी दृष्टीने या धोरणाकडे न बघता सकारात्मक आशावादी दृष्टीकोन ठेवून ते राबवले गेले तर पुढच्या पंधरा ते वीस वर्षांमध्ये भारतीय शिक्षणाचा चेहरा मोहरा बदलेल यात तीळ मात्र शंका नाही.




# भारतीय ज्ञानपरंपरेचे सामर्थ्य

**डॉ. भूषण पटवर्धन**
राष्ट्रीय संशोधन प्राध्यापक-आयुष,
माजी उपाध्यक्ष यूजीसी आणि अध्यक्ष, नॅक

सांस्कृतिक नीतिमूल्ये आणि विशाल ज्ञानपरंपरा यांचा वारसा कायम ठेवत भारतीय शिक्षणपद्धतीत बदल घडविण्याची ऐतिहासिक संधी आपल्याला 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२०'च्या माध्यमातून उपलब्ध होत आहे. समृद्ध भारतीय शैक्षणिक वारशाला केवळ ज्ञानभांडार न समजता, त्याचा उपयोग नवदृष्टिकोन, नवसंशोधन आणि नवभारत राष्ट्राचे पुनरुत्थान यासाठी करण्यात यावा, हे सुचविणारा लेख.

**भारतीय ज्ञानपरंपरा**

हेन्री डेव्हिड थोरो म्हणाला, "भगवत् गीतेचा आसमंताला कवेत घेणारा आवाका कळला की पाश्चात्य वाङ्मय शिरोमणी शेक्सपीअर म्हणजे वयात येऊ घातलेला उमेदवार विचारवंत वाटायला वाटतो." "सत्यम् शिवम् सुंदरम्" फक्त तीन शब्द. आदी शंकराचार्य यांनी त्याच्या कठोपनिषदा वरील टीकेत ही उक्ती वापरली. पण हे शब्द वाचले की समर्थ रामदासांच्या मनाचे श्लोक मधील २०० व्या श्लोकाप्रमाणे 'मन उन्मन होते नी शब्द कुंठीत' होतात. अवघे पाश्चात्य तत्वज्ञान ह्या तीन शब्दां पुढे पाचोळ्यासम वाटते. कुठे गेली ती संस्कृती? तरुण भारत अजून ही का भ्रमतो आहे? कोणता शाप आहे हा की ज्याची सावली आजही वाकुल्या दाखवत हिणवते आहे त्या ऋषीच्या पिल्लांना?

भारतीय ज्ञानपरंपरा म्हणजे आयुर्वेद, गणित, खगोलशास्त्र, संगीत, तत्त्वज्ञान, भाषा, स्थापत्य, कृषिविज्ञान, योग आणि ध्यान यांसारख्या विविध क्षेत्रांत असलेली एक सजीव आणि सखोल परंपरा. ही फक्त भूतकाळातील गोष्ट नाही! ती

आजच्या संशोधन, नवकल्पना आणि मानवकल्याणासाठीही उपयुक्त आहे. उदाहरणार्थ, योग व आयुर्वेद आरोग्यक्षेत्रात जागतिक प्रभाव टाकत आहेत. पाणिनीचं संस्कृत व्याकरण आजच्या कृत्रिम बुद्धिमत्तेच्या अल्गोरिदमसाठी प्रेरणादायक ठरत आहे. वास्तुशास्त्र, पर्यावरणीय नीतिमूल्ये आणि स्थानिक ज्ञान ही शाश्वत विकासासाठी महत्त्वाची ठरत आहेत.

भास्कराचार्य, बौधायन, आर्यभट्ट, सुश्रुत, चरक यांचं योगदान आधुनिक विज्ञानाच्या अनेक संकल्पनांशी साधर्म्य राखतं. उदाहरणार्थ, पृथ्वी सर्व वस्तूंना आकर्षित करते, हे भास्कराचार्यांनी न्यूटनच्या अनेक शतके आधी सांगितलं होतं. बौधायनाने पायथागोरस प्रमेयासारख्या सूत्रांचा उल्लेख केला होता. आर्यभट्टाने पृथ्वी स्वतःभोवती फिरते हे प्रतिपादन केलं होतं.

ही उदाहरणं दाखवतात की भारतीय ज्ञानपरंपरा ही विज्ञानाच्या अनेक संकल्पनांची पूर्वपीठिका ठरली आहे. त्यामुळे ती नव्या पिढीपर्यंत पोहोचवणे आवश्यक आहे, जेणेकरून विद्यार्थ्यांमध्ये भारतीय दृष्टीकोनातून जागतिक विचार रुजेल.

**शिक्षणाचं ध्येय**

शिक्षण हे केवळ नोकरीसाठी लागणारी अर्हता नाही, तर ते व्यक्तीच्या सर्वांगीण विकासासाठी असतं. खरं शिक्षण माणसात आत्मपरीक्षण, नैतिक समज, सामाजिक बांधिलकी आणि विवेक विकसित करतं. एक सुशिक्षित व्यक्ती ही केवळ माहितीची पोते नसते, तर ती समस्यांचे सर्जनशील निराकरण करणारी, सहानुभूतीने विचार करणारी आणि बदल घडवणारी शक्ती असते. या प्रक्रियेत फक्त वाचन, लेखन, संख्याज्ञान एवढ्यावर न थांबता, उच्च पातळीच्या संज्ञानात्मक क्षमतांचा विकास महत्त्वाचा ठरतो — जसे की विचारशक्ती, विश्लेषण, समालोचन, निर्णयक्षमता आणि नवकल्पकता. हे गुण शिक्षणातून विकसित होत नसतील, तर ती प्रक्रिया अपूर्ण ठरते.

स्वामी विवेकानंद म्हणतात, "शिक्षण म्हणजे माणसामध्ये आधीपासूनच असलेल्या परिपूर्णतेचे प्रकटीकरण होय." म्हणजेच, शिक्षण ही केवळ बाह्य माहिती मिळवण्याची प्रक्रिया नसून, आपल्या अंतर्गत क्षमतेचा उत्कर्ष घडवण्याचं माध्यम आहे.

भारतीय शिक्षणपद्धती प्राचीन काळी चिंतन, तत्त्वज्ञान, शास्त्र आणि मूल्याधिष्ठित जीवनशैली यांवर आधारलेली होती. मात्र गेल्या दोन शतकांत औपचारिक शिक्षणातून भारतीय ज्ञानपरंपरेचं पद्धतशीरपणे उच्चाटन झालं. पाठ्यपुस्तकांत मुघल व ब्रिटिश इतिहास ठळक होता, पण आर्यभट्ट, सुश्रुत, पतंजली, चाणक्य, पाणिनी यांचं मौलिक योगदान दुर्लक्षित झालं. धर्मनिरपेक्षतेच्या नावाखाली मूल्यांचा पाश्चात्य चौकटीत पुनर्रचना केली गेली.

भारताचं शिक्षण प्राचीन चिंतन, तत्त्वज्ञान आणि शास्त्र यावर आधारलेलं होतं. परंतु, गेल्या दोन शतकांत या शिक्षणातून भारतीय ज्ञानपरंपरेचं विलोपन झालं.

प्राचीन भारतीय विचार पद्धतशीरपणे शिक्षणातून दूर झाला. पाठ्यपुस्तकांत मुघल व ब्रिटिश इतिहासाचे संदर्भ ठळक होते, तर भारतीय शास्त्रज्ञ, तत्त्वज्ञ, आणि द्रष्ट्यांना फारसं स्थान नव्हतं. न्यूटनचं सफरचंद आणि अर्किमिडीजचं 'युरेका' आदराने शिकवलं जात असताना, आर्यभट्ट, सुश्रुत, पतंजली, चाणक्य आणि पाणिनी यांचे ज्ञान दुर्लक्षित राहिले. धर्मनिरपेक्षतेच्या नावाखाली मानवी मूल्यांनाही त्यांच्या



भारतीय मुळांपासून तोडलं गेलं आणि त्यांची पाश्चिमात्य चौकटीत पुनर्रचना झाली.

या प्रक्रियेमुळे तरुण पिढीच्या मनात आपल्या संस्कृतीशी असलेली नाळ तुटली. हनुमान किंवा महाभारतापेक्षा हॅरी पॉटर आणि ग्रीक पुराणकथा अधिक आकर्षक वाटू लागल्या. आज इंस्टाग्रामवरील इन्फ्लुएन्सर्स भारतीय विचारवंतांपेक्षा अधिक प्रभाव टाकतात. ही केवळ सांस्कृतिक नव्हे, तर बौद्धिक गुलामीची लक्षणं आहेत. म्हणूनच भारतीय ज्ञानपद्धतीचा शिक्षणात समावेश करणे ही आजची गरज आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणतात, "आपली शिक्षणपद्धती ही भारतीय मूल्यांवर आधारित असावी, आपल्या परंपरेचा अभिमान निर्माण करणारी असावी आणि तरुणांना आधुनिक जगासाठी तयार करणारी असावी." त्यामुळे शिक्षणामध्ये भारतीय ज्ञानपद्धतीचा समावेश करणे ही आजची गरज असून, ते आत्मनिर्भर भारताच्या दिशेने एक भक्कम पाऊल ठरेल.

**राष्ट्रीय शिक्षण धोरण – २०२० : एक सांस्कृतिक पुनर्शोध**

'राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०' हे भारताच्या शिक्षण व्यवस्थेतील महत्त्वाचं पाऊल आहे. या धोरणात भारतीय ज्ञानपरंपरेचा समावेश केवळ ऐतिहासिक गौरव म्हणून न होता, वर्तमान आणि भविष्यासाठी उपयुक्त जीवनशैली म्हणून मांडलेला आहे.

या धोरणामध्ये प्राचीन व आधुनिक भारतीय शिक्षण, आरोग्य, गणित, तत्त्वज्ञान, साहित्य, शासन, कला, स्थापत्य, क्रीडा आणि आदिवासी ज्ञानपरंपरेचा समावेश सर्व शिक्षण पातळ्यांवर सुचवलेला आहे. त्यामुळे शिक्षण अधिक अर्थपूर्ण, संस्कृती संलग्न आणि परिवर्तनशील ठरेल.

कलम 4.28 मध्ये शालेय अभ्यासक्रमात भारतीय ज्ञानाचा समावेश करण्याची शिफारस आहे. विद्यार्थ्यांना शिकवताना वापरली जाणारी उदाहरणं, कथा व खेळ त्यांच्या परिसराशी व वातावरणाशी संबंधित असतील, तर शिक्षण अधिक प्रभावी ठरेल.

कलम 4.29 आणि 4.30 मध्ये विद्यार्थ्यांमध्ये सुरुवातीपासूनच सेवा, सत्य, शांती, निष्काम कर्म, स्वच्छता आणि सर्व सजीवांबद्दल आदर या मूल्यांचा संस्काररूपाने समावेश व्हावा, असे सांगितले आहे. तसेच, पंचतंत्र, जातक, हितोपदेश, आणि संविधानातील धडे यांचा उपयोग चारित्र्य विकासासाठी केला जावा, अशी अपेक्षा आहे.

राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० जरी दूरदृष्टीने रचलेलं असलं, तरी त्याची अंमलबजावणी करताना काही महत्त्वाच्या पातळ्यांवर तफावत दिसते. 'इंडियन नॉलेज सिस्टीम' म्हणजेच 'आयकेएस'चा अंतर्भाव प्रामुख्याने उच्च शिक्षणात झाला असून, अनेक विद्यापीठांनी त्यावर आधारित अभ्यासक्रम सुरू केले आहेत. केंद्रीय शिक्षण मंत्रालयाच्या 'आयकेएस विभागा'तर्फे शिक्षक विकास, इंटर्नशिप, संशोधनासाठी निधी, आणि पारंपरिक खेळांसाठी प्रोत्साहन अशा उपक्रमांची सुरुवात झाली आहे. मात्र, कोविडनंतर या उपक्रमांना गती मिळालेली नाही.

दुसरीकडे, शालेय शिक्षणात 'आयकेएस'चा समावेश अपेक्षेप्रमाणे होत नाही. शिक्षणात भारतीय मूल्ये व दृष्टिकोन रुजवण्यासाठी शालेय पातळी महत्त्वाची आहे. बालवय आणि पौगंडावस्था ही मूल्यप्रत्यय व विचारविकासाची खरी वेळ आहे. तरीसुद्धा, सध्याचे शालेय अभ्यासक्रम मर्यादित व विसंगत आहेत. तसेच शिक्षकांची तयारी अपुरी आहे.

बऱ्याच शिक्षकांना भारतीय ज्ञानपरंपरेची नीट माहिती नसते, त्यामुळे ते अशा विषयांचं अध्यापन आत्मविश्वासाने करू शकत नाहीत. काही वेळा त्यांच्या वैयक्तिक पूर्वग्रहांमुळेही हे ज्ञान प्रभावीपणे पोहोचत नाही. त्यामुळे, प्रशिक्षित व सुसंस्कृत शिक्षकांची आवश्यकता अधिक तीव्र झाली आहे.

**शिक्षणातून आत्मनिर्भर भारत**

शिक्षणामध्ये भारतीय ज्ञानपद्धतीची मूल्यं समाविष्ट केल्यास विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, विवेक आणि मूल्याधिष्ठित कृती घडू शकते. ही प्रक्रिया केवळ भारतासाठीच नव्हे, तर संपूर्ण मानवतेसाठी उपयुक्त ठरू शकते. आजची तरुण पिढी अनेकदा परकीय व्यक्तिमत्त्वांचं अनुकरण करते. पण जर त्यांना हनुमानासारखा समर्पणभाव, चरकासारखी चिकित्सक वृत्ती, किंवा विवेकानंदांसारखी मूल्यनिष्ठा समजली, तर त्यांचा दृष्टीकोन बदलू शकतो.

हा बदल घडवण्यासाठी शिक्षक हेच महत्त्वाचं प्रेरणास्थान ठरतात. शिक्षणव्यवस्थेतील खरा बदल अभ्यासक्रमात नाही, तर शिक्षकांच्या दृष्टिकोनात असतो. बहुतांश शिक्षक भारतीय तत्त्वज्ञान, परंपरा आणि मूल्यांशी परिचित नसल्यामुळे त्यांना अशा गोष्टी शिकवणं कठीण जातं. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासनाची 'महाराष्ट्र राज्य शिक्षक व अधिगम अधिष्ठान (MSFDA)' ही संस्था अभिनंदनीय कार्य करत आहे. NEP-2020 नुसार शिक्षकांना प्रशिक्षण देऊन भारतीय ज्ञानपद्धतीचा समावेश अध्यापनात प्रभावीपणे कसा करायचा या प्रशिक्षणाचे एक मॉडेल भविष्यात ही संस्था ठरू शकते. 'एनसीईआरटी'सारख्या संस्था क्षमता वाढवण्याचे प्रयत्न करत असल्या, तरी शिक्षक प्रशिक्षणाचे विकेंद्रीकरण व लोकशाहीकरण ही आजची गरज आहे. विद्यापीठे, शाळा, तज्ज्ञ, शिक्षक आणि मूल्यमापन संस्था यांचे एकत्रित मॉडेल नेटवर्क तयार करणे अत्यावश्यक झाले आहे. आपल्या शैक्षणिक संस्थांकडे तरुणाई कशी पाहते, हाही विचार महत्त्वाचा आहे.

विद्यापीठांनी आता पाश्चिमात्य अनुकरणापेक्षा आपली मौलिकता आणि परंपरा समजून नवे जागतिक मानक निर्माण करायला पाहिजेत. आपण 'ऑक्सफर्ड ऑफ द ईस्ट' होण्याचा आग्रह न धरता, ऑक्सफर्ड हे 'पाश्चिमात्य नालंदा' म्हणून ओळखले जावे अशी दिशा घ्यायला हवी. यामध्ये भावनिक अभिमान नव्हे, तर बौद्धिक स्वातंत्र्याची भूमिका आहे. विद्यार्थ्यांची प्रेरणा पाश्चिमात्य सेलिब्रिटीपेक्षा आपल्या परंपरेतील आदर्श व्यक्तिमत्त्वांकडे वळवणं गरजेचं आहे. हनुमान, कृष्ण, चरक, विवेकानंद यांच्यातील त्याग, ज्ञान, सेवा

व नैतिकता यांचे गुण विद्यार्थी जीवनात रुजवले गेले पाहिजेत. त्यासाठी शिक्षक स्वतः रोल मॉडेल झाले पाहिजेत.

**नावीन्यतेसाठी भारतीय ज्ञानपरंपरा**

भारतीय ज्ञानदृष्टिकोनात विज्ञान केवळ तंत्रज्ञान नाही, तर त्यात नैतिकता, पर्यावरणीय समत्व आणि आध्यात्मिक जाणीव यांचा समावेश आहे. आज नैतिक आणि पर्यावरणीय संकटांमध्ये अडकलेल्या जगाला अशा समन्वित दृष्टिकोनाची गरज आहे.विज्ञान हे केवळ वस्तुनिष्ठ माहितीपुरतं न राहता, ते विवेकशील प्रज्ञेत परिवर्तित झालं पाहिजे. “जीनोम ते ओम: मानवतेचे विकसित होत जाणारे भविष्य” या पुस्तकात विज्ञानाला व्यापक दृष्टिकोनाची आवश्यकता असल्याचा विचार मांडलेला आहे.

आयुर्वेद ते संगणकीय भाषाशास्त्र, पर्यावरणीय नैतिकता ते वास्तुशास्त्र – भारतीय ज्ञानपद्धतीकडे विविध क्षेत्रांत खोल व उपयोगी दृष्टिकोन आहे. या परंपरेला आधुनिक तंत्रज्ञान आणि समाजोपयोगी आचरणाशी जोडण्याचे आव्हान आपल्यासमोर आहे.

भारतीय ज्ञानप्रणाली म्हणजे अंधश्रद्धा किंवा फुका अभिमान नव्हे. तिचा समावेश म्हणजे विद्यार्थ्यांना प्राचीन संकल्पनांकडे नव्या दृष्टिकोनातून पाहायला शिकवणं, त्यांच्या नवकल्पनांना दिशा देणं. उदाहरणार्थ, आयुर्वेद प्रतिबंधात्मक वैद्यकात, वास्तुशास्त्र शाश्वत शहरी विकासात, गोवंश आधारित कृषी अन्नसुरक्षेत, आणि संस्कृत कृत्रिम बुद्धिमत्तेत योगदान देऊ शकते. तत्त्वज्ञान व नैतिकता जबाबदार विज्ञानासाठी आधारभूत ठरतात. या शिक्षणातून विद्यार्थ्यांमध्ये केवळ कौशल्य नव्हे, तर चिंतनशीलता आणि आत्मविश्वास निर्माण होतो. त्यामुळे ते जगाच्या मान्यतेकडे न पाहता स्वतःचे विचार जगापुढे ठेवू शकतात.

**विचारांचं स्वातंत्र्य, ज्ञानाचं स्वराज्य**

भारतीय ज्ञानपरंपरेचा शिक्षणात समावेश म्हणजे नवभारताच्या निर्मितीकडे टाकलेलं एक निर्णायक पाऊल आहे. हे केवळ इतिहासाचं ऋण फिटणं नव्हे, तर भविष्यातील पिढ्यांना त्यांच्या मूळाशी जोडण्याचा प्रयत्न आहे. NEP 2020 ही एक सुवर्णसंधी आहे. तिच्या माध्यमातून ‘आयकेएस’चा समावेश शिक्षणाला विविधांगी, समावेशक आणि वैज्ञानिक दृष्टिकोन देऊ शकतो. शिक्षणाचं अंतिम उद्दिष्ट जर व्यक्ती आणि समाजाचं सर्वांगीण कल्याण असेल, तर विज्ञान, मूल्य, संस्कृती आणि आध्यात्म यांचा समन्वय करणारी भारतीय ज्ञानपरंपरा हाच खरा पाया ठरतो.

आजची पिढी आपल्या मूळांपासून दूर जात आहे, पण अजून वेळ गेलेली नाही. ‘आयकेएस’चा शिक्षणात समावेश ही केवळ सांस्कृतिक गरज नसून एक राष्ट्रीय जबाबदारी आहे. महाराष्ट्रासारखी राज्यं यात पुढाकार घेत आहेत, पण यामध्ये शिक्षक, पालक, संशोधक आणि धोरणकर्ते या सर्व स्तरांवर सक्रिय सहभाग आवश्यक आहे. सध्या आपण अशा वळणावर आहोत जिथे वेळ निसटून चालली आहे. धोरण आणि कृती यामधील तफावत भरून काढणे आता अत्यावश्यक आहे. डॉ. कस्तुरीरंगन आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी मांडलेले NEP २०२० 'व्हिजन डॉक्युमेंट' जर आपल्या धोरणांमध्ये आणि अंमलबजावणीत प्रत्यक्ष उतरले, तर भारताच्या वैचारिक नेतृत्वाच्या पुनर्जागरणाची संधी आपल्याला प्रत्यक्ष साकार करता येईल.

**भारतीय ज्ञानप्रणालीचा समावेश**

शिक्षणात करताना त्याची सुरुवात तरुणांना खऱ्या इतिहासाच्या, मूल्यांच्या आणि प्रेरणादायी कथांच्या माध्यमातून करावी. हे शिक्षक प्रशिक्षणात आणि शालेय शिक्षणातही झिरपवले गेले पाहिजे. उच्च शिक्षणात नवसंशोधन आणि नावीन्य यांना प्रोत्साहन मिळाले पाहिजे. असे झाल्यास ‘आत्मनिर्भर विकसित भारत’ ही संकल्पना केवळ स्वप्न न राहता, ते वास्तवात साकार होऊ शकते.


**References**

- Genome to Om: Evolving Journey of Modern Science to Meta Science by Bhushan Patwardhan and Indu Ramchandani. BluOne Ink, India 2024. https://bhushanpatwardhan.com/professional-highlights.php
- Catch Them Young. Bhushan Patwardhan. Economic Times Government April 10, 2025. https://government.economictimes.indiatimes.com/blog/catch-them-young-rediscovering-cultural-legacy-of-bharat-through-rightful-implementation-of-nep-2020/120150865?utm_source=copy&utm_medium=pshare
- Reimagining Indian Universities. Bhushan Patwardhan. Vinana Bharati Publication 2020. https://vibhaindia.org/assets/pdf/AIU_Booklet_Work_2020.pdf







# शैक्षणिक संशोधनावरील बौद्धिक संपदा: संख्या नको गुणवत्ता हवी


**डॉ. मृदुला बेळे**
प्राध्यापक व बौद्धिक संपदातज्ज्ञ


कोविडसारख्या जागतिक संकटाने संशोधन आणि नवोन्मेषाचे खरे महत्त्व आपल्याला शिकवले. आज विज्ञान, तंत्रज्ञान आणि वैद्यकीय प्रगतीमुळे जग पुन्हा उभारी घेत आहे. या प्रगतीचा गाभा म्हणजे विद्यापीठे आणि संशोधन संस्था. मात्र, भारतातील अनेक शैक्षणिक संस्थांनी पेटंट्सच्या क्षेत्रात जे पावले उचलली आहेत, ती केवळ आकडे वाढवण्यासाठी की खरोखरीच नवोन्मेषासाठी – हा प्रश्न गंभीर आहे. पेटंट्सची वाढती संख्या ही गुणवत्ता आणि व्यावसायिकीकरणाची हमी देत नाही. त्यामुळेच आज गरज आहे ती शैक्षणिक संस्थांनी पेटंट्संबंधी योग्य ती काळजी, पारदर्शकता आणि नैतिकता बाळगण्याची – अन्यथा पेटंट्स हे केवळ कागदी बुडबुडे ठरतील.

कोव्हिडच्या काळात आपल्या सगळ्यांच्या मनावर झालेल्या जखमा आताआता कुठे भरू लागल्या आहेत. कोव्हिडच्या त्या भयानक काळात जर कुणी खरं मलम लावले असेल तर त्या होत्या कोव्हिडवरच्या लसी. भारतात उपलब्ध असेलेली कोव्हिशील्ड लस किंवा अमेरिकेतील मॉडर्ना कंपनीची लस या विद्यापीठातील संशोधनातून पुढे आलेल्या होत्या- हे अनेकांना ठाऊक ही नाही. अमेरिका, युरोपातील काही देश किंवा जपान यासारख्या विकसित देशातील विद्यापीठात होणारे संशोधन मोठ्या प्रमाणात औद्योगजगतापर्यन्त जाऊन पोचते. या संशोधनाचा व्यावसायिक वापर करून उत्पादने तयार होतात, आरोग्य व तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात क्रांती घडते. भारतात मात्र हे प्रमाण तुलनेने अजूनही कमी आहे – पण आता परिस्थिती झपाट्याने बदलते आहे. गेल्या दोन दशकांमध्ये भारतीय विद्यापीठांनी मूलगामी संशोधनाबरोबरच व्यापारी संशोधनाची दिशा धरली आहे. पण तरी देखील हे प्रमाण विकसित देशांच्या तुलनेत बरेच कमी आहे.

विद्यापीठांनी केलेल्या संशोधनांचा खरोखर उद्योगांना किती उपयोग होऊ शकतो हे मोजण्याचे परिमाण आहे पेटंट्स. पेटंट म्हणजे काही केवळ संशोधनाची केलेली नोंदणी नव्हे! – संशोधनाचे व्यवसायीक मूल्य किती हे दाखवणारा तो एक आरसा आहे. भारत सरकारने २०२१ साली तयार केलेल्या राष्ट्रीय विज्ञान, तंत्रज्ञान आणि नवोन्मेष धोरणामध्ये (STIP) विद्यापीठात होणाऱ्या संशोधनातील बौद्धिक संपदावरील मालकी हक्क, नोंदणी खर्च, त्याचे फायदे, व्यवस्थापन आणि तंत्रज्ञान हस्तांतरण यावर सविस्तर विचार केला आहे. राजीव गांधी सायन्स अँड टेक्नॉलॉजी कमिशन, बायरॅक, डीएसटी, डीबीटी यांसारख्या संस्थांमार्फत शैक्षणिक संस्थांना मोठ्या प्रमाणात संशोधनासाठी निधी मिळतो. ‘कपिला योजना’, ‘स्टार्टअप इंडिया’ सारख्या उपक्रमांमुळे पेटंट नोंदणीसाठी निधी देखील उपलब्ध होतो. प्राध्यापकांच्या अ‍ॅकेडमिक परफॉर्मन्स इंडेक्समध्ये पेटंट्सना महत्त्व दिलं जातं, NAAC आणि NBA सारख्या मूल्यांकन संस्थाही याचा विचार करतात. पेटंट रूल्समध्ये करण्यात आलेल्या बदलामुळे शैक्षणिक संस्थांना बौद्धिक संपदा नोंदणी करण्याच्या खर्चात मोठ्या प्रमाणात सूट दिली जाते आहे. त्यामुळेच अनेक विद्यापीठांमधून पेटंट्सच्या नोंदणीचं प्रमाण झपाट्याने वाढतं आहे. यामुळे विद्यापीठातून नोंदणी होणाऱ्या पेटंट्सचे अचानक पेव फुटलेले दिसते आहे. पण ही पेटंट्स हे खरोखर उद्योगांच्या दृष्टीने काही उपयोगाची आहेत का? का की फक्त गुणांकनासाठी आणि अहवालात आकडे भरून दाखवण्यासाठी पेटंट दाखल केली जात आहेत?- हा खरे तर कळीचा प्रश्न आहे.

## पेटंट्सचं निरीक्षण आणि संस्थांची भूमिका

पेटंट नोंदवणं ही एक सुरुवात असली पाहिजे – शेवट नव्हे. एकदा पेटंट नोंदवले की, त्यावर सातत्याने लक्ष ठेवणं, त्याच्या व्यावसायिक शक्यता तपासणं, त्याचं तंत्रज्ञान हस्तांतरण शक्य आहे का हे पाहणं, आणि गरज पडल्यास पुढे ते लायसन्सिंगसाठी सादर करणं ही प्रक्रिया अत्यावश्यक आहे. परंतु अनेक शैक्षणिक संस्था याबाबतीत गाफील असतात.

पेटंट्स टिकवण्यासाठी दरवर्षी नुतनीकरण शुल्क द्यावं लागतं. जर हे लक्षात ठेवलं नाही, तर पेटंट लवकरच निकामी होतं आणि सर्व सार्वजनिक क्षेत्रात खुलं होतं. अनेक वेळा संस्थांकडून हे शुल्क भरलं जात नाही किंवा संशोधकांनीच पुढची प्रक्रिया थांबवलेली असते – परिणामी तो मौल्यवान शोध वाया जातो. याशिवाय, जर एखाद्या संस्थेच्या नावावर पेटंट नोंदलेलं असेल आणि कोणी ते तंत्रज्ञान परवानगीशिवाय वापरत असेल, तर पेटंट उल्लंघन (in-fringement) झाला आहे का यावरही संस्थेने लक्ष द्यायला हवं.

त्यासाठी प्रत्येक शैक्षणिक संस्थेमध्ये बौद्धिक संपदा कक्ष (IPR Cell) आणि तंत्रज्ञान हस्तांतरण कक्ष (TTO – Tech-nology Transfer Office) कार्यरत असणं गरजेचं आहे. हा सेल संस्थेतील पेटंट्सची यादी ठेवतो, त्यावर नुतनीकरणाची वेळ लक्षात ठेवतो, संभाव्य उद्योग भागीदार शोधतो, करारपत्रे तयार करतो, आणि उद्योग व संशोधक यांच्यात सेतू म्हणून काम करतो. असे IP सेल केवळ कागदोपत्री नसावेत – तर खऱ्या अर्थाने सक्रिय, ज्ञानसंपन्न आणि व्यावसायिक दृष्टिकोन ठेवणारे हवेत. संशोधन, पेटंट, निधी, कायदेशीर बाबी, आणि बाजारपेठ यांची समज असलेल्या तज्ज्ञांची याकरता आवश्यकता आहे. यासाठी बाह्य तज्ञ, पेटंट एजंट्स किंवा IPR संस्थांशी करार करून काम सुरू करता येते.

## पेटंट्ससंदर्भातील अपप्रवृत्ती – एक गंभीर चिंतेचा विषय

दुर्दैवाने, शैक्षणिक संस्थांमध्ये पेटंट्सची संख्या वाढवण्याच्या नादात काही ठिकाणी अपारदर्शक आणि फसवणुकीच्या प्रवृत्ती उफाळून येताना दिसत आहेत. काही संस्थांमध्ये गुणवत्तेच्या कसोटीवर न उतरू शकणाऱ्या शोधांवर पेटंट्स दाखल केली जात आहेत – केवळ आकडे वाढवण्यासाठी! अनेक वेळा एकाच संशोधनात काहीच नविन नसतानाही त्याला विविध नावांनी पुन्हा पुन्हा दाखल केलं जातं. काही प्रकरणांमध्ये बाह्य संस्थांशी संगनमत करून “पेटंट मिळाल्याचे” खोटे प्रमाणपत्र तयार करून ते NAAC किंवा NBA मूल्यांकनासाठी दाखवले जात असल्याचेही उघड झाले आहे.

तसेच, आणखी एक चिंताजनक प्रवृत्ती म्हणजे – शास्त्रशाखेतील काही प्राध्यापक त्यांच्या पेटंट अयोग्य संशोधनावरही फक्त नोंदणी मिळावी म्हणून कॉपीराइट नोंदवत आहेत. प्रत्यक्षात, वैज्ञानिक उपकरणे, सूत्रे, प्रक्रियांचे वर्णन किंवा संशोधनाच्या आकृत्या या कॉपीराइटने संरक्षित होत नाहीत – त्यासाठी पेटंट किंवा डिझाईन रजिस्ट्रेशनसारख्या योग्य मार्गांची आवश्यकता असते. परंतु या गोष्टींचा गैरवापर करून केवळ नोंदणीचं "प्रमाणपत्र" मिळवून त्याचा खोटा गवगवा केला जातो. यामुळे बौद्धिक संपदेसंदर्भात विद्यार्थ्यांमध्येही गोंधळ निर्माण होतो आणि संपूर्ण शैक्षणिक वातावरणाची शुद्धता धोक्यात येते.

ही स्थिती थांबवण्यासाठी संस्थांनी बौद्धिक संपदेविषयी प्रामाणिक धोरण स्वीकारणं, तज्ज्ञांच्या मदतीने पडताळणी प्रक्रिया तयार करणं, आणि दर्जेदार नवप्रवर्तनास प्रोत्साहन देणं गरजेचं आहे.

## गुणात्मक पेटंट्सची गरज आणि पुढील वाटचाल

आज शैक्षणिक संस्थांमध्ये पेटंट्सच्या संख्येचा आलेख झपाट्याने वाढताना दिसतोय. अनेक विद्यापीठे, महाविद्यालये आणि संशोधन संस्था दरवर्षी मोठ्या प्रमाणावर पेटंट्स दाखल करत आहेत. पण केवळ संख्या वाढवणं हे ध्येय नसून गुणवत्ता वाढवणं हे खरे उद्दिष्ट असले पाहिजे. गुणात्मक पेटंट म्हणजे काय? तर जे पेटंट उद्योगजगतात वापरण्यासारखे असतात, ज्यांना तांत्रिक व बाजारमूल्य असतं, जे प्रत्यक्ष उत्पादनांमध्ये रूपांतरित होऊ शकतात, किंवा जे उद्योगांसाठी ‘लायसेन्स’ करून उत्पन्न निर्माण करू शकतात – तेच खरे गुणात्मक पेटंट. अशा पेटंट्सचं व्यावसायिकीकरण झालं, तर संशोधक, संस्था आणि राष्ट्र या तिघांचाही खऱ्या अर्थाने फायदा होतो.

विद्यापीठांनी पेटंट दाखल करण्याआधी खालील मुद्द्यांवर विचार करणं आवश्यक आहे:

- संबंधित शोधाचा व्यावसायिक वापर किती शक्य आहे?
- नवीनपणा (novelty), उद्योगोपयोगिता (industrial applicability) आणि अविष्करणयोग्यता (inventive step) या तिन्ही निकषांवर शोध उतरतो का?
- तो शोध स्थानिक किंवा जागतिक उद्योगसमोरील समस्या सोडवतो का?
- त्याच्या व्यावसायिकीकरणासाठी योग्य भागीदार, निधी व संसाधन उपलब्ध आहेत का?

यासाठी पेटंट दाखल करण्याआधी त्या तंत्रज्ञानाची पडताळणी (टेक्नॉलॉजी वॅलिडेशन), बाजारपेठेत असलेली उपयुक्तता (मार्केट फिजिबिलिटी स्टडी), आणि सखोल तपासणी (IP ड्यू डिलिजन्स) अशा प्रक्रिया आवश्यक आहेत. या सगळ्या गोष्टींची व्यवस्था शैक्षणिक संस्थेच्या IPR सेलने किंवा तत्सम विभागाने केली पाहिजे.

आज आपण नवभारताच्या निर्माणाच्या दिशेने वाटचाल करत आहोत. 'विकसित भारत २०४७' हे जर खरोखर साध्य करायचं असेल, तर आपली विद्यापीठं केवळ ज्ञानाच्या निर्मितीत नव्हे, तर ज्ञानाच्या उपयुक्ततेतही अग्रेसर झाली पाहिजेत. संशोधनात नाविन्य असेल आणि पेटंट्स गुणवत्तापूर्ण असतील, तरच भारत ज्ञानाधिष्ठित अर्थव्यवस्थेच्या दिशेने सक्षमपणे वाटचाल करू शकेल.

## प्रामाणिक बौद्धिक संपदा व्यवस्थापनासाठी शिफारसी

बौद्धिक संपदा ही फक्त नोंदणीपुरती न राहता व्यवसायिक, सामाजिक आणि वैज्ञानिक मूल्य निर्माण करणारी असावी, यासाठी पुढील उपाय आवश्यक आहेत:

## शैक्षणिक संस्थांनी करण्याची उपाययोजना :

- संस्थेच्या IPR धोरणात स्पष्ट निकष असावेत – कुठल्या शोधावर पेटंट करायचं, कुठे नोंदणी न करता फक्त प्रकाशन करायचं, हे तज्ञ समितीकडून ठरवलं जावं.
- प्रत्येक पेटंट/कॉपीराइट/डिझाईन नोंदणीपूर्वी IP मूल्यांकन समितीकडून तांत्रिक आणि नैतिक पडताळणी बंधनकारक करावी.
- बाह्य एजंटांशी करार करताना पारदर्शकता आणि गुणवत्ता निकष स्पष्ट असावेत; दर्जाहीन आणि कॉपी-पेस्ट प्रकारातील अर्ज टाळावेत.
- फसवणूक करणाऱ्या किंवा खोट्या नोंदणी दाखवणाऱ्या प्रकरणांवर शिस्तभंगात्मक कारवाई केली जावी.
- विद्यार्थ्यांना आणि प्राध्यापकांना बौद्धिक संपदेविषयी खरी माहिती आणि प्रशिक्षण मिळेल यासाठी नियमित कार्यशाळा आयोजित कराव्यात.
- DHE, DTE, AICTE, UGC यांसारख्या नियामक संस्थांनी करावयाची

## उपाययोजना :

- पेटंट्स आणि IP बाबतीत संख्येपेक्षा गुणवत्ता महत्त्वाची हे धोरणात्मक पातळीवर अधोरेखित करावे.
- शैक्षणिक संस्थांनी दाखवलेल्या पेटंट्सची मुल्यांकनाआधी अनिवार्य पडताळणी यंत्रणा (Due Diligence Cell) तयार करावी.
- फक्त IP नोंदणी दाखवण्याऐवजी त्याचा तांत्रिक व व्यवसायिक प्रभाव मोजणारे संकेतांक (impact-based metrics) लागू करावेत.
- खोट्या पेटंट्स/कॉपीराइट दाखवणाऱ्या संस्थांवर NAAC/NBA मूल्यांकनात निगेटिव्ह गुण देण्याची व्यवस्था असावी.
- संस्थांच्या बौद्धिक संपदेच्या व्यवस्थापनासाठी राष्ट्रीय स्तरावर प्रशिक्षण आणि ऑडिट यंत्रणा सुरू केली जावी.

आज जेव्हा भारत ज्ञानाधारित अर्थव्यवस्थेकडे वाटचाल करत आहे, तेव्हा शैक्षणिक संस्थांनी आणि नियामक यंत्रणांनी गुणवत्तापूर्ण, नैतिक आणि समाजोपयोगी संशोधन व नवप्रवर्तन याला प्राधान्य देणं अत्यंत गरजेचं आहे. केवळ संख्येचा बुडबुडा न आणता खऱ्या अर्थाने मूल्यनिर्मिती करणं हाच शैक्षणिक प्रगतीचा खरा मार्ग आहे.

# आवाहन

राज्याच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या या नव्या त्रैमासिकासाठी तुमच्या सारख्या प्रेरणादायी शिक्षक, अभ्यासू विद्यार्थ्यांनी आणि नवकल्पनांनी समृद्ध महाविद्यालयांनी आपापल्या कहाण्या आमच्यापर्यंत पोहोचवाव्यात, अशी आमची मनापासून विनंती आहे.

तुमच्या संस्थेत एखादा वेगळा अभ्यासक्रम सुरू करण्यात आला असेल, एखाद्या विद्यार्थ्याने नावीन्यपूर्ण प्रकल्प साकारला असेल, पेटंट मिळवले असेल, संशोधनात काही वेगळे घडवले असेल, एखादा कार्यक्रम खूप लोकाभिमुख आणि परिणामकारक ठरला असेल - तर तो अनुभव आम्हाला आणि सर्वांना वाचायला नक्की आवडेल.

हे त्रैमासिक म्हणजे आपल्या कामाची ओळख करून देण्यासाठी निर्मिलेले एक व्यासपीठ आहे. संस्था, विभाग किंवा वैयक्तिक पातळीवरील आपल्या यशोगाथा, कल्पक उपक्रम, सर्जनशील प्रकल्प, आणि समजूतदार मार्गक्रमण - हे सगळं आम्ही ऐकायला आणि छापायला उत्सुक आहोत. या प्रवासात आमचे सहप्रवासी होण्यासाठी आपल्याला हे आग्रहाचे आमंत्रण!

तुमचे लेख (मराठीत किंवा इंग्रजीत), ६०० ते १००० शब्दांत shikshanwedh@gmail.com या ईमेलवर पाठवा. चांगली रंगीत छायाचित्रे देखील पाठवा; मात्र छायाचित्रांचे resolution चांगले असले पाहिजे. निवडक लेख त्रैमासिकात प्रसिद्ध केले जातील.

चला, एकत्र येऊ या — शिक्षणातले आशावाद, प्रयोगशीलता आणि प्रेरणा सगळ्यांपर्यंत पोहोचवू या!

**लेख या ईमेल वर पाठवा : shikshanwedh@gmail.com**




मराठा विद्या प्रसारक समाज, नाशिक संस्थेच्या वतीने डिसेंबर 2023 मध्ये 'ग्रंथ जागवी शिवस्मृती' उपक्रमांतर्गत श्रीकांत देशमुख लिखित 'कुळवाडी भूषण शिवराय' या ग्रंथाच्या १३ रंगांतील ७५००० प्रतींतून १७००० चौ फुट (१४० फूट x १२२ फूट) आकारात ग्रंथ रांगोळी साकारण्यात आली. या उपक्रमाची वंडर बुक रेकॉर्ड मध्ये नोंद झाली. उपक्रमा नंतर ही पुस्तके विद्यार्थ्यांना मोफत वितरित करण्यात येत आहेत. संस्थेतील ५ कलाशिक्षकांनी ही रांगोळी साकार केली.



Promenade on an Indian Street / Artist : Edwin Lord Weeks (1849-1903)

## उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे शंभर दिवसांत शंभर टक्के उद्दिष्ट पूर्ण







मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून उच्च व तंत्र शिक्षण विभागाचा गौरव

---

या त्रैमासिकातील लेखात दिल्या गेलेल्या माहितीच्या सत्यतेची जबाबदारी ही पूर्णपणे लेखकांची आहे. लेखात व्यक्त झालेली मते ही लेखकांची आहेत. ती मते महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाची नाहीत अथवा मंडळ कुठल्याही प्रकारे या मतांचे समर्थन करत नाही. हे त्रैमासिक महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाने अंतर्गत प्रसारणासाठी केलेले खाजगी प्रकाशन आहे.



**श्री. नरेंद्र मोदी**
मा. पंतप्रधान

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० हे २१ व्या शतकातील विकसित भारताच्या गरजा पूर्ण करणारे असून भारताला जागतिक ज्ञानसंपन्न ज्ञान केंद्र बनवेल



**श्री. देवेंद्र फडणवीस**
मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० भारताच्या शिक्षण व्यवस्थेचे भारतीयकरण आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण हे शिक्षण प्रणालीला भारतीय मूल्ये आणि परंपरांशी जुळवून घेण्याच्या दिशेने एक सकारात्मक पाऊल आहे.



**श्री. चंद्रकांतदादा पाटील**
मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य

उच्च व तंत्र शिक्षण सर्वांपर्यंत पोहोचवणे आणि त्याची गुणवत्ता वाढवणे हे राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे उद्दिष्ट आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामुळे महाराष्ट्रातील शिक्षण व्यवस्था अधिक प्रगतीशील होईल.



**श्री. इंद्रनील नाईक**
मा. राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य

विद्यार्थ्यांना राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या माध्यमातून बहुविद्याशाखीय शिक्षण, संशोधन आणि नवोन्मेषाला प्रोत्साहन देण्यासाठी आणि आवश्यक कौशल्यांनी सुसज्ज करण्यासाठी महाराष्ट्र राज्य सदैव प्रयत्नशील आहे.



**उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य**